# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, शुक्रवार १३ नोव्हेंबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०


## नेपाळमध्ये गाडी कोसळून १० जण ठार

**काठमांडू :** नेपाळच्या बागमती प्रांतात एक गाडी उतारावरून खाली कोसळून किमान १० जण ठार झाले आणि इतर पाच जण जखमी झाले. हा अपघात मकवानपूर जिल्ह्यात पहाटे पावणे सहा वाजण्याच्या सुमारास घडला.माय रिपब्लिका वृत्तपत्राच्या मते, ही गाडी सुमारे १५ लोकांना घेऊन काठमांडूहून सर्लाहीकडे जात होते. ते तीव्र उतारावरून सुमारे ५०० मीटर खाली कोसळले, ज्यामुळे १० लोकांचा मृत्यू झाला आणि इतर पाच जण जखमी झाले. मृत लोकांमध्ये तीन महिला, दोन मुली आणि पाच पुरुषांचा समावेश असल्याचे अहवालात म्हटले आहे. त्यांची ओळख अद्याप पटलेली नाही. जखमी झालेल्या लोकांना उपचारासाठी हेटौडा रुग्णालयात नेण्यात आले. अहमवालात पुढे म्हटले आहे की, अपघाताची माहिती मिळाल्यानंतर घटनास्थळी सात सदस्यांचे बचाव पथक पाठवण्यात आले.

# माझा भाऊ ज्यादिवशी गेला, त्यानंतर विषय संपला

## सुप्रिया सुळेंचे राष्ट्रवादीच्या विलीनीकरण चर्चेवर थेट भाष्य

**मुंबई/प्रतिनिधी -** राज्याच्या राजकारणात काही दिवसांपासून राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटाच्या विलीनीकरणाची चर्चा पुन्हा एकदा रंगू लागली होती. शरद पवार रुग्णालयात दाखल झाल्यानंतर त्यांची इतर नेत्यांनी घेतलेल्या भेटीगाठी, भाजपा आणि शिंदे सेनेच्या नेत्यांनी केलेली विधाने यामुळे विलीनीकरणाला वेग आल्याची चर्चा होती. मात्र अखेर सुप्रिया सुळे यांनी या चर्चांवर थेट भाष्य केले आहे. यापूर्वी राष्ट्रवादी (अजित पवार) काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्ष सुनेत्रा पवार यांनी वेळ आल्यावर सर्व गोष्टी स्पष्ट होतील, असे सूचक विधान केले होते. त्यानंतर आता सुप्रिया सुळेंनीही आपले मत व्यक्त केले आहे.

सुप्रिया सुळे यांनी गुरूवारी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांना विलीनीकरणासंबंधी प्रश्न विचारला असता त्या म्हणाल्या, 'कसले एकत्रीकरण? माझ्याकडे कोणताही प्रस्ताव आलेला नाही. त्यामुळे कोणत्या पक्षाचे एकत्रीकरण होणार याची मला तरी कल्पना नाही. माझ्याशी तरी याबाबत कोणी बोललेले नाही.' राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार)




पक्षाच्या आमदारांनी शरद पवारांच्या भेटीची वेळ मागितली आहे. यावर प्रश्न विचारला असता त्या म्हणाल्या की, शरद पवार ज्येष्ठ नेते असल्यामुळे यापूर्वीही त्यांची अनेकांनी भेट घेतली आहे. त्यामुळे या भेटींमध्ये नवीन असे काही नाही.

सुनील तटकरेंच्या विधानावर भाष्य

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी काही दिवसांपूर्वीच विलीनीकरणाची चर्चा अजित पवार करत होते, अशी कबुली दिली. यावरही सुप्रिया सुळे यांनी भाष्य केले. त्या म्हणाल्या, 'ज्या दिवशी माझा भाऊ गेला. त्यानंतर दोन-चार दिवसांत ज्या काही घटना घडल्या, त्यावरून मी स्वतः या विषयावर पडदा टाकला होता. यावर वेगळे बोलण्याचे कारण वाटत नाही. माझा भाऊ गेला तेव्हाच या विषयाला पूर्णविराम लागला होता. माझ्यासाठी तेव्हाच हा विषय संपला होता.''अजित पवार असेपर्यंत विलीनीकरणाची चर्चा सुरू होती. अजित पवार यांनी माझ्याशी आणि आमच्या पक्षातील नेत्यांशी याबाबत चर्चा केली होती. १७ जानेवारी रोजी गोविंद बागेत झालेल्या बैठकीचा व्हिडीओही त्यावेळी समोर आला होता. अजित पवार आणि आम्ही काय करणार होतो, याची संपूर्ण जगाला याची माहिती होती. मात्र अजित पवार यांच्या अकस्मात निधनानंतर माझ्याकडून या विषयाला पूर्णविराम देण्यात आला', अशी भूमिका सुप्रिया सुळे यांनी मांडली. ➪(पान २ वर)

# सीमांकन विधेयकासाठी केंद्राच्या पुन्हा हालचाली




- सीमांकन विधेयकासाठी आवश्यक संख्याबळ सरकारनं जमवलं;
- १५-१८ मतांच्या फरकानं विधेयक मंजूर होणार?

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** वृत्तसंस्था महिला आरक्षणाची अंमलबजावणी करण्याशी संबंधित घटनादुरुस्ती विधेयक मंजूर करण्यासाठी केंद्र सरकार लवकरच संसदेचे विशेष अधिवेशन बोलावू शकते. प्रस्तावित संशोधनातून मतदारसंघ पुनर्रचनेद्वारे लोकसभेच्या जागांची संख्या सध्याच्या ५४३ वरून कमाल ८५० पर्यंत वाढवणे हा आहे. हे विधेयक मंजूर झाल्यास संसद आणि राज्य विधानमंडळांमध्ये महिलांसाठी ३३ टक्के आरक्षण लागू करण्याचा मार्ग मोकळा होईल. महिला आरक्षणाची अंमलबजावणी करण्याशी संबंधित घटनादुरुस्ती विधेयक मंजूर करण्यासाठी केंद्र सरकार लवकरच संसदेचे विशेष अधिवेशन बोलावू शकते. प्रस्तावित संशोधनातून मतदारसंघ पुनर्रचनेद्वारे लोकसभेच्या जागांची संख्या सध्याच्या ५४३ वरून कमाल ८५० पर्यंत वाढविणे हा आहे. हे विधेयक मंजूर झाल्यास संसद आणि राज्य विधिमंडळांमध्ये महिलांसाठी ३३ टक्के आरक्षण लागू करण्याचा मार्ग मोकळा होईल, असे केंद्र सरकारला वाटते.

केंद्र सरकारला विश्वास आहे की, त्यांच्याकडे आवश्यक संख्याबळ आहे. विधेयक १५ ते १८ मतांच्या अंतराने पारित होईल. मात्र, या सूत्रांनी प्रस्तावित सत्राच्या तारखा आणि कालावधी संदर्भात कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही. घटना दुरुस्ती विधेयकाला पारित करण्यासाठी दोन तृतीयांश बहुमाची गरज असते. ज्यासाठी ३६१ मतांची गरज आहे. ५४३ सदस्य असलेल्या लोकसभेत तीन जागा रिकाम्या आहेत. या प्रस्तावित दुरुस्ती अंतर्गत डिलिमिटेशनद्वारे लोकसभेच्या सध्याच्या ५४३ जागांची संख्या वाढवून ८५० करण्याचे ध्येय आहे.

सरकारने घटना दुरुस्ती विधेयक १७ एप्रिल रोजी बजेट सत्रादरम्यान पारित करण्याचा प्रयत्न केला होता. परंतु लोकसभेत आवश्यक संख्याबळ जमा करण्यात अपशय आल्याने हे विधेयक मंजूर होऊ शकले नाही. संसदेचे अधिवेशन कमी वेळाच्या नोटिशीवर बोलवण्याची शक्यता अजूनही कायम आहे. कारण आतापर्यंत औपचारिक रुपाने संसद तहकूब केलेली नाही.

मान्सून सत्राला १३ ऑगस्ट रोजी अनिश्चितकाळासाठी स्थगित केले होते. हे सत्र ९१ दिवसांपासून तहकूब केल्याशिवाय सुरूच आहे, ज्याने २००८ च्या ८७ दिवसांचा मागचा रेकॉर्ड तोडला आहे. सध्या सुरू असलेल्या सत्रात कोणत्याही बैठकीला बोलावण्यासाठी किमान २ दिवसांची नोटीस पुरेशी असते तर नवीन सत्राला बोलावण्यासाठी किमान १४ दिवसांची नोटीस द्यावी लागते. सरकारने पावसाळी अधिवेशन तहकूब न करण्याच्या निर्णयामुळे अधिवेशन वाढवले जाऊ शकते किंवा प्रस्तावित सुधारणांवर विचार करण्यासाठी विशेष बैठक बोलावली जाऊ शकते, अशा अटकळींना वाव मिळाला होता.

**लोकसभेच्या जागा वाढविण्याचा घाट-** सर्व राज्याच्या लोकसभेच्या जागांमध्ये ५० टक्के वाढ केली जावी, म्हणजे दक्षिणेकडील राज्यांचा आक्षेप दूर केला जाईल. सरकार २०२९ च्या लोकसभा निवडणुकांच्या आधी महिला आरक्षण कायदा लागू ➪(पान २ वर)

## केदारनाथ धामचे गर्भगृह बंद

**रुद्रप्रयाग :** उत्तराखंडमधील प्रसिद्ध केदारनाथ धामचे दरवाजे बुधवार भाऊबीजेच्या पवित्र पर्वावर हिवाळ्यासाठी बंद करण्यात आले. वैदिक मंत्रोच्चार आणि धार्मिक विधींच्या वातावरणात सकाळी ८.३० वाजता



मंदिराचे मुख्य दरवाजे पुढील सहा महिन्यांसाठी बंद करण्यात आले. या सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी देश-विदेशातून लाखो भाविक केदारनाथ येथे दाखल झाले होते. धार्मिक मान्यतेनुसार, हिवाळ्यात केदारनाथ परिसरात मोठ्या प्रमाणात बर्फवृष्टी आणि कडाक्याची थंडी पडत असल्याने मंदिराचे दरवाजे बंद केले जातात. त्यानंतर बाबा केदारांची विग्रह उत्सव डोली त्यांच्या हिवाळी निवासस्थानी म्हणजेच उत्तराखंडमधील रुद्रप्रयाग जिल्ह्यातील उखीमठ येथे नेण्यात येणार आहे. उखीमठ येथील मंदिरात पुढील सहा महिने बाबा केदारांची पूजाअर्चा आणि धार्मिक विधी पार पडतील. भाविकांनी तिथे दर्शनही घेता येईल. सोमेश्वर देवतेच्या नेतृत्वाखाली माता यमुनेची उत्सव पालखी खरसाली येथील खुशीमठात पोहोचेल. पुढील सहा महिने भाविकांना याच हिवाळी गादीस्थळांवर दर्शन घेता येईल.या वर्षी दोन्ही धाममध्ये गेल्या वर्षीच्या तुलनेत अधिक भाविक पोहोचले. मंगळवारी संध्याकाळपर्यंत केदारनाथमध्ये १९ लाख १३ हजार आणि यमुनोत्रीमध्ये ८ लाख ८४ हजार भाविकांनी दर्शन घेतले आहे. दोन्ही धाममध्ये एकूण २७ लाख ९८ हजार भाविक पोहोचले. गेल्या वर्षीच्या तुलनेत केदारनाथमध्ये १.४५ लाख आणि यमुनोत्रीमध्ये २.४० लाख अधिक भाविकांनी दर्शन घेतले.

## देशात मद्यप्राशनाचे प्रमाण वाढले

**नवी दिल्ली :** अमेरिका आणि चीनसारख्या मोठयद्रा बाजारपेठांमध्ये मद्य प्राशनात घट झाली असताना भारतात २०२६ च्या पहिल्या



सहामाहीत तब्बल १० टक्क्यांची वाढ नोंदविण्यात आली. जगातील २१ प्रमुख बाजारपेठांमध्ये सर्वाधिक वाढ भारतात झाली आहे.आयडब्ल्यूएसआर या मद्य विक्री आणि प्राशनाचा अभ्यास करणा-या संशोधन संस्थेने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार जानेवारी ते जून २०२६ या कालावधीत भारतातील मद्य प्राशनात लक्षणीय वाढ झाली. यामध्ये बीअरच्या प्राशनात सर्वाधिक १६ टक्के वाढ नोंदविण्यात आली.

## भारतीय विद्यार्थिनीचा दुबईत मृत्यू

**नवी दिल्ली :** दुबईत गाडीचे टायर पंक्चर झाल्याने रस्त्याच्या कडेला मदतीसाठी थांबलेल्या हिंदुस्थानी विद्यार्थिनीला भरधाव कारने धडक दिल्याने तिचा मृत्यू झाला. नायफा बल्कीस हमीद (२१) असे मृत विद्यार्थिनीचे नाव आहे. नायफा ही पॅनेडियन युनिव्हर्सिटी दुबईमध्ये आर्किटेक्चरच्या शेवटच्या वर्षात शिकत होती. गाडीचे टायर पंक्चर झाल्यामुळे मदतीची प्रतीक्षा करत असताना एका भरधाव वाहनाच्या धडकेत ठार झाली. अपघाताच्या काही क्षण आधी, विद्यापीठाकडे जात असताना गाडीचे टायर पंक्चर झाल्याबद्दल नायफा वडिलांशी बोलत होती.

## रणांगणावरून पळ काढणा-या ६६ सैनिकांना फाशीची शिक्षा

**वालिकेल :** आफ्रिकन देश असलेल्या काँगोमध्ये रणांगणावरून पळ काढल्याबद्दल आणि आदेशांचे पालन न केल्याबद्दल ६६ सैनिकांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली आहे. उत्तर किवू प्रांतातील वालिकेल येथे एकूण ७१ सैनिकांवर लष्करी न्यायालयात खटला चालवण्यात आला होता. यापैकी ६६ जणांना फाशी, एकाला १० वर्षांचा तुरुंगवास, तर उर्वरित चार सैनिकांची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, २० ऑक्टोबर रोजी विद्रोही संघटना एफआरएन (ज्यामध्ये एम २३ बंडखोरांचाही समावेश आहे) यांच्यासोबत झालेल्या चकमकी दरम्यान हे सैनिक आपली पोस्ट सोडून पळून गेले होते. त्यांच्यावर भ्याडपणा, बंडखोरी आणि लष्करी आदेशांचे उल्लंघन केल्याचा आरोप ठेवण्यात आला होता. काँगोचा पूर्व भाग ब-याच काळापासून एम् २३ सारख्या विविध सशस्त्र विद्रोही गटांच्या हिंसाचाराचा सामना करत आहे. या बंडखोरांना शेजारील रवांडा देशाचा पाठिंबा असल्याचा आरोप काँगो सरकारकडून सातत्याने केला जातो. सैन्यामध्ये शिस्त राखण्यासाठी आणि विद्रोही गटांविरोधातील मोहीम मजबूत करण्यासाठी ही कठोर कारवाई करण्यात आल्याचे लष्कराने म्हटले आहे. काँगो सरकारने मार्च २०२४ मध्ये २० वर्षांपासून लागू असलेली मृत्युदंडावरील बंदी उठवली होती.

# बेपत्ता दोन विशेष पोलिस अधिका-यांचे मृतदेह सापडले

**किश्तवाड /वृत्तसंस्था** : जम्मू आणि काश्मीरच्या किश्तवाड जिल्ह्यात बेपत्ता झालेल्या दोन विशेष पोलिस अधिका-यांचे मृतदेह सापडले आहेत. त्यांच्या अंगावर गोळ्यांच्या अनेक खुणा आहेत. त्यांच्या असणारी शस्त्रेही घटनास्थळी सापडलेली नाहीत, त्यामुळे या कृत्यामागे दहशतवाद्यांचा हात असण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. मृत पोलिस कर्मचा-यांची ओळख बाबी चंद (वय ५७) आणि रशपाल कुमार ( वय ४५) अशी पटली आहे. हे दोघेही स्थानिक पोलिसांच्या स्पेशल ऑपरेशन्स ग्रुपचे सदस्य होते. सध्या त्यांची नियुक्ती दच्छन भागातील कियार गावात करण्यात आली होती.विशेष पोलिस अधिकारी बॉबी चंद आणि रशपाल कुमार बुधवारी किश्तवाड जिल्ह्यातील दुर्गम दच्छन परिसरातून बेपत्ता झाले होते. ते कियार गावातील आपल्या छावणीतून धर्ना-मरवाह येथील लष्करी चौकीच्या दिशेने निघाले होते, परंतु ते आपल्या नियोजित स्थळी पोहोचलेच नाहीत.

**स्थानिकांनी ऐकला गोळीबाराचा आवाज-** दोन्ही पोलिस अधिकार्यांचे



मोबाईल फोनही बंद होते. स्थानिक रहिवाशांनी गोळीबाराचा आवाज ऐकल्याचे सांगितले. त्यानंतर, पोलिस आणि लष्कराच्या राष्ट्रीय रायफल्सने संयुक्तपणे मोठ्या प्रमाणावर शोधमोहीम सुरू केली. बॉबी चंद आणि रशपाल कुमार स्थानिक पोलिसांच्या स्पेशल ऑपरेशन्स ग्रुपमध्ये तैनात होते. दोघांच्या शोधमोहिमेसाठी दुर्गम, डोंगराळ आणि घनदाट जंगल असलेल्या परिसरासह आसपासच्या सर्व भागांत सुरक्षा दलांना तैनात करण्यात आले होते. किश्तवाडच्या आमदार शगुन परिहार म्हणाल्या, दोन विशेष पोलिस अधिका-यांच्या हत्येची ही घटना अत्यंत दु:खद आहे. आमच्या दक्षिण भागातील दोन विशेष पोलीस अधिकारी मारले गेले आहेत. ते काल रात्री बेपत्ता झाले होते. गुरुवारी सकाळी त्यांचे मृतदेह सापडले. आम्ही केंद्रीय गृहमंत्र्यांना हत्येला जबाबदार असलेल्यांना कठोर शिक्षा मिळावी, अशी मागणी करणार आहोत, असेही त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, बुधवारी दुपारी कुलगाममधील एका सुरक्षा चौकीवर मोटारसायकलवरून आलेल्या अज्ञात हल्लेखोरांनी गोळीबार केला, ज्यामध्ये केंद्रीय राखीव पोलिस दलाचे तीन जवान जखमी झाले.

# अग्निवीरांना थेट राष्ट्रीय रायफल्स मध्ये मिळणार संधी

**नवी दिल्ली//वृत्तसंस्था** : चार वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करणा-या अग्निवीरांची नियुक्ती आता जम्मू-काश्मीरमधील दहशतवादविरोधी मोहिमांसाठी विशेष ओळखल्या जाणा-या राष्ट्रीय रायफल्सच्या तुकड्यांमध्ये करण्याबाबत भारतीय लष्कर गांभीर्याने विचार करत आहे. सुधारित अग्निपथ योजनेच्या पार्श्वभूमीवर लष्कराच्या या संभाव्य निर्णयाला विशेष महत्त्व प्राप्त झाले असून यामध्ये कायमस्वरूपी सेवेसाठी निवडल्या गेलेल्या २५ टक्के अग्निवीरांसह, दोन वर्षांची मुदतवाढ मिळालेल्या जवानांचाही समावेश असणार आहे.

आतापर्यंत अग्निवीर जम्मू-काश्मीरमधील नियंत्रण रेषेवर आणि अंतर्गत भागांत नियमित पायदळ तुकड्यांमध्ये दहशतवादविरोधी कर्तव्ये बजावत आहेत. मात्र, एक्स्ट्रा-रेजिमेंटल (मूळ रेजिमेंटबाहेरील) नेमणुकांपासून त्यांना दूर ठेवण्यात आले होते. राष्ट्रीय रायफल्सच्या बटालियनमध्ये एकाच रेजिमेंटच्या विविध तुकड्यांतील, तसेच



आर्मर्ड कोअर आणि तोफखान्यातील जवान एकत्र काम करतात. अशा संमिश्र रचनेमुळे अग्निवीरांच्या कामगिरीचे अचूक मूल्यमापन करण्यात तफावत निर्माण होण्याची शक्यता होती. त्यामुळे आतापर्यंत त्यांना या तुकड्यांत पाठवले गेले नव्हते अशी माहिती लष्करी अधिका-यांनी दिली. आता अग्निवीरांची ➪(पान २ वर)

## पंजाबमध्ये AAP उमेदवारांच्या दुसऱ्या यादीत ३१ नावे

**चंदीगड-** पंजाबमध्ये आम आदमी पार्टीने उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली आहे. या यादीत ३१ नावे आहेत. मुख्यमंत्री भगवंत मान यांनी पत्रकार परिषद घेऊन याची घोषणा केली. खासदार गुरमीत सिंह मीत हेयर यांना बरनाला येथून, तर खासदार राजकुमार चब्बेवाल यांना फगवाडा येथून उमेदवारी देण्यात आली आहे.मंत्री गुरमीत खुड्डियां, आमदार अनमोल गगन मान, अमित रतन कोटफत्ता, कुंवर विजय प्रताप, लालजीत भुल्लर, रमन अरोड़ा, कुलवंत बाजीगर आणि चरणजीत सिंह यांची उमेदवारी कापण्यात आली आहे.यापूर्वी ३१ ऑक्टोबर रोजी ४० उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली होती. त्यात मुख्यमंत्र्यांसह सर्व विद्यमान आमदारांनाच उमेदवारी देण्यात आली होती. पक्षाने आतापर्यंत ७१ उमेदवारांची घोषणा केली आहे.

## पेट्रोलमधील इथेनॉलचे प्रमाण तपासणार

**नवी दिल्ली :** कर्नाटक राज्यात तेल विपणन कंपन्या (ओएमसी) निर्धारित २० टक्क्यांपेक्षा जास्त इथेनॉल मिश्रित इंधन विकत असल्याचा आरोप झाल्यानंतर, केरळ सरकारने चार जिल्ह्यांतील पेट्रोलच्या नमुन्यांची तपासणी



करण्याचे आदेश दिले आहेत. अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री अनूप जेकब यांनी तिरुवनंतपुरम, एर्नाकुलम, कोझिकोड आणि कन्नूर येथील पेट्रोल पंपांवरून नमुने गोळा करण्याचे निर्देश अधिका-यांना दिले आहेत.इंधनाचे नमुने संबंधित जिल्ह्यांतील 'नॅशनल ॲक्रिडिटेशन बोर्ड फॉर टेस्टिंग अँड कॅलिब्रेशन लॅबोरेटरीज' (एनएबीएल) द्वारे मान्यताप्राप्त प्रयोगशाळांमध्ये तपासले जातील. फॉरेन्सिक प्रयोगशाळांमध्येही या चाचण्या करण्याची सुविधा उपलब्ध असल्याचे अधिका-यांनी सांगितले आहे. मंत्री जेकब यांनी सांगितले की, मुख्यमंत्री व्ही. डी. सतीसन यांच्याशी चर्चा केल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. केरळमध्ये आतापर्यंत इथेनॉलच्या ➪(पान २ वर)

# चंद्रशेखर मुख्यमंत्रीपदाचा चेहरा

**लखनौ/वृत्तसंस्था-** यूपी विधानसभा निवडणुकीपूर्वी AIMIM प्रमुख असदुद्दीन ओवेसी आणि आझाद समाज पक्षाचे (कांशीराम) अध्यक्ष चंद्रशेखर आझाद यांनी आघाडीची घोषणा केली आहे. या आघाडीचे नाव सामाजिक परिवर्तन मोर्चा असे ठेवण्यात आले आहे. ही आघाडी यूपीतील सर्व ४०३ विधानसभा जागांवर निवडणूक लढवणार आहे.गुरुवारी लखनौमध्ये झालेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत ओवेसी म्हणाले की, चंद्रशेखर हे यूपीमध्ये मुख्यमंत्रिपदाचा चेहरा असतील. भाजपला



रोखण्यासाठी आमचा मोर्चा मजबूत पर्याय ठरेल.खासदार चंद्रशेखर म्हणाले की, हा तिसरा मोर्चा नसून पहिला मजबूत मोर्चा असेल. मोठ्या आघाडीत सहभागी होण्याचा प्रयत्न केला, मात्र आम्हाला कमकुवत समजले गेले.यूपीमध्ये मुस्लिम लोकसंख्या १९% आणि दलित लोकसंख्या २१% आहे. आघाडीचे लक्ष्य या ४०३ लोकसंख्येच्या मतांवर आहे. या आघाडीचा थेट परिणाम समाजवादी पक्ष आणि बहुजन समाज पक्षाच्या मतपेढीवर होऊ शकतो.मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यावर निशाणा साधत ओवेसी यांनी

- उत्तर प्रदेशात चंद्रशेखर-ओवेसी यांच्या पक्षांमध्ये आघाडी:
- सर्व ४०३ जागांवर लढणार
- राज्यात ४०% दलित-मुस्लिम मते

विचारले की, १० एप्रिल रोजी अंतिम एसआयआर (SIR) प्रसिद्ध झाल्यानंतर ➪(पान २ वर)




जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
e paper www.janmadhyam.com

# महायुतीमधून बाहेर पडून CM होण्याचा अजितदादांचा प्लान

## काँग्रेसच्या बड्या नेत्याच्या दाव्याने खळबळ, विमान अपघातावरही महत्त्वाचे बोलले

**मुंबई/ प्रतिनिधी-** राष्ट्रवादीच्या विलिनीकरणावरून दादांच्या राष्ट्रवादीत राजकीय घडामोडींना वेग आला आहे. राष्ट्रवादीच्या विलिनीकरणावरून नेत्यांच्या बैठकांची मालिका सुरूच आहे. राष्ट्रवादीच्या विलिनीकरणावरुन सुनेत्रा पवार यांनीही एक विधान करून सस्पेन्स वाढवला आहे. दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाच्या चर्चेदरम्यान काँग्रेस नेते अतुल लोंढे यांच्या एका विधानाने खळबळ उडाली आहे. महायुतीमधून बाहेर पडून ण्श होण्याचा अजितदादांचा प्लान होता, असा दावा काँग्रेस नेते अतुल लोंढे यांनी केला आहे. लोंढे यांच्या दाव्याने चर्चांना उधाण आलं आहे.अतुल लोंढे यांनी माध्यमांशी संवाद साधत राष्ट्रवादीच्या विलिनीकरणावर मोठं भाष्य केलं. अतुल लोंढे म्हणाले, 'आज मी शरद पवार यांची भेट घेणार आहे.



पान १ व १० वरून

### माझा भाऊ ज्यादिवशी गेला,

**अजित पवार मविआतून मुख्यमंत्री होणार होते?**

दरम्यान काँग्रेसचे प्रवक्ते अतुल लोंढे यांनी वेगळाच दावा केला आहे. टीव्ही ९ वृत्तवाहिनीशी बोलताना ते म्हणाले की, अजित पवार यांना महायुतीतून बाहेर पडायचे होते. पुन्हा महाविकास आघाडीच्या माध्यमातून ताकदीने लढायची त्यांची योजना होती. मात्र लोंढे यांचे विधान राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी फेटाळून लावले आहे. लोंढे केवळ प्रसिद्धीसाठी हे बोलत असल्याचे ते म्हणाले. महायुतीकडे २३८ आमदार आहेत. काँग्रेसकडे २० च्या आसपास आमदार आहेत. सरकार बनविण्यासाठी किती संख्याबळ लागते, याची लोंढे यांना कल्पना असावी, असा टोला तटकरे यांनी लगावला.

### सीमांकन विधेयकासाठी केंद्राच्या

करू इच्छीत आहे. गेल्या विधेयकाआधारे तयार केलेल्या नव्या मसुद्यात १९७१ च्या लोकसंख्या गणतीनुसार राज्यांच्या जागांचा कोटा कायम ठेवण्याचा प्रस्ताव आहे.

**काँग्रेसचा हल्लाबोल-** संसदेच्या अधिवेशनावरून काँग्रेस आक्रमक झाली आहे. ९ नोव्हेंबर रोजी काँग्रेसचे महासचिव जयराम रमेश यांनी म्हटले होते की, संसद अनिश्चितकाळासाठी स्थगित करण्याच्या प्रक्रियेला ८८ दिवस झाले आहेत, परंतु त्याचे सूप वाजलेले नाही. आज एक नवीन विक्रम झाला आहे. केंद्रीय गृहमंत्र्यांना धोकादायक आणि विनाशकारी मतदारसंघ पुनर्रचना विधेयक मंजूर करण्यासाठी लोकसभेत कसे तरी 'संशयास्पद' दोन-तृतीयांश बहुमत मिळवण्यासाठी वेळ मिळावा, यासाठी हा विक्रम प्रस्थापित झाला आहे.

**आधी सर्वपक्षीय बैठक बोलवा-** काँग्रेस अध्यक्षांनी गेल्या सहा महिन्यांत पंतप्रधानांना चार वेळा पत्र लिहून, मतदारसंघ पुनर्रचनेवर सर्व पक्षांची बैठक बोलावण्याची विनंती केली आहे, जेणेकरून कोणतेही विधेयक आणण्यापूर्वी सर्व प्रस्तावांवर पारदर्शकपणे आणि सविस्तरपणे चर्चा करता येईल. पंतप्रधानांनी तसे करण्यास स्पष्टपणे नकार दिला आहे, असेही जयराम रमेश यांनी म्हटले.

### अग्निवीरांना थेट राष्ट्रीय

पहिली तुकडी चार वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करत असल्याने आणि नवीन सुधारित योजना लागू झाल्याने या धोरणाचा आढावा घेतला जात आहे. यासोबतच अग्निवीरांचे विवाह आणि रजेचे नियमही बदलण्याच्या विचारात आहेत.

**सुधारित अग्निपथ योजना-** केंद्रीय मंत्रिमंडळाच्या मंजुरीनंतर ४ नोव्हेंबर रोजी संरक्षण दलप्रमुख जनरल एन. एस. राजा सुब्रमणी यांनी सुधारित अग्निपथ योजनेची घोषणा केली. ही सुधारित योजना केवळ सध्या सेवेत असलेल्या ३ लाख अग्निवीरांना लागू असेल, तर ३१ डिसेंबरनंतर भरती होणा-यांसाठी योजनेत आणखी बदल अपेक्षित आहेत. नव्या तरतुदीनुसार, निकष पूर्ण करणा-या आणि संमती देणा-या सर्व विद्यमान अग्निवीरांना दोन वर्षांच्या वाढीव सेवेनंतर कायमस्वरूपी केले जाणार आहे. जुन्या योजनेनुसार, पहिल्या तुकडीतील २४,४०० अग्निवीरांपैकी ७५ टक्के म्हणजेच सुमारे १८,३०० जवान नोव्हेंबरच्या मध्यापासून ३१ डिसेंबरदरम्यान निवृत्त होणार होते. मात्र, निवृत्तीच्या काही आठवडे आधीच सरकारने या योजनेत मोठे फेरबदल करून जवानांना मोठा दिलासा दिला आहे.

**नागरी आरक्षणाऐवजी पूर्णवेळ लष्करी सेवेचा पर्याय-** तिन्ही दलांकडून पहिल्या तुकडीतील अग्निवीरांशी संवाद साधून त्यांना उपलब्ध पर्याय, पुढील सेवेचे फायदे आणि कायमस्वरूपी भरतीच्या अटी समजावून सांगितल्या जात आहेत. अग्निवीरांना आता पूर्णवेळ लष्करी सेवेचा पर्याय उपलब्ध झाल्याने केंद्रीय सशस्त्र पोलीस दले, राज्य सरकारे आणि संरक्षण सार्वजनिक उपक्रमांमधील त्यांचे आरक्षण रद्द करण्यात आले आहे. त्यामुळे जवानांना योग्य निर्णय घेता यावा, यासाठी लष्कराकडून मार्गदर्शन केले जात आहे. दरम्यान, तिन्ही दलांतील अग्निवीरांच्या नवीन तुकड्या १३ नोव्हेंबर ते ३१ डिसेंबर या कालावधीत प्रशिक्षण पूर्ण करून प्रत्यक्ष सेवेत दाखल होणार आहेत.

### चंद्रशेखर मुख्यमंत्रीपदाचा

बहुसंख्य समाजातील १२.७ दशलक्ष नावे वगळण्याच्या आकड्यापर्यंत कसे पोहोचले. त्यांनी उपरोधिकपणे टिप्पणी केली की, मुख्यमंत्र्यांनी कदाचित गणितात पीएचडी केली असावी. ओवैसी यांनी मागणी केली की, मुख्यमंत्र्यांनी देशनिहाय यादी जाहीर करावी आणि यापैकी किती व्यक्ती बांगलादेशी, पाकिस्तानी किंवा गैर-भारतीय नागरिक आहेत हे उघड करावे.

**ओवैसी यांचा अखिलेश यादव यांच्यावर निशाणा-** अखिलेश यादव यांच्यावर निशाणा साधत ओवैसींनी विचारले की, त्यांच्या गाडीवर गोळीबार झाला होता की त्यांच्या पोटात गोळी लागली होती. ते म्हणाले की, त्यांचे भाऊ चंद्रशेखर आझाद यांच्या पाठीत गोळीच्या जखमेची वेदना अजूनही कायम आहे. ओवैसी म्हणाले की, जे काचेच्या महालात राहतात त्यांनी दगडफेक करू नये. या कुटुंबाने सोसलेल्या हालअपेष्टा ते समजू शकत नाहीत, कारण ते केवळ 'हक्काचे राजकारण' किंवा वारसा राजकारण करतात.

**ओवैसी म्हणाले, अखिलेश माजी मुख्यमंत्री आहेत आणि राहतील-** भाजपला मदत करणाऱ्यांना सुरक्षा पुरवली जाते, या अखिलेश यादव यांच्या वक्तव्यावर ओवैसींनी पलटवार केला. ते म्हणाले की, उद्या जरी त्यांची सुरक्षा काढून घेतली तरी त्यांचा स्पष्टवक्तेपणा तसाच राहील. ते पूर्ण जबाबदारीने आणि आत्मविश्वासाने आपली ध्येये साध्य करतील. त्यांनी पुढे म्हटले की, अखिलेश यादव उत्तर प्रदेशचे माजी मुख्यमंत्री आहेत आणि इंशाअल्लाह ते तसेच राहतील.चंद्रशेखर यांनी घोषणा केली की, संविधान दिनी, २६ नोव्हेंबर रोजी लखनौमधील माता रमाबाई मैदानावर 'बहुजन समाज महासमेलन महारॅली' आयोजित केली जाईल. मंचावरून त्यांनी असदुद्दीन ओवैसी यांना 'असद भाई' असे संबोधून मोठ्या संख्येने रॅलीत सामील होण्याचे निमंत्रण दिले. रॅलीनंतर आघाडी आपला जाहीरनामा प्रसिद्ध करेल, असे त्यांनी सांगितले. तसेच, प्रसारमाध्यमे आणि जनतेच्या सर्व प्रश्नांची उत्तरे भविष्यात दिली जातील, असेही त्यांनी सांगितले.चंद्रशेखर यांनी दावा केला की, 'सोशल चेंज फ्रंट' २०२७ च्या विधानसभा निवडणुकीत सत्तापालट घडवून आणेल. ते म्हणाले की, त्यांचे मन मोठे आहे आणि २०१४, २०१७, २०१९ व २०२२ च्या अयशस्वी आघाड्यांमधून धडा घेऊन त्यांनी एक मोठी आघाडी स्थापन करण्याचा प्रयत्न केला होता. तथापि, अहंकार आणि महत्त्वाकांक्षेने ग्रासलेले लोक कोणाच्याही वेळेचा किंवा प्रतिष्ठेचा आदर करत नाहीत.चंद्रशेखर यांनी आरोप केला की, सध्याच्या सरकारच्या काळात बनावट चकमकी घडल्या, बुलडोझरने मशिदी पाडण्यात आल्या, २५,००० हून अधिक शाळा बंद करण्यात आल्या आणि चार वैद्यकीय महाविद्यालयांमधील आरक्षणावर बंदी घालण्यात आली. ते म्हणाले की, बहुजन थोर पुरुषांचे पुतळे नष्ट केले जात आहेत. भाजप सरकारचे खरे ध्येय संविधान आणि आरक्षण रद्द करणे हे आहे. जो कोणी याकडे डोळेझाक करेल, त्याला दिवसाढवळ्या तारे दाखवले जातील, असा इशारा त्यांनी दिला.शेतकऱ्यांचा मुद्दा उपस्थित करत ते म्हणाले की, सरकारने शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे आश्वासन दिले होते, परंतु साखरेचे भाव ६० रुपयांच्या वर जाऊनही ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ६०० रुपयांचा भाव मिळत नाही.

**दलित अत्याचारांवर विरोधकांचे मौनः चंद्रशेखर**

चंद्रशेखर यांनी राज्यातील दलित, मागासवर्गीय आणि वंचित समुदायांवरील अत्याचारांच्या अनेक घटनांचा उल्लेख केला. ते म्हणाले की, रचना येथे तरुणांचे कान पकडल्याचा एक व्हिडिओ प्रसिद्ध झाला, काकोरीमध्ये पासी समाजातील एका वृद्ध व्यक्तीला अमानुष वागणूक देण्यात आली आणि मेरठमध्ये सोनू कश्यपला जिवंत जाळण्यात आले. त्यांनी कापसद प्रकरण, रायबरेलीतील मेवालाल पासी, अयोध्यातील राम लखन मौर्य, प्रतापगडमधील सौरभ विश्वकर्मा आणि विनोद साहनी यांच्या हत्या, तसेच बधापूर, बिजनौर येथील कश्यप समाजातील तरुण, फिरोजाबादमधील निशा कथारिया आणि लखनौमधील रामशंकर वाल्मिकी यांच्या हत्यांचाही उल्लेख केला. त्यांनी असा आरोप केला की, पीडीएचे हितचिंतक असल्याचा दावा करणाऱ्या विरोधी नेत्यांनी या घटनांवर एक शब्दही उच्चारलेला नाही.

**चंद्रशेखर म्हणाले, साडे नऊ वर्षांत बहुजन समाज सुरक्षित नाही**

चंद्रशेखर म्हणाले की, २०१४ ते २०२४ पर्यंत लोकांनी भाजपला सत्तेतून बाहेर काढण्याचे आश्वासन देणाऱ्यांवर विश्वास ठेवला, पण कमकुवत होण्याऐवजी भाजप अधिक मजबूत झाला आहे. ते म्हणाले, स्वतःवर लादलेला राष्ट्रीय सुरक्षा कायदा (NSA) आणि २ एप्रिलच्या आंदोलनाशी संबंधित खटले मागे घेण्यात आलेले अपयश हे मुद्दे उपस्थित केले. त्यांनी हाथरस घटना, प्रयागराजमधील गोहरी हत्याकांड, गोरखपूरमधील अनिश कानोजिया आणि कासगंजमधील अल्ताफ यांचा पोलीस कोठडीतील मृत्यू यांचा दाखला देत सरकारवर टीका केली. चंद्रशेखर यांनी असा आरोप केला की, स्वातंत्र्यापासून सर्व राजकीय पक्षांनी बहुजन समाजाला मुख्य प्रवाहात आणण्याचे आश्वासन दिले आहे, परंतु सत्तेवर आल्यानंतर त्यांनी समाजाला वाऱ्यावर सोडून दिले आहे. आजही गरीब वस्त्यांमध्ये चांगल्या शाळा, रुग्णालये, रस्ते आणि स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सोय नाही. त्याचबरोबर, महागडी वीज आणि करांचा बोजा कायम आहे. शिक्षणासाठी कर्ज घेतलेले तरुण बेरोजगार आहेत. जे आपल्या हक्कांसाठी आवाज उठवतात, त्यांच्यावर लाठीचार्ज केला जातो आणि खटले दाखल केले जातात.

### पेट्रोलमधील इथेनॉलचे

अतिप्रमाण मिश्रणाबाबत कोणतीही तक्रार मिळालेली नाही, परंतु कर्नाटकातून समोर आलेल्या आरोपांमुळे खबरदारीचा उपाय म्हणून राज्य सरकारने ही तपासणी करण्याचा निर्णय घेतला आहे. जर चाचणीत पेट्रोलमध्ये २० टक्क्यांपेक्षा जास्त इथेनॉल असल्याचे आढळले, तर कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा मंत्र्यांनी दिला आहे. कर्नाटकचे अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री रिझवान अर्शद यांनी सांगितले की, सात जिल्ह्यांतील ६३ नमुन्यांच्या चाचणीत असे दिसून आले की, पाचपैकी चार नमुन्यांमध्ये इथेनॉलचे प्रमाण २० टक्क्यांपेक्षा जास्त होते.

**इथेनॉलचे सर्वाधिक प्रमाण ३१.२ टक्के आढळले**

यामध्ये इथेनॉलचे सर्वाधिक प्रमाण ३१.२ टक्के इतके आढळले. हे नमुने इंडियन ऑइल कॉर्पोरेशन (आयओसी), भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन (बीपीसीएल), हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन (एचपीसीएल), नायरा एनर्जी, शेल आणि मंगलोर रिफायनरी अँड पेट्रोकेमिकल्स लिमिटेड द्वारे पुरवठा केल्या जाणा-या इंधनाच्या विक्री केंद्रांवरून गोळा करण्यात आले होते. वाहनचालकांकडून इंधन कार्यक्षमता (मायलेज) कमी मिळणे आणि वाहनांच्या वारंवार दुरुस्तीची गरज भासणे, अशा तक्रारी आल्यानंतर ही तपासणी मोहीम हाती घेण्यात आली होती.

**केन्द्राने आरोप फेटाळले-** केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने कर्नाटकाचे आरोप फेटाळून लावले आहेत. मंत्रालयाचे म्हणणे आहे की, सार्वजनिक क्षेत्रातील तेल विपणन कंपन्यांनी केलेल्या चाचण्यांमध्ये कर्नाटकाच्या निष्कर्षांना पुष्टी मिळालेली नाही. केंद्र सरकारने प्रसिद्ध केलेल्या निवेदनात मंत्रालयाने म्हटले आहे की, २७ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये तपासण्यात आलेले ई-२० पेट्रोलचे सर्व ८९३ नमुने, इथेनॉलच्या विहित १९ ते २१ टक्के मर्यादेत असल्याचे आढळले आहेत. यापैकी ५६ नमुने कर्नाटकातील होते.

### शासकीय योजनांतून आदिवासींचा

संघर्ष आणि स्वातंत्र्य लढ्यातील अतुलनीय योगदानातून आदिवासी समाजासमोर मोठा आदर्श निर्माण केला आहे. या समाजाला विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी केंद्र व राज्य शासनाने विविध कल्याणकारी योजना आखल्या आहेत.या योजनांचा लाभ प्रत्येक आदिवासी कुटुंबापर्यंत पोचविण्यासाठी राज्यशासन प्रयत्न करीत आहे. ११ ते १८ नोव्हेंबर दरम्यान जनजातीय गौरव दिवस सेवा सप्ताह साजरा होत असून या सप्ताहात निमकुंडसह मेळघाटातील सर्व आदिवासी गावांमध्ये शासनाच्या सर्व योजना पोचविण्यात येतील असे त्यांनी सांगितले. या गावात पर्यटनाच्या माध्यमातून रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी आराखडा तयार करण्यात येईल. सध्या गावात सुरू असलेली पाणी पुरवठा योजना अपुरी असल्याने नव्याने तयार करण्यात आलेल्या ३ कोटी ४४ लाख खर्चाच्या योजनेस मंजुरी देण्यात येणार, तसेच या गावासाठी अन्य विकास कामांसाठी ५० लाखांच्या निधीतून कामे राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. तत्पूर्वी, गावचे उपसरपंच अनिल अकोले यांनी स्वागतपर भाषण केले. आमदार केवलराव काळे यांनी प्रास्ताविक केले तर आमदार प्रवीण पोटे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

**आदिवासी बांधवाच्या घरात फराळ-** सर्वत्र दिवाळी सणाचा उत्साह असताना पालकमंत्री बावनकुळे यांची निमकुंड आदिवासी गावाला भेट असल्याने त्यांनी समस्त गावकऱ्यांसाठी फराळ आणला व त्यांना प्रेमाने वाटप केले. त्यांच्या या प्रेमळ व आपुलकीच्या वागणुकीने गावकरी भावूक झाले होते. शासनातील मंत्री आपल्यासोबत दिवाळी साजरी करीत असल्याचा आनंद गावातील लहानग्यांपासून, महिला,पुरुष व ज्येष्ठ नागरिकांमध्ये दिसून आला. विविध शासकीय योजनांच्या लाभाचे वितरणही पालकमंत्र्यांच्या हस्ते यावेळी करण्यात आले. या कार्यक्रमानंतर पालकमंत्री थेट गावातील अशोक चिताराम आठवले यांच्या घराकडे वळले. सडा सारवन, त्यावर सुरेख रांगोळी आणि कौलारू व आकर्षक रंगरंगोटी केलेल्या या मातीच्या छोट्याशा घरात आठवले कुटुंबीयांनी पालकमंत्र्यांना खास घरगुती फराळ दिला व चहापान केले. लोकप्रतिनिधी व प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.पालकमंत्र्यांनी अशोक आठवले यांची आई जसाय, पत्नी सुनीता आणि मुलं अंश व आरोह यांची आस्थेने विचारपूस केली. त्यांच्या अडचणी समजून घेतल्या व त्या सोडविण्यासाठी प्रशासनाला निर्देशही दिले.

### बिरला रेल्वे कॉलनीत

स्थापन केला आहे. 'ऑपरेशन प्रहार'अंतर्गत जिल्ह्यातील प्रत्येक पोलीस ठाणे तसेच स्थानिक गुन्हे शाखेमार्फत विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेत आतापर्यंत अमली पदार्थाविरोधात २२ कारवाया करण्यात आल्या असून, १८५ किलो मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या मुद्देमालाची किंमत ८८ लाख ८३ हजार रुपये असल्याची माहिती पोलिसांनी दिली.अमली पदार्थांची विक्री, साठवणूक, वाहतूक अथवा अन्य अवैध धंद्यांबाबत माहिती असल्यास नागरिकांनी अमली पदार्थविरोधी कक्षाचे सहायक पोलीस निरीक्षक निलेश देशमुख यांच्याशी ८८८८०९६०४६ या क्रमांकावर संपर्क साधावा. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक डॉ. निलेश पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर, सहायक पोलीस निरीक्षक निलेश देशमुख, अनिल चव्हाण तसेच पोलीस अंमलदार शेख हसन, भास्कर धोत्रे, अब्दुल माजिद, खुशाल नेमाडे, वसीमोद्दीन, एजाज अहमद, विलास बंकावार, राहुल गायकवाड, श्रीकांत पातोंड, मोहम्मद आमीर, मंगेश नागापुरे, अशोक सोनवणे, भीमराव दिपके आणि वाहनचालक मनीष ठाकरे यांच्या पथकाने केली.

### नोटा मोजून देण्याच्या

म्हणत त्याने विश्वास संपादन केला. वृद्ध महिलेनेही त्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवून आपल्या हातातील २५ हजार रुपये त्याच्याकडे मोजण्यासाठी दिले. त्या इसमाने पैसे मोजण्याचा बहाणा केला आणि काही क्षणांतच नोटा परत केल्या. त्यानंतर तो कोणतीही शंका येऊ न देता बँकेबाहेर पडला आणि स्कूटीवरून पसार झाला. दरम्यान, पैसे कमी असल्याची शंका आल्याने कमलाबाई यांनी पुन्हा स्वतः नोटा मोजल्या. मात्र, रक्कम कमी असल्याचे लक्षात येताच त्यांनी बँकेतील कॅशियर यांच्याकडे धाव घेतली. कॅशियर यांनी मशीनद्वारे नोटांची मोजणी केली असता, त्यांच्याकडे केवळ ५०० रुपयांच्या २९ नोटा म्हणजेच १४ हजार ५०० रुपये असल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे अनोळखी इसमाने २५ हजार रुपयांमधून १० हजार ५०० रुपये हातचलाखीने लंपास केल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यानंतर कमलाबाई यांनी बँकेच्या परिसरात तसेच आजूबाजूला त्या इसमाचा शोध घेतला; मात्र तो कुठेही आढळून आला नाही. संशयित इसमाचे वय अंदाजे ३५ वर्षे असून तो लंगडत चालत असल्याचे त्यांनी पोलिसांना दिलेल्या तक्रारीत नमूद केले आहे. पैसे मोजून देण्याच्या बहाण्याने वृद्ध महिलेला गाठून तिची फसवणूक करणाऱ्या या अज्ञात इसमाविरुद्ध तिवसा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

### अखेर २४ दिवसांनी फरार

बदनामीही टळेल, असे आश्वासन दिल्याचे पीडितेने तक्रारीत नमूद केले. त्यानुसार १५ ऑक्टोबर रोजी याच रुग्णालयात पीडितेची प्रसूती झाली. तिने एका बालिकेला जन्म दिला. दुसऱ्या दिवशी ती घरी गेल्यानंतर दोन महिलांकडून तिच्या बालिकेची साडेतीन लाख रुपयांत विक्री होणार असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पीडिता आणि तिची आई डॉक्टरांकडे गेल्या. तेथे बालिकेच्या ताब्यावरून वाद निर्माण झाला आणि पुढे पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली. या प्रकरणात पोलिसांनी डॉ. वैशाली भोजने, त्यांचे पती प्रफुल्ल भोजने आणि एका अल्पवयीन मुलाविरुद्ध गुन्हा दाखल केला होता. यापूर्वी अल्पवयीन आरोपीला ताब्यात घेण्यात आले, तर डॉ. वैशाली भोजने यांनाही अटक करण्यात आली. मात्र, घटनेनंतर प्रफुल्ल भोजने यांच्यासह दाम्पत्य फरार झाले होते. पोलिसांनी रुग्णालयातील संगणकीय माहिती तपासण्यासोबतच नर्स आणि कर्मचाऱ्यांचे जबाब नोंदविले होते. दाम्पत्य परदेशात पळून जाण्याची शक्यताही व्यक्त केली जात होती. दाम्पत्याला अटक होत नसल्याने पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी या प्रकरणात लक्ष घालून फ्रेजरपुरा पोलिसांना सूचना दिल्या होत्या. तसेच गुन्हे शाखेलाही दाम्पत्याला तातडीने अटक करण्याचे आदेश दिले होते. ते देशाबाहेर जाऊ नयेत, यासाठी लुकआऊट सर्क्युलर (एलओसी) प्रक्रियेबाबतही निर्देश देण्यात आले होते.

दरम्यान, फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक मिलिंद हिवरे यांना वैशाली आणि प्रफुल्ल भोजने हे साईनगर परिसरात असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक रविंद्र राजुलवार यांना माहिती दिली. त्यानंतर डीबी पथक आणि महिला पोलीस कर्मचाऱ्यांच्या मदतीने साईनगर परिसरात शोधमोहीम राबविण्यात आली. यावेळी दोघांनाही ताब्यात घेऊन अटक करण्यात आली. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला आणि पोलीस उपायुक्त प्रांजली सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक रविंद्र राजुलवार, पोलीस उपनिरीक्षक मिलिंद हिवरे यांच्यासह पाटील, शेखुवाले, बोरकर, सागर, जावेद, प्रशांत, जयेश, अखिल आणि पराळे यांनी केली. आता पोलीस कोठडीदरम्यान या कथित बाळ विक्री प्रकरणातील आर्थिक व्यवहार, संबंधित व्यक्ती आणि इतर संभाव्य सहभागाची माहिती तपासातून पुढे येण्याची शक्यता आहे.

### स्वतच्याच पैशांसाठी ठेवीदारांची

मिळाला नँसल्याने ग्राहकांचा संताप अधिकच वाढला आहे.

या गंभीर प्रकरणाची दखल घेत आम आदमी पार्टी, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट), भारतीय कम्युनिस्ट पार्टी, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, क्रांतिकारी शेतकरी संघटना, प्रहार संघटना, जनता दल (से.) तसेच निर्मल उज्वल सोसायटीचे पीडित ग्राहक एकत्र आले आहेत. त्यांच्या वतीने मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य आणि केंद्रीय सहकार मंत्री यांना उपविभागीय अधिकारी, चांदूर रेल्वे यांच्यामार्फत संयुक्त निवेदन देण्यात आले.निवेदनात ठेवीदारांची खातेनिहाय अधिकृत यादी तयार करून सार्वजनिक करणे, संस्थेच्या स्थावर व जंगम मालमत्तेची माहिती घेऊन ती सुरक्षित करणे, आर्थिक व्यवहारांचे विशेष व फॉरेन्सिक ऑडिट करणे, दोषी संचालक व पदाधिकाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करणे तसेच केंद्र व राज्य सरकारच्या समन्वयातून ठेवीदारांच्या परतफेडीचा पारदर्शक आणि कालबद्ध आराखडा जाहीर करण्याची मागणी करण्यात आली आहे. याशिवाय चांदूर रेल्वे येथे स्वतंत्र मदत कक्ष स्थापन करून नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करावी आणि ठेवीदारांना त्यांच्या पैशांच्या परतफेडीबाबत लेखी माहिती द्यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

निवेदन प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत ठोस निर्णय घेऊन प्रत्यक्ष कार्यवाही सुरू करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. अन्यथा चांदूर रेल्वेतील सर्व पीडित ठेवीदारांना सोबत घेऊन तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. या आंदोलनाची संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची राहील, असेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. निवेदन देतेवेळी नितीन गवळी यांच्या नेतृत्वात मेहमूद हुसैन, विनोद जोशी, बंडू यादव, रामदास कारमोरे, श्याम खोडे, प्रशांत शिरभाते, भूषण नाचणकर, मंगेश डाफ, प्रभाकर भगत, सूर्यकांत गुडधे, सुमेध सरदार, संघपाल हरणे, विलास शहारे, सुनील राऊत, विनोद लहाने, अनिल भेंडे, मधुकर गावंडे, अशोक बनसोड, प्रदीप माकोडे, अतुल अंबापुरे, आशिष जयस्वाल, कॉम्रेड देविदास राऊत, सुधीर शिरसागर, अमित बेले, राम घोडे, गणेश होले, योगेश बजाज, सुशील मोदी, अरुण देशमुख, राहुल आठवले, सूरज आठवले, सय्यद रहमत, सुनील चौधरी, साधू खरुले, गौरव कुटेमाटे, बादर खान, शुभम कातोरे, दादाराव होले यांच्यासह विविध पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि पीडित ठेवीदार उपस्थित होते.

### नांदगाव शहरात प्लास्टिक

इशारा आरोग्य अभ्यासकांकडून सुद्धा देण्यात आला. राज्य शासनाने एकदाच वापरात येणाऱ्या प्लास्टिक पिशवी व प्लास्टिक कप यावर बंदीची अंमलबजावणी करण्याचे आदेश असून सुद्धा नांदगाव शहरात या नियमाचे खुलेआम खुल्लंघन होत आहे व न.प कडून कोणतीही कारवाई केल्या जात नाही. या प्लास्टिक वापर करणाऱ्याविरुद्ध कारवाई करून नागरिकांचे आरोग्य व पर्यावरण संरक्षणाकरीता सहकार्य करावे. नप ने प्लास्टिक बंदीची कारवाई कागदोपत्री न करता व्यापक मोहीम राबवून प्लॅस्टिक बंदीची कारवाई करण्यात यावी अशी नागरिकाकडून अपेक्षा व्यक्त होत आहे.

### तडीपार आदेशाचे उल्लंघन

तडीपारीचा आदेश लागू असतानाही दोघेही सक्षम अधिकाऱ्याची पूर्वपरवानगी न घेता अमरावती शहरात आढळून आले. याबाबत मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे बडनेरा पोलिसांनी पंचांसमक्ष खातरजमा केली. त्यानंतर दोघांविरुद्ध बडनेरा पोलीस ठाण्यात स्वतंत्रपणे महाराष्ट्र पोलीस कायद्याच्या कलम १४२ नुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके आणि सहाय्यक पोलीस आयुक्त नयन अलुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. बडनेरा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पुनीत कुलट, पोलीस उपनिरीक्षक अनिस सावरकर, डीबी पथकातील पोलीस हेडकॉन्स्टेबल कैलास जाधव, सागर सरदार, इजाज शहा, पोलीस कॉन्स्टेबल अतुल तायडे तसेच चालक राजेश वाल्मीक यांनी या कारवाईत सहभाग घेतला.

### सातबंगल्यातील घरफोडीचा गुन्हे

तपासात निष्पन्न झाले. गुन्हा केल्यानंतर पोलिसांना चकवा देण्यासाठी हे आरोपी जिल्ह्याबाहेर वास्तव्यास जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यामुळे गुन्हे शाखेच्या पथकाने गोपनीय बातमीदारांचे जाळे सक्रिय करून आरोपींच्या हालचालींवर लक्ष ठेवले होते.

११ नोव्हेंबर रोजी रात्री हे दोन्ही आरोपी अमरावती बस डेपोत येणार असल्याची खात्रीशीर माहिती गुन्हे शाखेला मिळाली. त्यानुसार पोलिसांच्या पथकाने सायन्सकोर मैदानाच्या गेटजवळ सापळा रचला. काही वेळाने दोन संशयित इसम तेथे येताना दिसताच पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. अंगझडतीदरम्यान त्यांच्याकडे सोन्याचे दागिने आढळून आले. पोलिसांनी विश्वासात घेऊन विचारपूस केली असता, हे दागिने सातबंगला परिसरातील घरफोडीतून चोरल्याची कबुली त्यांनी दिल्याचे पोलिसांनी सांगितले.पोलिसांनी आरोपींकडून गुन्ह्यातील काही मुद्देमाल जप्त केला आहे. तर काही सोन्याचे दागिने अमरावतीच्या सराफा बाजारात विकल्याची माहिती आरोपींनी दिली. पुढील तपास आणि कायदेशीर कारवाईसाठी दोन्ही आरोपींना नांदगाव पेठ पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.पोलिसांनी आरोपींच्या ताब्यातून २ लाख २१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदर कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके, श्याम घुगे, प्रांजली सोनवणे आणि सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) निलेश ब्राम्हणे यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक अतुल वर आणि दिनेश दहातोंडे यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक दशरथ आडे, पोलीस उपनिरीक्षक गजानन सोनुने, राहुल महाजन, सचिन माकोडे यांच्यासह गुन्हे शाखेच्या पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केली.

**अनेक जिल्ह्यांत गुन्हे दाखल-** ताब्यात घेतलेल्या आरोपींमध्ये शेख जावेद उर्फ बबलू शेख भुरू (वय ५०, रा. शारदा लेआउट, हनुमाननगर, खरबी, नागपूर, ह.मु. जोगेश्वरी, वाळूज एमआयडीसी, संभाजीनगर) आणि सैयद तौसीफ सैयद आसिफ (वय २५, रा. रहमतनगर) यांचा समावेश आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, या दोघांविरुद्ध अमरावती शहर, अमरावती ग्रामीण, अकोला, नागपूर आणि संभाजीनगर येथे घरफोडी व जबरी चोरीसारखे गुन्हे दाखल आहेत

### जागतिक मधुमेह दिनानिमित्त

वंशपरंपरा, व्यायामाचा अभाव, इत्यादी बाबी जबाबदार आहेत.अनियंत्रित मधुमेहामुळे नेत्रांचे आजार, रक्तदाब, मूत्रपिंडाचे आजार, हृदयविकार, पक्षाघात, लैंगिक समस्या, मज्जातंतूंचे आजार, गँगरीन, इत्यादी गंभीर समस्या निर्माण होतात. मधुमेह या आजाराबाबत प्रभावी जनजागृतीकरीता १९९६ साली डायबेटिक असोसिएशनची स्थापना करण्यात आली. या असोसिएशन तर्फे ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांकरिता रक्ततपासणी व मार्गदर्शन शिबीराचे आयोजन करीत आहे. या कार्यात जिल्हा सामान्य रुग्णालय व डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय यांचे व इतरही सामाजिक संघटनांचे सहकार्य मिळत आहे.मधुमेहींचे जीवनशैली विकसीत व्हावी या करीता डायबेटिक असोसिएशन चे संस्थापक अध्यक्ष व खासदार डॉ. अनिल बोंडे यांचे सोबतच माजी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. श्यामसुंदर निकम, डॉ. दिलीप सौंदळे, माजी प्रभारी जिल्हाशल्य चिकित्सक डॉ. प्रमोद निरवणे, माजी अधिष्ठाता डॉ. पं.दे. वैद्यकीय महाविद्यालय डॉ. पद्माकर सोमवंशी, डॉ. दिलीप जाणे, माजी अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख तसेच डायबेटिक असोसिएशन आजीवन सदस्य व मधुमेह व हृदयविकार तज्ञ डॉ. रविंद्र चौरडिया, डॉ. प्रफुल्ल कडू, डॉ. अजय डफळे, डॉ. सुनय व्यास, डॉ. अविनाश चौधरी, डॉ. राजेंद्र ढोरे, डॉ. संजय भस्मे, डॉ. अभिजीत देशमुख, डॉ. किशोर अंबाडकर, डॉ. रविंद्र मुंदे इत्यादींनी सहभाग दिला. रॅलीमध्ये सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पत्रकार परिषदेमध्ये डॉ.अजय डफले, डॉ प्रमोद निरवणे, डॉ. मिलिंद जगताप, डॉ.ए.टी. देशमुख, डॉ .दिनेश वाघाडे, डॉ. पंकज बागडे, एड. रोहित जैन, विनोद सावळे, महेंद्र भन्साली, डॉ. स्वप्नील शीरभाते, डॉ रोहित चोरडिया, डॉ. विनीत साबू, डॉ. प्रवीण राठी, राजेश पिदडी आदि उपस्थित होते.

**बाल मधुमेहींसाठी मोफत केंद्र-** बालमधुमेही करीता डायबेटिक असोसिएशन व जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती तर्फे व डॉ. पं.दे.स्मृ. वैद्यकीय महाविद्यालय यांचे सहकार्याने प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या शुक्रवारी सकाळी १० ते १२ या कालावधीत जिल्हा सामान्य रुग्णालयात वॉर्ड नं. ९ च्या बाजूला निःशुल्क बाल मधुमेह उपचार व औषधी केंद्र २०२४ पासून कार्यान्वित करण्यात आले आहे. सदर प्रकल्पाला खासदार डॉ. अनिल बोंडे यांचे विशेष सहकार्य लाभले आहे. या ठिकाणी वय वर्षे २५ पर्यंतच्या बाल मधुमेहींना निःशुल्क इन्सुलिन, सिरींज, फाईल दिल्या जातात. या उपचार केंद्रावर डॉ. अजय डफळे, डॉ. अभिजीत देशमुख, डॉ. स्वप्निल शिरभाते, डॉ. प्रविण राठी, डॉ. रोहित चौरडिया, डॉ. तृप्ती जवादे, डॉ. दिनेश वाघाडे, डॉ. करिश्मा कडू, डॉ. सोमेश चौधरी, डॉ. स्वप्निल पाटील, डॉ. विक्रम कोकाटे, डॉ. गणेश बनसोड, डॉ. विक्रम रोडे, डॉ. राहुल मोपारी, डॉ. गौरव जगताप, डॉ. सुरज भुतडा, डॉ. स्वानंद लंगे, डॉ. भुषण थोरात, डॉ. आदित्य डागा, डॉ. मोकल तसेच आहार तज्ञ डॉ. वैशाली धनविजय, डॉ. उज्ज्वला ढेबले, डॉ. दिपाली भैसे, इत्यादी सेवा देतात.

# जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

एक प्रतिष्ठित सवय

■ शुक्रवार, १३ नोव्हेंबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# भाऊबीज साजरी करून परतताना काळाचा घाला

## अज्ञात वाहनाच्या धडकेत मायलेकाचा दुर्दैवी मृत्यू



**मायलेकावर शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार**

अपघाताची बातमी पिंप्री फॉरेस्ट गावात पोहोचताच संपूर्ण गावावर शोककळा पसरली. गावचे माजी सरपंच दिवंगत श्रीराम राठोड यांची सून आणि नातू अपघातात मृत्युमुखी पडल्याची बातमी सुरुवातीला ग्रामस्थांना अविश्वसनीय वाटत होती. मात्र, दुर्दैवी वृत्ताची खात्री होताच गावात शोकमग्न वातावरण निर्माण झाले. १२ नोव्हेंबर रोजी उषा राठोड आणि रोणित या मायलेकावर शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी उपस्थित प्रत्येकाचे मन हेलावून गेले. पत्नी आणि एकुलत्या एक मुलाला अग्नी देण्याची वेळ संजय राठोड यांच्यावर आल्याने त्यांची अवस्था पाहून उपस्थितांचे डोळे पाणावले. भाऊबीजेच्या आनंदाचे रूपांतर क्षणात दुःखात झाल्याने संपूर्ण परिसरातून हळहळ व्यक्त होत आहे.

■ प्रतिनिधी | कारंजा ■

भाऊबीजेचा सण साजरा करण्यासाठी भावाच्या घरी गेलेल्या बहिणीवर आणि तिच्या मुलावर काळाने घाला घातल्याची हृदयद्रावक घटना दारव्हा–कारंजा मार्गावरील बोदेगाव साखर कारखान्यानजीक ११ नोव्हेंबर रोजी सायंकाळी सहा वाजताच्या सुमारास घडली. अज्ञात वाहनाने दिलेल्या जोरदार धडकेत आईचा घटनास्थळी मृत्यू झाला, तर उपचारासाठी नागपूर येथे नेत असताना मुलाचाही मृत्यू झाला. उषा संजय राठोड आणि त्यांचा मुलगा रोणित अशी मृत मायलेकाची नावे आहेत.

प्राप्त माहितीनुसार, कारंजा तालुक्यातील पिंप्री फॉरेस्ट येथील रहिवासी संजय श्रीराम राठोड यांच्या पत्नी उषा राठोड व मुलगा रोणित हे भाऊबीज सणानिमित्त मोपेड दुचाकीने दारव्हा येथे आपल्या भावाच्या घरी गेले होते. दिवसा भावाला ओवाळून भाऊबीजेचा आनंद साजरा केल्यानंतर मायलेक सायंकाळी दुचाकीने कारंजाकडे परत येत होते. दरम्यान, बोदेगाव साखर कारखान्यानजीक अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात दोघेही गंभीर जखमी झाले.

अपघातानंतर घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी तातडीने दोघांनाही दारव्हा येथील रुग्णालयात दाखल केले. मात्र, तपासणीनंतर डॉक्टरांनी उषा राठोड यांना मृत घोषित केले. गंभीर जखमी झालेल्या रोणितला पुढील उपचारासाठी नागपूर येथे हलविण्याचा सल्ला देण्यात आला. मात्र, नागपूरला नेत असतानाच त्याचीही प्राणज्योत मालवली. संजय आणि उषा राठोड यांचा रोणित हा एकुलता एक मुलगा होता. त्यामुळे या दुर्घटनेने राठोड कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

भाऊबीजेच्या दिवशी बहिणीने भावाचे औक्षण करून सणाचा आनंद साजरा केला आणि त्यानंतर काही तासांतच तिच्यासह मुलाचा अपघाती मृत्यू झाल्याने या घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. अपघातानंतर धडक देणारा अज्ञात वाहनचालक घटनास्थळावरून पसार झाला असून, याप्रकरणी दारव्हा पोलीस पुढील तपास करीत आहेत.

# भाऊबीजेनिमित्त आ. श्याम खोडे यांच्या हस्ते ८–अ उताऱ्यांचे वितरण

## पांडुरंग कोठाळे यांच्या पुढाकारातून ३५ महिलांना जागेचे पट्टे कायम!

■ प्रतिनिधी | वाशिम ■

शासनाच्या २०११ पूर्वीच्या अतिक्रमणधारकांचे जागेचे पट्टे कायम करण्याच्या निर्णयानुसार मंगरूळपीर तालुक्यातील शेलुबाजार येथील ३५ महिलांना त्यांच्या हक्काच्या जागेचे पट्टे मिळवून देण्यात सामाजिक कार्यकर्ते तथा सावता परिषदेचे कार्याध्यक्ष पांडुरंग कोठाळे यांनी पुढाकार घेतला. त्यांच्या प्रयत्नांना आमदार श्याम खोडे यांच्या सहकार्याची जोड मिळाल्याने ३५ लाभार्थ्यांच्या जागांचे पट्टे नियमाकुल करून त्यांच्या नावे ८-अ उतारे तयार करण्यात आले. भाऊबीजेचे औचित्य साधून आमदार श्याम खोडे यांच्या हस्ते या उताऱ्यांचे वितरण करण्यात आले.

गोरगरीब कुटुंबांना त्यांच्या हक्काच्या जागेचा कायदेशीर अधिकार मिळवून देण्याच्या दृष्टीने पांडुरंग कोठाळे यांनी सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या पुढाकारातून शेलुबाजार ग्रामपंचायत हद्दीतील ३५ लाभार्थ्यांना हा दिलासा मिळाला. भाऊबीजेच्या निमित्ताने आमदारांनी महिलांना दिलेली ही भेट विशेष ठरली.



**महिलांनी औक्षण करून मानले आभार**

यावेळी हिंदू, मुस्लिम व बौद्ध समाजातील महिलांनी आमदार श्याम खोडे यांचे औक्षण करून कृतज्ञता व्यक्त केली. जागेच्या पट्ट्यांचा प्रश्न मार्गी लागल्याने लाभार्थी महिलांमध्ये समाधानाचे वातावरण होते. या कार्यक्रमाला पांडुरंग कोठाळे, बाबाराव पवार, सुदर्शन धोटे, विनोद जाधव, सचिन डोफेकर, विलास लांभाडे, अनिल गोठी, बापूराव चव्हाण, कैलास जाजू, अनिल काटकर, शाहरुख खान, अशोक खंडारे, विशाल खंडारे, विशाल गुप्ता, राम इंगळे, दत्ता खोरणे, विकी सोनटक्के, राम सुर्वे, हरीश पवार, मुरली भोसले, दत्ताभाऊ वाळले यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.सूत्रसंचालन देवानंद जावळे यांनी केले, तर आभार ग्रामपंचायत अधिकारी शामराव महाले यांनी मानले.

## आकाश कंदील, पणती सजावट व शुभेच्छा कार्ड स्पर्धांचे आयोजन



■ प्रतिनिधी | मालेगाव ■

मालेगाव येथील तहसील कार्यालयाजवळ बोरगाव रोडवरील श्री व्यंकटेश सेवा समिती वाशिम द्वारा संचालित बालविकास मंदिर प्राथमिक शाळा, मालेगाव येथे दीपावलीच्या पार्श्वभूमीवर ही 'आकाश कंदील, शुभेच्छा कार्ड बनविणे व पणती सजावट स्पर्धा उत्साहात पार पडली. विद्यार्थ्यांनी पारंपरिक सणाचे महत्त्व समजून घेताना स्वतःच्या कल्पकतेचा वापर करून सुंदर आकाश कंदील तयार केले आणि विविध प्रकारे पणती सजावटीत सहभाग घेतला. सदर स्पर्धेसाठी प्रमुख उपस्थितीत वंदना वाठोरे व शालिनी आमटे उपस्थित होत्या त्यांनी विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या पणती, शुभेच्छा कार्ड व आकाश कंदील यांचे कौतुक केले व परिक्षक म्हणून त्यांचे अनुक्रमे क्रमांक सुद्धा काढले. आकाश कंदील बनविणे स्पर्धा कल्पेश रवी शिंदे(प्रथम क्रमांक), अथर्व स्वप्निल महाकाळ( द्वितीय क्रमांक), वैष्णवी गणेश चोरमले( तृतीय क्रमांक), पणती सजावट स्पर्धा सुदर्शन मोहन चिंचोलकर (प्रथम क्रमांक) कनिष्का शंकर वैद्य( द्वितीय क्रमांक) इशिता तायडे (तृतीय क्रमांक) शुभेच्छा कार्ड बनविणे स्पर्धा आदिती राधेश्याम गवळी( प्रथम क्रमांक) अक्षरा अंकुश सावंत (द्वितीय क्रमांक) चंचल अडीचवाल( तृतीय क्रमांक) विद्यार्थ्यांना आकाश कंदील तयार करण्याच्या पद्धतीबद्दल सजावटीत डिझाईन आणि कलात्मक मांडणी कशी करावी.

# रोहित पठारे हत्याकांडाचा तीव्र निषेध!

## मारेकरी आणि हत्येचा मास्टर माईंड कोण?

■ प्रतिनिधी | वाशिम ■

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वैजापूर शहरामध्ये जुन्या वैमनस्यातून बौद्ध समाजातील तरुण रोहित पठारे याची निर्घृण हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली असून, या अमानुष हत्याकांडामुळे संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली आहे . एका तरुणाचा अशा प्रकारे जीव घेण्यात आल्याने सामाजिक स्तरातून तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. या घटनेचा सामाजिक कार्यकर्ते वसंतराव हिवराळे यांनी तीव्र शब्दांत निषेध नोंदवून आरोपींना तातडीने अटक करण्याची आणि त्यांना कठोरात कठोर शिक्षा देण्याची मागणी केली आहे.



**सामाजिक कार्यकर्ते वसंतराव हिवराळे यांची मागणी**

रोहितच्या कुटुंबीयांकडून मिळालेल्या माहितीनुसार जुन्या वैमनस्यातून रोहितला लक्ष करण्यात आले , त्याला भर चौकातून फिरवण्यात आले आणि सर्वांसमक्ष अमानूषपणे बेदम मारहाण करण्यात आली, या जीवघेण्या मारहाणीत तो गंभीर जखमी झाला . अखेर या दुर्दैवी घटनेत त्याला आपला जीव गमवावा लागला . या प्रकरणातील धक्कादायक खुलाशामुळे राज्यभरात संतापाची लाट उसळली असून कायदा व सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे . एखाद्या व्यक्तीशी वयक्तिक वैमनस्य असले तरी त्यातून कायदा हातात घेऊन एखाद्याचा जीव घेण्याचा अधिकार कोणालाही नाही. घडलेली घटना ही माणुसकीला काळीमा फासणारी घटना असून हा प्रकार समजातील सुरक्षिततेच्या भावनेला धक्का देणारा आहे म्हणून पोलिस प्रशासनाने या प्रकरणातील सर्व आरोपींची निष्पक्ष व सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी हिवराळे यांनी केली.

## नगराध्यक्ष अनिल केंदळे यांच्याकडून 'लाडक्या बहिणीं'ना साड्या आणि फराळ वाटप

■ प्रतिनिधी | वाशिम ■

दिवाळीच्या पावन पर्वाचे औचित्य साधत वाशिम नगर परिषदेचे नगराध्यक्ष अनिल माधवराव केंदळे यांनी सामाजिक बांधिलकी जपत एक स्तुत्य उपक्रम राबविला. भाऊबीजेच्या पूर्वसंध्येला वाशिम शहरातील विविध गरीब वस्त्यांमध्ये जाऊन नगराध्यक्षांनी वंचित कुटुंबांना दिवाळीचा फराळ आणि 'लाडक्या बहिणीं'ना साड्यांचे वाटप केले. बहिणींप्रती प्रेम, आपुलकी आणि सन्मान व्यक्त करत त्यांच्या दिवाळीचा आनंद द्विगुणित करण्याचा एक भावनिक प्रयत्न या माध्यमातून करण्यात आला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानुसार आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रेरणेतून समाजातील शेवटच्या घटकापर्यंत सणाचा आनंद पोहोचावा, या हेतूने हा सेवाभावी उपक्रम राबविण्यात आला. नगराध्यक्ष म्हणून केवळ शहराच्या भौतिक विकासकामांची जबाबदारी न सांभाळता, समाजातील प्रत्येक घटकाच्या सुख-दुःखात सहभागी होणे हे आपले आद्य कर्तव्य आहे, अशी भावना यावेळी अनिल केंदळे यांनी व्यक्त केली. साड्या आणि फराळ स्वीकारताना गरीब भगिनींच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद आणि त्यांनी दिलेल्या प्रेमळ शुभेच्छा हीच माझ्यासाठी दिवाळीची खरी भेट असल्याचे केंदळे यांनी सांगितले.



'अंत्योदय' या संकल्पनेला प्राधान्य देत समाजातील शेवटच्या घटकापर्यंत आनंद, आपुलकी आणि माणुसकीचा प्रकाश पोहोचावा, याच उदात्त भावनेने हा उपक्रम पार पडला.

## चोरीची मोटारसायकल विक्रीसाठी फिरणारा ताब्यात!

### रिसोडमधून संशयिताला घेतले ताब्यात; चोरीची मोटारसायकल हस्तगत



■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यातील वाहन चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे-पाटील यांनी वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याचे निर्देश दिले होते. या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर आडे यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या होत्या.

दरम्यान, रिसोड शहरातील समर्थ नगर परिसरातून ज्ञानेश्वर भिमराव पवार यांची होंडा शाईन कंपनीची मोटारसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली होती. याप्रकरणी ९ नोव्हेंबर रोजी रिसोड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. त्यावरून गुन्हा क्रमांक ९९९/२०२६, भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला होता.

या गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेकडून सुरू असताना गुप्त बातमीदारामार्फत महत्त्वाची माहिती मिळाली. रिसोड येथील सदानंद टॉकीजजवळील आनंदी चौक परिसरात राहणारा अंकुश विश्वनाथ राऊत (वय ३०) हा तरुण कमी किमतीत मोटारसायकल विक्री करण्यासाठी शहरात फिरत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यामुळे सदर मोटारसायकल चोरीची असण्याचा संशय व्यक्त करण्यात आला.

या माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सिन्हा लाईन रोड, रिसोड परिसरातून अंकुश विश्वनाथ राऊत याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे कसून चौकशी केली असता चोरीच्या मोटारसायकली हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले. या कारवाईमुळे वाहन चोरीच्या प्रकरणाचा उलगडा होण्यास मदत झाली असून, या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## दानिश खडसे याची लक्षद्वीप येथील शैक्षणिक सहलीसाठी निवड

■ प्रतिनिधी | वाशिम ■

शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती करताना अभ्यासासोबतच नवनवीन अनुभव आणि ज्ञानाची शिदोरी मिळविण्याची संधी मिळणे ही विद्यार्थ्यांसाठी अभिमानाची बाब असते. अशीच एक विशेष संधी वाशिम येथील दानिश खडसे याला प्राप्त झाली असून, फादर एग्नेल संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पाच दिवसीय शैक्षणिक अभ्यास दौऱ्यासाठी त्याची लक्षद्वीप येथे निवड करण्यात आली आहे.


वाशिम येथील प्रसिद्ध उद्योजक देवेंद्र खडसे पाटील यांचे नातू तथा दानिश एम्पायरचे संचालक स्वप्निल खडसे पाटील यांचा सुपुत्र दानिश याची या अभ्यास दौऱ्यासाठी निवड झाल्याने खडसे परिवारासह मित्रपरिवार आणि हितचिंतकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. कोर्डेलिया क्रूझच्या माध्यमातून दानिश लक्षद्वीपच्या दिशेने रवाना झाला आहे. दानिश हा अभ्यासात अत्यंत हुशार, जिज्ञासू आणि प्रत्येक काम नियोजनपूर्वक करणारा विद्यार्थी म्हणून ओळखला जातो. केवळ पुस्तकी ज्ञान न घेता प्रत्यक्ष अनुभवातून नवे काही शिकण्याची त्याची वृत्ती कौतुकास्पद आहे. या शैक्षणिक सहलीच्या माध्यमातून त्याला समुद्रकिनारी असलेली भौगोलिक वैशिष्ट्ये, निसर्गसंपदा, सागरी पर्यावरण, स्थानिक संस्कृती आणि विविध विषयांचा प्रत्यक्ष अभ्यास करण्याची संधी मिळणार आहे. दानिशच्या शैक्षणिक आणि व्यक्तिमत्त्व विकासाच्या प्रवासात त्याचे आजोबा देवेंद्र खडसे पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन आणि प्रोत्साहन लाभत आहे.

# माहुली येथील युवकांचा हरीत स्मशानभुमी करण्याचा संकल्प!

■ प्रतिनिधी | मानोरा ■

तालुक्यातील माहुली गावातील युवकांनी गावातील स्मशानभूमीमध्ये हरित मिशन माहुली हा अनोखा संकल्प राबवून पर्यावरण संवर्धन संरक्षण व संगोपनाकरिता एक मोठे पाऊल उचलले आहे. अनोखा संकल्प युवकांनी अंगीकारल्याने असुन गावातील शासकीय निमशासकीय व प्रतिष्ठित व्यक्तींकडून आर्थिक सहायता घेऊन स्मशानभूमीमध्ये देशी वृक्षांची लागवड केली आहे.

यामध्ये कडूनिंब, बेल, कांचन, अर्जुन, कदम, बकुळ, अशोका, वड ,कदम ,जांभूळ अशा विविध झाडांची निवड करून पुढील भविष्याच्या दृष्टिकोनातून या झाडांची निवड केली असून ज्यापासून पर्यावरण संवर्धनासाठी हातभार लागेल तसेच पशु पक्षांसाठी अन्न व निवारा यांचे सुद्धा सोय होणार याकरिता या सर्व झाडांची लागवड केली आहे. झाडांची लागवड करताना प्रत्येक झाडाची उंची साधारण आठ ते दहा फुटांची झाडांची निवड केली असून प्रत्येक झाडाला हवा किंवा वाऱ्यामुळे वाकणार नाही याकरिता काठी तसेच मुख प्राण्यांपासून संरक्षण व्हावे यासाठी ट्री गार्ड सुद्धा बसविण्यात आले आहे. झाडांना पाणी देण्यासाठी सर्व युवानी सुसज्जीत असे आळे सुद्धा तयार केले आहेत, तसेच वृक्ष लागवड करून न सोडता ते सर्व वृक्ष संगोपन संवर्धन व संरक्षणाची जबाबदारी वनश्री निखिल चव्हाण स्वतः व यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस भरती तयारी करणारे गावातील मनोहर जाधव , करण जाधव, रितेश राठोड , आकाश जाधव या युवकांनी जबाबदारी घेतली आहे या संकल्पकरिता गावातील माहुली खालील मान्यवर यांनी आर्थिक स्वरूपात मदत केली आहे हे सर्व मान्यवर माहुली गावातील रहिवासी असून गावा प्रती असलेले प्रेम स्नेह याकरिता सदैव सहकार्य करतात हरित मिशन माहुली करिता प्रकाश राठोड माजी सैनिक , शेषराव आडे शिवसेना उपशहर प्रमुख , माजी सरपंच राम राठोड, ओम प्रकाश आदींचे सहकार्य लाभले.



## डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाळा प्रवेशाने देशवासीयांचे उजळले भवितव्य - अभियंता राजू इंगळे



■ प्रतिनिधी | वाशिम ■

दि.७ नोव्हेंबर २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय येथे कॉस्ट्राईब कर्मचारी संघटनेच्या वतीने डॉ बाबासाहेब आंबेडकर प्रथम शाळा प्रवेश दिन साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जिल्हा परिषद चे अभियंता राजू इंगळे तर प्रमुख उपस्थिती म्हणून से.नि.ग्रामपंचायत अधिकारी रमेश गोटे, पत्रकार प्रल्हाद पौळकर, वाचनालयाचे संस्थापक सचिव समाधान अवचार, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायत अधिकारी अरविंद पडघन, कॉस्ट्राईब कर्मचारी महासंघ वाशीम जिल्हाध्यक्ष हेमंत तायडे, सरपंच सेवा संघाचे विभागीय समन्वयक प्रविण पट्टेबहादूर, मास्टर ट्रेनर प्रभू कांबळे, नालसा जिल्हा शिक्षण समिती सदस्य राजकुमार पडघान यांची उपस्थिती होती.

# पत्रकाराशी असभ्य वर्तन करणा-या रेंजरची चौकशी होऊन कारवाई केली जाईल

## उपवनसंरक्षक माधवराज यांचे पत्रकारांच्या शिष्टमंडळास आश्वासन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

मेडशी येथील वन विभागाच्या लाकूड डेपोच्या कारभाराबाबत वृत्तांकन केल्यामुळे पत्रकार सोयल पठाण यांना अश्लील भाषेत शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याच्या प्रकरणाची गंभीर दखल वन विभागाचे उपवनसंरक्षक माधवराज यांनी घेतली आहे. पत्रकाराशी असभ्य वर्तन करणाऱ्या रेंजरची चौकशी होऊन कारवाई केली जाईल, असे त्यांनी १२ नोव्हेंबर रोजी पत्रकारांच्या शिष्टमंडळाला दिले.

मेडशी ता. मालेगाव येथील वन विभागाच्या लाकूड डेपोमध्ये जप्त वाहने, सागवान व इतर लाकूड ठेवण्यात आले आहे. या डेपोतील सुरक्षिततेचा अभाव, देखभालीतील अनियमितता याबाबत पत्रकार सोयल पठाण यांनी वृत्तांकन केले होते. त्याचा राग मनात धरून वनपरिक्षेत्र अधिकारी संतोष कुरोडे यांनी व्हॉट्सपवरून अश्लील शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप आहे. याबाबतचे स्क्रीनशॉटही उपलब्ध आहेत.या प्रकरणी वाशिम जिल्हा पत्रकार संघ, मालेगाव तालुका मराठी पत्रकार परिषद तसेच वाशिमच्या स्थानिक पत्रकारांनी एकत्रित येऊन पत्रकारांच्या शिष्टमंडळाने उपवनसंरक्षक माधवराज यांची भेट घेऊन निवेदन दिले. यावेळी शिष्टमंडळाने विभागीय चौकशी, पुराव्यांची निष्पक्ष पडताळणी, मेडशी डेपोची स्वतंत्र तपासणी, दोषींवर कठोर शिस्तभंगाची कारवाई आणि पत्रकार सोयल पठाण यांच्या सुरक्षिततेची खबरदारी घेण्याची मागणी केली. शिष्टमंडळाचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतल्यानंतर उपवनसंरक्षक माधवराज यांनी सांगितले की, पत्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे. पत्रकाराशी असभ्य वर्तन करणे कोणत्याही परिस्थितीत योग्य नाही. या प्रकरणाची सखोल चौकशी केली जाईल आणि चौकशीत दोषी आढळल्यास संबंधित रेंजरवर नियमानुसार कठोर कारवाई केली जाईल. तसेच मेडशी डेपोचीही तपासणी केली जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले. यावेळी शिष्टमंडळामध्ये जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष माधवराव अंभोरे, सरचिटणीस विश्वनाथ राऊत, नंदकिशोर शिंदे, शिखरचंद बागरेचा, अजय ढवळे, अतिश देशमुख, गणेश भालेराव, राजेंद्र मानधना, प्रा. अरविंद गाभणे, विनोद तायडे, सुनिल कांबळे, सय्यद इरफान , यशवंत हिवराळे, पप्पु घुगे, विठ्ठल भागवत, यशवंत पेढारकर ,शिवाजीराव खडसे, चंद्रकांत गायकवाड, प्रशांत लोंखडे, मदन देशमुख, सोयल पठाण, कपिल भालेराव, उमेश बारोटे, अजिंक्य मेडशीकर, रितेश देशमुख, नवानिश अक्तर, सचिन साठे, सुभाष बळी, सैय्यद इस्माईल, शेख अनिलस बागवान, सुरेश टेकाळे, गोरखनाथ भागवतआदी पत्रकारांची उपस्थिती होती.



उपवनसंरक्षकांच्या आश्वासनानंतर पत्रकार शिष्टमंडळाने समाधान व्यक्त केले. मात्र, केवळ आश्वासन नको, तर प्रत्यक्षात तातडीने कारवाई व्हावी, अशी अपेक्षा यावेळी शिष्टमंडळाने व्यक्त केली. पत्रकारांच्या लेखणीला धमक्यांनी रोखता येणार नाही, पत्रकारितेचे स्वातंत्र्य आणि पत्रकारांची सुरक्षितता अबाधित राहिली पाहिजे, अशी भूमिका यावेळी पत्रकारांनी मांडली.

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ३४५ ■ शुक्रवार, १३ नोव्हेंबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## पिण्याच्या पाण्याजवळच 'गटारगंगा'; आष्टी बसस्थानक की रोगराईचे आगार

**एसटी महामंडळाचे प्रवाशांच्या आरोग्याकडे अक्षम्य दुर्लक्ष**

**आष्टी (शहीद) जनमाध्यम :** प्रवाशांना सुविधा देण्याची जबाबदारी असलेल्या एसटी महामंडळाच्या आष्टी बसस्थानकात मात्र अस्वच्छतेचे साम्राज्य पसरले आहे. पिण्याच्या पाण्याच्या टाकीजवळच सांडपाणी साचले असून, दुर्गंधीने संपूर्ण परिसर त्रस्त झाला आहे. स्वच्छतागृहांची दुरवस्था, तुटलेले नळ, अस्वच्छ पाण्याची टाकी आणि डुकरांचा मुक्तसंचार अशा समस्यांनी बसस्थानकाला अक्षरशः घाणीचा विळखा घातला आहे. प्रवाशांच्या आरोग्याशी असा उघड खेळ सुरू असताना एसटी प्रशासन नेमके करते तरी काय, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# १९२ किलो एमडीनंतर आता १४३ किलो डोडा; कारंज्यात नशेचे साम्राज्य

## नागपूर नारकोटिक्सचा छापा; स्थानिक पोलिसांना कारवाईची माहिती नसल्याने संशयाचे वातावरण

**वर्धा जनमाध्यम ;** कारंजा तालुक्याचे नाव पुन्हा एकदा अमली पदार्थाच्या मोठ्या साठ्यामुळे चर्चेत आले आहे. वर्षभरापूर्वी याच तालुक्यात तब्बल १९२ किलो एमडीचा कारखाना उद्ध्वस्त करण्यात आला होता. त्या घटनेची चर्चा अद्याप कायम असतानाच आता नागपूर-अमरावती महामार्गावरील पालोरा परिसरातील एका ढाब्यावर नागपूर नारकोटिक्स विभागाने छापा टाकून तब्बल १४३ किलो डोडा पावडर जप्त केल्याची खळबळजनक माहिती समोर आली आहे. ११ नोव्हेंबर रोजी झालेल्या या कारवाईने अमली पदार्थाच्या अवैध व्यवसायाचे जाळे कारंजा तालुक्यात किती खोलवर पसरले आहे, असा गंभीर प्रश्न उपस्थित केला आहे. विशेष म्हणजे, दुसऱ्या जिल्ह्यातील पथकाने येऊन एवढी मोठी कारवाई केली असताना स्थानिक पोलिसांना त्याची माहिती नसल्याचे सांगण्यात आल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, नागपूर पोलिसांनी बुटीबोरी परिसरात एका आरोपीकडून अर्धा किलो डोडा जप्त केला होता. या प्रकरणाचा तपास करताना संबंधित आरोपीची चौकशी करण्यात आली. त्यावेळी त्याने कारंजा परिसरातील एका ढाबा चालकाकडून डोडा खरेदी केल्याची माहिती दिल्याचे समजते. या माहितीला गांभीर्याने घेत नागपूर नारकोटिक्स विभागाने कारंजा परिसराकडे तपासाची दिशा वळवली.

मिळालेल्या माहितीच्या आधारे ११ नोव्हेंबर रोजी दुपारच्या सुमारास नागपूर नारकोटिक्सच्या पथकाने कारंजा तालुक्यातील पालोरा परिसरातील संबंधित ढाब्यावर धडक दिली. नागपूर-अमरावती महामार्गावर असलेला हा परिसर कारंजा शहरापासून सुमारे दहा किलोमीटर अंतरावर आहे. पथकाने ढाब्याची तपासणी केली असता तेथे सुमारे १४३ किलो डोडा पावडरचा साठा आढळल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. या प्रकरणात ढाबा चालकावरही कारवाई करण्यात आल्याचे समजते. मात्र, संबंधित मुद्देमाल नेमका कुठून आणण्यात आला होता, त्याचा पुरवठा कोण करत होते आणि या व्यवहारामागे आणखी कोणाचे जाळे कार्यरत आहे, याबाबत अद्याप अधिकृत तपशील समोर आलेला नाही.



**स्थानिक पोलिसांना माहितीच नाही**

या कारवाईतील सर्वाधिक चर्चेचा मुद्दा म्हणजे स्थानिक पोलिसांची अनभिज्ञता. कारंजा पोलिस ठाण्याच्या हद्दीत एका ढाब्यावर बाहेरच्या जिल्ह्यातील पथक येऊन तब्बल १४२ किलो डोडा पावडर जप्त करते, मात्र स्थानिक पोलिसांना याची माहिती नसल्याचे सांगण्यात येते. यासंदर्भात कारंजा पोलिस ठाण्यात विचारणा केली असता, अशा कोणत्याही कारवाईची माहिती नसल्याचे पोलिस अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. ठाणेदारांनी आपण रजेवर असल्याने या प्रकरणाची माहिती नसल्याचे सांगितले.

अर्थात, बाहेरील तपास यंत्रणा स्वतंत्रपणे कारवाई करू शकतात. मात्र, स्थानिक हद्दीत अमली पदार्थांचा एवढा मोठा साठा आढळून येत असेल तर स्थानिक गुप्तचर यंत्रणा आणि पोलिसांच्या नियमित गस्तीची भूमिका काय, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. महामार्गावरील ढाबे, वाहतूक आणि संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवण्याची जबाबदारी असतानाही अशा प्रकारच्या कारवायांची माहिती स्थानिक यंत्रणेला मिळत नसेल तर ही बाब निश्चितच चिंताजनक आहे.

**वर्षभरापूर्वी १९२ किलो एमडीचा कारखाना**

कारंजा तालुक्यात अमली पदार्थांच्या अवैध व्यवसायासंदर्भात यापूर्वीही मोठी कारवाई झाली आहे. मागील वर्षी याच तालुक्यात पोलिसांनी तब्बल १९२ किलो एमडीचा कारखाना उद्ध्वस्त केला होता. या कारवाईने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली होती. त्यावेळी स्थानिक ठाणेदारासह काही पोलिस कर्मचाऱ्यांना तातडीने मुख्यालयाशी संलग्न करण्यात आले होते. त्या घटनेनंतर तालुक्यातील अमली पदार्थांच्या अवैध व्यवसायावर नियंत्रण येईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती.

मात्र, आता वर्षभराच्या आत पुन्हा एकदा मोठ्या प्रमाणात डोडा पावडरचा साठा जप्त झाल्याची माहिती समोर आल्याने परिस्थिती बदलली की नाही, याबाबत प्रश्न निर्माण झाला आहे. एका बाजूला १९२ किलो एमडीचा कारखाना आणि दुसऱ्या बाजूला १४३ किलो डोडा पावडरचा कथित साठा, या दोन्ही घटनांकडे स्वतंत्र घटना म्हणून पाहून चालणार नाही. यामागे काही समान दुवे आहेत का, अमली पदार्थांचा पुरवठा करणारी साखळी कार्यरत आहे का आणि या व्यवसायाला स्थानिक पातळीवर कोणाचे संरक्षण आहे का, याचा तपास होणे आवश्यक आहे.

**कारंज्यात नशेचे साम्राज्य फोफावतेय**

कारंजा तालुका आता अमली पदार्थांच्या तस्करीसाठी चर्चेत येऊ लागला आहे. महामार्गालगतचे ढाबे, बाहेरून येणारी वाहने, संशयास्पद व्यवहार आणि अमली पदार्थांच्या मोठ्या साठ्यांच्या घटना यामुळे या संपूर्ण परिसराच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. अमली पदार्थांचा व्यवसाय केवळ काही व्यक्तींपुरता मर्यादित नसून त्यामागे पुरवठादार, वाहतूकदार आणि ग्राहकांची मोठी साखळी असण्याची शक्यता तपासातून स्पष्ट होऊ शकते.

विशेषतः तरुण पिढी अमली पदार्थांच्या विळख्यात अडकत असताना अशा अवैध व्यवसायांना वेळीच आळा घालणे गरजेचे आहे. केवळ साठा जप्त करून किंवा एखाद्या संशयितावर कारवाई करून हा प्रश्न संपणार नाही. या व्यवसायाच्या मुळाशी जाणे, आर्थिक व्यवहार तपासणे, पुरवठ्याचे स्रोत शोधणे आणि या जाळ्यातील प्रत्येक दुवा उघड करणे आवश्यक आहे.

१९२ किलो एमडीचा कारखाना उद्ध्वस्त झाल्यानंतरही कारंज्यात पुन्हा १४३ किलो डोडा पावडरचा साठा सापडत असेल, तर कारंजा तालुका अमली पदार्थांच्या तस्करीचे केंद्रबिंदू बनतोय का, हा प्रश्न दुर्लक्षित करून चालणार नाही. बाहेरच्या जिल्ह्यातील पथकाला मिळणारी माहिती स्थानिक यंत्रणेला का मिळत नाही, नशेच्या या कथित साम्राज्याचे सूत्रधार कोण, आणि या व्यवसायाच्या मुळापर्यंत पोहोचणार कोण, या प्रश्नांची उत्तरे आता पोलिस प्रशासनाने जनतेला देण्याची गरज आहे.

## अनाथ चिमुकल्यांसोबत पालकमंत्र्यांची भाऊबीज

**वर्धा जनमाध्यम :** दिवाळीचा सण प्रत्येकाच्या आयुष्यात आनंद घेऊन येतो. मात्र, अनाथ आणि कुटुंबापासून दुरावलेल्या मुलांच्या आयुष्यातही सणाचा आनंद फुलावा, या भावनेतून पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी उषःकाल बालगृहातील ४० चिमुकल्या मुलींसोबत भाऊबीज साजरी केली. यावेळी मुलींनी आपल्या पालकमंत्री भावाचे औक्षण करून भाऊबीजेचा सण उत्साहात साजरा केला.



शारदा कला व सांस्कृतिक मंडळाद्वारे संचालित आणि महिला व बालविकास विभागाच्या अनुदानित उषःकाल बालगृहात हा कार्यक्रम पार पडला. पालकमंत्री भोयर यांनी मुलींशी आस्थेने संवाद साधत त्यांना खाऊचे वाटप केले. या चिमुकल्या बहिणींसोबत दिवाळी आणि भाऊबीजेचा आनंद द्विगुणित झाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. बालगृह चालविणे सोपे नसतानाही संस्था चांगले कार्य करीत आहे. येथील अनेक मुलींनी शिक्षण घेऊन आयुष्यात स्वतःचा मार्ग निर्माण केला, ही समाधानाची बाब आहे. भविष्यात संस्थेला आवश्यक मदतीसाठी आपण निश्चित प्रयत्न करू, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

यावेळी महिला व बालविकास विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा कुरसंगे, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी तृप्ती चव्हाण, संस्थेच्या अध्यक्षा उषा फाले, संस्थापक अध्यक्ष मुरलीधर फाले, सरपंच गौरव गावंडे यांच्यासह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## कुंपणही ठरले कुचकामी : २८ रानडुकरांनी तीस एकरांतील कपाशी केली फस्त

### साबळे कुटुंबातील पाच शेतकरी बांधवांचे लाखोंचे नुकसान

**आष्टी (शहीद) जनमाध्यम :** निसर्गाच्या लहरीपणाशी दोन हात करीत कष्टाने उभे केलेले कपाशीचे पीक आता रानडुकरांच्या तावडीत सापडले आहे. शेतातील पिकांचे संरक्षण व्हावे म्हणून साडेसात फुटांहून अधिक उंचीचे जाळीचे कंपाऊंड उभारले, तरीही रानडुकरांनी त्याखालील माती उकरून शेतात प्रवेश केला. तब्बल २८ रानडुकरांच्या कळपाने एक-दोन नव्हे, तर तब्बल तीस एकरांतील कपाशी पिकाची अक्षरशः नासधूस केली. या घटनेत लहान आर्वी येथील साबळे कुटुंबातील पाच शेतकरी बांधवांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असून, संपूर्ण कुटुंबावर आर्थिक संकट कोसळले आहे.

आष्टी तालुक्यातील लहान आर्वी ग्रामपंचायत हद्दीतील मौजा विठ्ठलापूर शिवारात साबळे परिवाराची शेती आहे. हा संपूर्ण परिसर जंगलव्याप्त असून, रानडुकरांचा येथे मोठ्या प्रमाणात वावर आहे. विशेष म्हणजे, परिसरातील अन्य शेतजमिनी पडीत असताना साबळे परिवारातील पाच भावंडांनी मात्र मोठ्या जिद्दीने शेती कसून कपाशीचे पीक उभे केले होते. वन्यप्राण्यांपासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी त्यांनी संपूर्ण शेतीभोवती सुमारे पावणेआठ फूट उंचीचे जाळीचे कंपाऊंडही उभारले. मात्र, रानडुकरांनी या संरक्षण व्यवस्थेलाच आव्हान देत कंपाऊंडखालील माती उकरून शेतात प्रवेश केला.



रानडुकरांचा कळप केवळ रात्रीच्या अंधारात शेतात घुसतो, असे नाही. तब्बल २८ रानडुकरे दिवसाही शेतात मुक्काम करून असल्याचे निदर्शनास आले आहे. या कळपाने उभ्या कपाशी पिकाची मोठ्या प्रमाणात नासधूस केली. झाडे उखडणे, फांद्या मोडणे आणि पिकाची पायाखाली तुडवणूक करणे साबळे परिवारातील एका सदस्याच्या घरातील रुग्ण नागपूर येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल आहे. त्यामुळे संपूर्ण कुटुंबाची रुग्णालयात धावपळ सुरू होती. मागील चार ते पाच दिवसांपासून शेतात जाणे शक्य झाले नाही. याच काळात रानडुकरांनी शेतात धुमाकूळ घालत कपाशीचे मोठ्या प्रमाणात नुकसान केल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

**पंचनाम्याची प्रतीक्षा; वनविभागाने जागे व्हावे**

मनोहर रामभाऊ साबळे, राहुल राजेंद्र साबळे, प्रकाश रामभाऊ साबळे, सुनील मनोहर साबळे आणि राजेंद्र रामभाऊ साबळे या पाच शेतकरी बांधवांची विठ्ठलापूर शिवारात शेती आहे. सर्वे क्रमांक ९५ आणि १०७ मधील त्यांच्या विविध क्षेत्रांत कपाशीची लागवड करण्यात आली होती. तीस एकरांतील पिकाचे नुकसान झाल्याने त्यांच्या हाती येणारे उत्पन्नच हिरावले गेले आहे.

## साडेसात फुटांचे जाळीचे कंपाऊंड उकरून रानडुकरांचा शेतात शिरकाव

## जि.प.च्या माजी सदस्य ज्योती निकम यांचे निधन

**विरूळ आकाजी जनमाध्यम :** विरूळ आकाजी जिल्हा परिषद सर्कलच्या सदस्य तथा शेतकरी संघटनेचे नेते आणि माजी जिल्हा परिषद सदस्य गजानन निकम यांच्या पत्नी ज्योती गजानन निकम (वय ५०) यांचे गुरुवारी (१२ नोव्हेंबर) पहाटे ४ वाजताच्या सुमारास अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने विरूळ आकाजी परिसरात शोककळा पसरली आहे.



त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे. गुरुवारी दुपारी स्थानिक मोक्षधामात त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, शेतकरी संघटनेचे नेते, सामाजिक कार्यकर्ते आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अंत्यसंस्कारासाठी खासदार अमर काळे, शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष तथा माजी आमदार वामनराव चटप, काँग्रेस कमिटीचे माजी अध्यक्ष मनोज चांदुरकर, सभापती मनोज वसु, माजी जिल्हा परिषद सदस्य सुधीर वाकुडकर यांच्यासह नरेंद्र देशमुख, रवी देशमुख, सचिन देवतळे तसेच शेतकरी संघटनेचे पदाधिकारी आणि ग्रामीण भागातील अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

## थकबाकीदार वीज ग्राहकांना अभय; व्याजाची १०० टक्के माफी

### १५ डिसेंबरपर्यंत एकरकमी भरणा केल्यास २० टक्क्यांपर्यंत सवलत; वर्ध्यात सात ग्राहकांचा सहभाग

**वर्धा जनमाध्यम :** वर्षानुवर्षे वीजबिलाची थकबाकी असलेल्या आणि वीजपुरवठा खंडित झालेल्या ग्राहकांना महावितरणने दिलासा दिला आहे. थकबाकीदार ग्राहकांसाठी 'अभय योजना २०२६-२७' सुरू करण्यात आली असून, या योजनेंतर्गत थकीत बिलावरील व्याज आणि विलंब आकाराची १०० टक्के माफी मिळणार आहे. तसेच मूळ थकबाकी एकरकमी भरणाऱ्या ग्राहकांना २० टक्क्यांपर्यंत अतिरिक्त सवलत दिली जाणार आहे.

३१ मार्च २०२६ पर्यंत कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित झालेल्या घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक आणि अन्य बिगरकृषी ग्राहकांना या योजनेचा लाभ घेता येईल. तसेच ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत तात्पुरता वीजपुरवठा खंडित झालेल्या पात्र ग्राहकांचाही समावेश आहे. १५ डिसेंबरपर्यंत एकरकमी थकबाकी भरणाऱ्या लघुदाब घरगुती व व्यावसायिक ग्राहकांना तीन वर्षांपर्यंत वीजजोडणी खंडित असल्यास १० टक्के, तर तीन वर्षांपेक्षा अधिक कालावधीसाठी २० टक्के सवलत मिळेल. अन्य लघुदाब व उच्चदाब ग्राहकांना १० आणि १५ टक्के सवलत दिली जाणार आहे. एकरकमी भरणा शक्य नसल्यास लघुदाब ग्राहकांना ५० टक्के रक्कम भरून उर्वरित रक्कम सहा व्याजमुक्त हप्त्यांत भरता येईल. उच्चदाब ग्राहकांसाठीही तीन ते सहा हप्त्यांची सुविधा आहे. वर्धा जिल्ह्यात आतापर्यंत सात ग्राहकांनी एकरकमी भरणा करून योजनेत सहभाग नोंदविला आहे. १५ जानेवारी २०२७ पर्यंत लागू असलेल्या या योजनेसाठी महावितरणच्या संकेतस्थळावर किंवा मोबाईल ?पद्धारे ऑनलाइन अर्ज करता येणार आहे. पात्र ग्राहकांनी योजनेचा लाभ घ्यावा.

## चहावरून झालेल्या वादातून पत्नीवर कुऱ्हाडीने प्राणघातक हल्ला; उपचारादरम्यान मृत्यू

**देवळी जनमाध्यम :** चहा बनविण्याच्या कारणावरून झालेल्या वादातून पतीने पत्नीच्या डोक्यावर आणि खांद्यावर कुऱ्हाडीने वार करून तिला गंभीर जखमी केल्याची घटना देवळी तालुक्यातील आंजी (ब.) येथे घडली. सावंगी येथील रुग्णालयात उपचार सुरू असताना गुरुवारी सकाळी जखमी महिलेचा मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. सुमित्रा मनोहर करलुके (वय ६०) असे मृत महिलेचे नाव आहे. तर मनोहर श्रावण करलुके (वय ६५) असे आरोपी पतीचे नाव आहे. दोघेही आंजी (ब.) येथील रहिवासी असून मजुरीचे काम करीत होते. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ९ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजताच्या सुमारास सुमित्रा करलुके या गावातील चंदू वाणी यांच्या टिनाच्या शेडमध्ये उपस्थित होत्या. यावेळी चहा बनविण्याच्या कारणावरून त्यांचा पती मनोहर याच्यासोबत वाद झाला. या वादाचे पर्यवसान हिंसक घटनेत झाले. आरोपी मनोहर याने हातातील कुऱ्हाडीने पत्नीच्या डोक्यावर आणि खांद्यावर वार केले. यात त्या गंभीर जखमी झाल्या.

## जाहीर नोटीस

याद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, मौजा हिंगणघाट, तालुका हिंगणघाट, जिल्हा वर्धा येथील शीट क्रमांक २७, भूमापन क्रमांक ६७४, क्षेत्रफळ १५५.१० चौ.मी. असलेल्या मिळकतीसंदर्भात ही जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे.

सदर मिळकत पूर्वी गोपीचंद मानकर यांच्या मालकीची होती. त्यांच्या निधनानंतर वारसाहक्काने मिळकतीच्या अधिकार अभिलेखात वारसांची नोंद करण्यात आली. त्यानंतर विविध वारस नोंदी, वक्षीसपत्र तसेच न्यायालयीन व महसुली आदेशांनुसार मिळकत पत्रिकेत वेळोवेळी फेरफार करण्यात आले आहेत.

सदर मिळकतीसंदर्भात दुय्यम निबंधक, हिंगणघाट यांच्याकडील नोंदणीकृत हक्कसोडपत्र दस्त क्रमांक ३५३९/२०२६, दिनांक २६/०५/२०२६ अन्वये श्रीमती गीता हेमंत मानकर, त्रिशंकर राजेंद्र गोटे व वर्षा सिद्धार्थ फाळके यांनी त्यांचे हक्क सोडून दिल्याची नोंद असून, त्यानुसार दिनांक ११/१०/२०२६ रोजी विशेष फेरफार नोंद करण्यात आलेली आहे.

तरी सदर मिळकतीवर कोणत्याही व्यक्तीचा मालकी हक्क, वारसाहक्क, बोजा, गहाण, तारण, न्यायालयीन वाद अथवा अन्य कोणताही कायदेशीर दावा किंवा हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत संबंधित कागदपत्रांसह लेखी हरकत खाली नमूद पत्त्यावर सादर करावी.

विहित मुदतीत कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर मिळकतीबाबत कोणाचाही आक्षेप अथवा दावा नाही, असे गृहीत धरून पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

स्थळ : हिंगणघाट, जि. वर्धा






## विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर
## निम्न वर्धा कालवे विभाग, वर्धा
## निविदा सूचना क्र.०७/२०२६-२७

कार्यकारी अभियंता, निम्न वर्धा कालवे विभाग, वर्धा हे सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासना अंतर्गत योग्य त्या वर्गात पंजीबध्द असलेल्या कंत्राटदारांकडून खालील कामासाठी ब-१ (टक्केवारी दराने) निविदा मागवित आहेत. निविदा प्रपत्रे विभागीय कार्यालयात उपलब्ध राहतील. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, निम्न वर्धा कालवे विभाग, वर्धा यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारण्यात येणार नाही. सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

| अ.क्र. | कामाचे नांव | निविदा किंमत (रु.लक्ष) | ईसारा/ बयाणा रक्कम (रु.) | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरुन) | कंत्राटदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १. | वेनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाच्या लिंक-१ मुख्य कालव्याचे सा.क्र.८४ ते ११० कि.मी. भूसंपादन करीता फोटोग्राफी व व्हिडीयोग्राफीचे काम | ५.९१ | ६००० | ०२ महिने | वर्ग ७ व त्यावरील |
| २. | वेनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाच्या लिंक-१ मुख्य कालव्याचे सा.क्र.११० ते १३९.७०५ कि.मी. भूसंपादन करीता फोटोग्राफी व व्हिडीओग्राफीचे काम | ५.९२ | ६००० | ०२ महिने | वर्ग ७ व त्यावरील |
| ३. | वेनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाच्या लिंक-१ मुख्य कालव्याचे सा.क्र.८४ ते १३९.७०५ कि.मी. भूसंपादन करीता ड्रोन सर्व्हेक्षणाचे काम. | ४.७३ | ४८०० | ०२ महिने | वर्ग ८ व त्यावरील |

| | | |
|---|---|---|
| १. | कोरी निविदा प्रपत्र विकी दिनांक | - १३.११.२०२६ ते २०.११.२०२६ वेळ १७.४५ वाजेपर्यंत. विभागीय कार्यालय, वर्धा |
| २. | निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | - २५.११.२०२६ वेळ १७.४५ वाजेपर्यंत विभागीय कार्यालय वर्धा |
| ३. | निविदा उघडण्याचा दिनांक | - २६.११.२०२६ वेळ १२.०० वा. (शक्य झाल्यास) विभागीय कार्यालय वर्धा |
| ४. | कोणतेही कारण न देता निविदा रद्द करण्याचे अधिकार राखून ठेवले आहेत. | |

(प्र.ना.वाकुडे)
कार्यकारी अभियंता
निम्न वर्धा कालवे विभाग,
वर्धा (पिंपरी)

(क्र.जिमाका-वर्धा/१७१/२०२६-२०२७)

■ शुक्रवार १३ नोव्हेंबर २०२६

paper www.janmadhyam.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# हवामान बदलावर मात करण्यासाठी आधुनिक कृषी संशोधनाला प्राधान्य द्या-मुख्यमंत्री

## कवडक येथील कृषी महाविद्यालय आणि पशुवैद्यकीय रुग्णालयाचे लोकार्पण




**नागपूर/प्रतिनिधी-** हवामान बदलाचे सर्वाधिक परिणाम शेती क्षेत्रावर होत असून, अनियमित पाऊस आणि पाण्याच्या कमतरतेमुळे शेतीसमोर नवी आव्हाने निर्माण झाली आहेत. या आव्हानांवर मात करण्यासाठी आधुनिक कृषी संशोधन, कौशल्य प्रशिक्षित मनुष्यबळाची निर्मिती, नाविन्यतेवर भर देण्याची गरज असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. रामटेक तालुक्यातील कवडक येथे श्री दत्ता मेघे फाऊंडेशन नागपूरद्वारा संचालित दिवंगत दत्ता मेघे स्मृती दालन, नंदकिशोर जयस्वाल कृषी महाविद्यालय आणि शालिनीताई दत्ता मेघे पशुवैद्यकीय रुग्णालयाचे लोकार्पण राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कृषी राज्यमंत्री आशिष जयस्वाल, शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, शालीनीताई मेघे, आमदार समीर मेघे, सागर मेघे यांच्यासह मेघे कुटुंबीय, शिक्षण, आरोग्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**कमी पाण्यातही चांगले उत्पादन देणारी पिके विकसित करणे गरजेचे-** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, यंदा अल निनोचा प्रभाव आणि पावसामुळे निर्माण झालेल्या प्रतिकूल परिस्थितीचा मोठा फटका पिकांना बसला. त्यामुळे हवामानाचा ताण सहन करणारी आणि कमी पाण्यातही चांगले उत्पादन देणारी पिके विकसित करणे गरजेचे आहे. कृषी विद्यापीठ आणि कृषी महाविद्यालयांच्या माध्यमातून आधुनिक तंत्रज्ञान विकसित करून त्याचा प्रत्यक्ष शेतीमध्ये उपयोग झाला पाहिजे. कृषी क्षेत्रात वैज्ञानिक संशोधन आणि त्याच्या उपयोजनाची सर्वाधिक आवश्यकता असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले. शेतीसोबतच पशुपालन हा शेतक-यांसाठी महत्त्वाचा आधार आहे. शेतीला पूरक व्यवसाय म्हणून पशुपालन महत्वाचे आहे. देशी गाई केवळ दूध उत्पादनासाठी महत्त्वाच्या नसून संपूर्ण कृषी परिसंस्थेमध्ये त्यांची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. त्यामुळे देशी गोवंशाचे संवर्धन, पशुधनासाठी आधुनिक उपचार पद्धती आणि संशोधनाच्या माध्यमातून पशुपालकांना अधिक सक्षम करण्याची आवश्यकता आहे. अत्याधुनिक पशुवैद्यकीय सुविधांच्या माध्यमातून या क्षेत्राला नवी दिशा मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

मेघे फाऊंडेशनच्या माध्यमातून रामटेकमध्ये उभारण्यात आलेले हे दोन्ही शैक्षणिक व आरोग्यविषयक उपक्रम ग्रामीण भागातील कृषी संशोधन, पशुसंवर्धन आणि रोजगारनिर्मितीला चालना देणारे ठरतील. रामटेकच्या विकासासाठी या संस्था महत्त्वपूर्ण योगदान देतील, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. कार्यक्रमाच्या प्रारंभी नेहरू बालसदनच्या चमूने महाराष्ट्र गीत सादर केले. सागर मेघे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले तर आमदार समीर मेघे यांनी आभार मानले.

**आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून देशी गोवंशाचे संवर्धन आणि दूध उत्पादन वाढविण्याची गरज** – केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

विदर्भात दुग्धव्यवसायाच्या विकासाला मोठी संधी असून आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून देशी गोवंशाचे संवर्धन आणि दूध उत्पादन वाढविण्यावर भर देण्याची गरज आहे. मदर डेअरीच्या माध्यमातून विदर्भात दुग्धव्यवसायाला चालना देण्याचे काम सुरू असून एक हजार कोटींचा प्रकल्प पूर्णत्वास जात आहे. कोल्हापूरच्या तुलनेत संपूर्ण विदर्भातील दूध उत्पादन वाढविण्याची गरज असून दुग्धव्यवसाय, शेळीपालन आणि पशुसंवर्धन हे शेतकऱ्यांसाठी उत्पन्नाचे महत्त्वाचे स्रोत ठरू शकतात, असे नमूद केले. शालिनीताई दत्ता मेघे पशुवैद्यकीय रुग्णालयाच्या माध्यमातून पशुपालकांना आधुनिक उपचार व तंत्रज्ञानाची सुविधा उपलब्ध होईल. दिवंगत दत्ता मेघे यांनी शैक्षणिक क्षेत्रात केलेले कार्य उल्लेखनीय असून, रामटेकमध्ये पशुवैद्यकीय रुग्णालय उभारण्याचे त्यांचे स्वप्न मेघे कुटुंबियांनी पूर्णत्वास नेल्याचेही केंद्रीय मंत्री गडकरी यावेळी म्हणाले.

**कृषी महाविद्यालयामुळे भविष्यात प्रगतीचे नवे दालन खुले होणार** - कृषी राज्यमंत्री आशिष जयस्वाल

दिवंगत दत्ताभाऊ मेघे यांनी नागपूर, वर्धा येथे शैक्षणिक संस्था उभारून हजारो डॉक्टर आणि इंजिनिअर घडवले आहेत. आता तंत्रज्ञानासोबतच कृषी आणि पशुधनाच्या क्षेत्रात मेघे कुटुंबाने पाऊल टाकले आहे. वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवून सागर आणि समीर मेघे हे दत्ताभाऊंचे रामटेक विकासाचे स्वप्न नक्कीच पूर्ण करतील, मेघे कुटुंबाचे हे कार्य रामटेकवासीय विसरू शकणार नाहीत, अशा शब्दांत कृषी राज्यमंत्री आशीष जयस्वाल यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

**जगाला विकासाचा नवा मार्ग दाखवायला हवा –** सरसंघचालक डॉ. मोहन भागवत

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत म्हणाले, निसर्गासह आपण सारे एकाच विश्वाचे घटक आहोत, त्याचे मालक नाही. या अर्थाने आपण एकमेकांवर अवलंबून आहोत. परिणामी, केवळ माझे नाही, तर सर्वांचे जीवन अशीच आपली जीवनदृष्टी असायला हवी. त्यासाठी माणसाने स्वतःच्या जीवनात काही संयम राखायला हवेत आणि आजच्या जगाला विकासाचा नवा मार्ग दाखवायला हवा. संपूर्ण विश्व आज त्या दृष्टीने भारताकडे पाहत आहे. आपल्या विकासातून जगाचा विकास झाला पाहिजे, असा विचार प्रत्येक राष्ट्राने करायला हवा.

# भाजप आणि आरएसएसने सोनिया गांधींबद्दल आयुष्यभर खोट्या गोष्टी पसरवल्या

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** काँग्रेस खासदार प्रियंका गांधी वाड्रा यांनी गुरुवारी दावा केला की, देशात त्यांच्या आई काँग्रेसच्या माजी अध्यक्ष सोनिया गांधी यांच्याबद्दल भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने त्यांच्या आयुष्यातील बहुतेक काळ खोट्या गोष्टी पसरवल्या आणि आता त्या सत्य सांगत असताना सोनिया गांधींनी पुस्तकात मांडलेल्या विधानांना ते खोटे ठरवत आहेत. त्या अलीकडेच प्रकाशित झालेल्या गांधींच्या आत्मचरित्राबद्दल बोलत होत्या.माझ्या आईच्या भारतात गेलेल्या आयुष्यातील मोठ्या काळात बहुतेकवेळा भाजप, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि इतर अनेकांनी त्यांच्याबद्दल जे मनात येईल ते बोलले आहे. त्यांनी खोट्या गोष्टी सांगितल्या आहेत, कथा रचल्या आहेत, पूर्णपणे काल्पनिक गोष्टी तयार केल्या आहेत आणि त्या शांत राहिल्या आहेत. आता सोनिया गांधी स्वत:ची कथा सांगत आहेत. त्यांना स्वत:ची जीवन कहाणी सांगण्याचा पूर्ण अधिकार आहे असे



प्रियंका गांधी म्हणाल्या. आईच्या पुस्तकावरील भाजपच्या प्रतिक्रियेबाबत विचारण्यात आलेल्या प्रश्नांना प्रियंका उत्तर देत होत्या. इतके दिवस ते माझ्या आईबद्दल खोट्या गोष्टी सांगत होते.

आता त्या सत्य सांगत आहेत. त्यामुळे ते (पुस्तक खोटे आहे) असेच बोलणार हे उघड आहे. ते आणखी काय बोलणार? असो, ते लोक तिचे पुस्तक वाचत आहेत याचा मला खूप आनंद आहे असे त्या पुढे म्हणाल्या. भाजपने मंगळवारी काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांच्यावर त्यांच्या आत्मचरित्रात १९७५ ची आणीबाणी लादण्याचे समर्थन करण्याचा प्रयत्न केल्याचा आणि १९८४ च्या शीखविरोधी दंगलींबाबत त्यांचे दिवंगत पती राजीव गांधी यांना क्लीन चिट दिल्याचा आरोप केला होता. त्यावर प्रियंका गांधी वाड्रा यांनी आपली बाजू मांडली आहे. सोनिया गांधी यांचे आत्मचरित्र बिलॉन्गिंग: ए जर्नी ऑफ लव्ह मंगळवारी प्रकाशित झाले. त्यावर भाजपकडून होणा-या टीकेला प्रियंका गांधी वाड्रा यांनी उत्तर देताना प्रत्येकाचा स्वत:चा वैयक्तिक दृष्टिकोन असतो. प्रत्येकाची स्वत:ची कथा असते, बरोबर ना? असे पुढे म्हटले आहे.

# महागाईचा भडका! किरकोळ महागाई दर ६.०९ टक्क्यांवर; दोन वर्षांतील उच्चांक, भाजीपाल्याने सामान्यांना फोडला घाम

## RBI ची महागाईची वरची मर्यादाही ओलांडली!

**मुंबई/प्रतिनिधी-** भारतातील किरकोळ महागाई दराने गेल्या दोन वर्षांतील उच्चांक गाठल्याची माहिती समोर आली आहे. सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाने (MoSPI) गुरुवारी जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, ऑक्टोबर महिन्यात देशातील किरकोळ महागाई दर (Retail Inflation) वाढून ६.०९ टक्क्यांवर पोहोचला आहे. सप्टेंबर महिन्यात हा दर ५.५४ टक्के होता. विशेष म्हणजे, महागाईचा हा आकडा भारतीय रिझर्व्ह बँकेने (RBI) निश्चित केलेल्या ६ टक्क्यांच्या वरच्या मर्यादेलाही ओलांडून गेला आहे.

यापूर्वी ऑक्टोबर २०२४ मध्ये महागाई दर ६ टक्क्यांच्या पुढे जाऊन ६.२ टक्क्यांवर पोहोचला होता. मात्र, त्यावेळी ग्राहक किंमत निर्देशांकाची (CPI) जुनी सीरिज वापरण्यात आली होती, ज्याचे आधार वर्ष २०१२ होते. सध्याची आकडेवारी नवीन मालिकेतील २०२४ या आधार वर्षावर आधारित आहे. मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, ऑक्टोबरमध्ये ग्रामीण भागातील किरकोळ महागाई दर ६.६३ टक्के, तर शहरी भागातील महागाई दर ५.४१ टक्के नोंदवण्यात आला आहे.

**RBI ची महागाईची वरची मर्यादाही ओलांडली**

खाद्यपदार्थांच्या किमतीत झालेल्या



मोठ्या वाढीमुळे देशातील किरकोळ महागाई दरात वाढ झाली आहे. गेल्या दोन वर्षांत पहिल्यांदाच महागाई दराने रिझर्व्ह बँकेची ६ टक्क्यांची वरची सहनशील मर्यादा ओलांडली आहे.रिझर्व्ह बँकेने मध्यम कालावधीसाठी महागाईचे लक्ष्य ४ टक्के निश्चित केले आहे. यासाठी २ ते ६ टक्क्यांची सहनशील मर्यादा (Tolerance Band) ठेवण्यात आली आहे. मात्र, ऑक्टोबरमधील महागाई दर ६.०९ टक्क्यांवर पोहोचल्याने तो या मर्यादेबाहेर गेला आहे.

**कांदा, लसूण आणि अद्रक महागले**

खाद्यपदार्थांच्या किमतीत झालेली वाढ हे किरकोळ महागाई वाढण्यामागचे प्रमुख कारण आहे. ऑक्टोबर २०२५ मध्ये खाद्य महागाई दर ७.७४ टक्के होता. ऑक्टोबर २०२६ मध्ये तो वाढून ८.९४ टक्क्यांवर पोहोचला आहे. ग्रामीण भागात खाद्य महागाईचा दर ९.०९ टक्के, तर शहरी भागात ८.६८ टक्के नोंदवण्यात आला आहे. मंत्रालयाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, ऑक्टोबर महिन्यात वार्षिक आधारावर ज्या पाच वस्तूंच्या किमतीत सर्वाधिक वाढ झाली, त्या पुढीलप्रमाणे आहेत.

**कांदा : ११६.२२ टक्के**
**लसूण : ६०.७४ टक्के**
**चांदीचे दागिने : ५२.३९ टक्के**
**अद्रक : ४८.३२ टक्के**
**लिंबू : ४७.३० टक्के**

दुसरीकडे, काही भाज्या आणि खाद्यपदार्थांच्या किमतीत घटही झाली आहे. वार्षिक आधारावर सर्वाधिक दर घसरलेल्या पाच वस्तू पुढीलप्रमाणे आहेत.

**बटाटा : १४.२४ टक्के घट**
**फ्लॉवर : १०.५७ टक्के घट**
**नारळ : ५.६० टक्के घट**
**वांगी : ३.३४ टक्के घट**
**कोबी : १.९२ टक्के घट**

कोणत्या राज्यांमध्ये महागाई सर्वाधिक?

ऑक्टोबर महिन्यात देशातील काही राज्यांमध्ये किरकोळ महागाईचा दर राष्ट्रीय सरासरीपेक्षा अधिक नोंदवण्यात आला आहे. सर्वाधिक महागाई असलेल्या पाच राज्यांची यादी पुढीलप्रमाणे आहे.

**राज्य किरकोळ महागाई दर**

| | |
|---|---|
| **तामिळनाडू** | **७.२९ टक्के** |
| **तेलंगणा** | **७.२६ टक्के** |
| **आंध्र प्रदेश** | **७.२५ टक्के** |
| **मध्य प्रदेश** | **७.१९ टक्के** |
| **ओडिशा** | **७.१७ टक्के** |

महागाईची आकडेवारी कशी गोळा केली जाते?


राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाच्या (एनएसओ) फील्ड ऑपरेशन्स विभागातील कर्मचारी देशभरातील बाजारपेठांमधून प्रत्यक्ष भेट देऊन वस्तूंच्या किमतींची माहिती गोळा करतात. यासाठी सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील एकूण १,४०७ शहरी बाजारपेठा आणि १,४६५ गावांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये ऑनलाइन बाजारपेठांचाही समावेश आहे.

# अमिताभ बच्चन यांचा बंगला पुन्हा उडवण्याची धमकी:

## २० दिवसांत तिसरा ईमेल; यात विमानतळ, महापौर कार्यालय, PNB शाखेचाही उल्लेख

**मुंबई/प्रतिनिधी-** मुंबईत गुरुवारी सकाळी पुन्हा एकदा अमिताभ बच्चन यांच्या 'जलसा' बंगल्याला बॉम्बने उडवून देण्याची धमकी मिळाली. एका अधिकाऱ्याच्या म्हणण्यानुसार, ईमेल सकाळी १०:५२ वाजता पाठवण्यात आला होता. त्याच्या विषयात PNBच्या मुंबई शाखेत दुपारी १:११ वाजता बॉम्बस्फोट होणार असल्याचे लिहिले होते.

ईमेलमध्ये २७ नोव्हेंबर आणि ३१ डिसेंबरसह अनेक तारखांचाही उल्लेख करण्यात आला. अधिकाऱ्याने सांगितले की, ईमेलमध्ये मुंबईतील अनेक बँका बॉम्बने उडवून देण्याची धमकी देण्यात आली होती. 'जलसा'ला बॉम्बने उडवून देण्याची धमकी देणारा



२० दिवसांतील हा तिसरा ईमेल आहे.

**सार्वजनिक ठिकाणांना लक्ष्य करण्याची धमकी**

ईमेलमध्ये खलिस्तान आणि कथित संघटना खलिस्तान नॅशनल आर्मीचाही उल्लेख करण्यात आला. ईमेल पाठवण्यासाठी reduak079@gmail.com या अकाउंटचा वापर करण्यात आला होता.हा ईमेल PNBच्या मुंबई विभागीय कार्यालयाला, कफ परेड येथील स्थानिक गुन्हे शाखेला (LCB) आणि दक्षिण मुंबईतील झवेरी बाजार शाखेला पाठवण्यात आला होता. सध्या धमकीची विश्वसनीयता आणि ईमेल पाठवणाऱ्या व्यक्तीची खरी ओळख याची पुष्टी झालेली नाही. पोलीस आणि सुरक्षा यंत्रणा या प्रकरणाचा तपास करत आहेत.

# काकाचा १३ वर्षांच्या अल्पवयीन पुतणीवर अत्याचार

**नागपूर/प्रतिनिधी-** पाचपावली पोलीस हद्दीत १० वर्षांच्या चिमुकलीवर बापानेच केलेल्या बलात्काराची घटना ताजी आहे.रक्तातल्या नात्याला काळीमा फासणाऱ्या या घटनेच्या धक्क्यातून शहर सावरतही नाही तोच नात्यामध्ये काका लागत असलेल्या एका नराधमाने १३ वर्षांच्या अल्पवयीन पुतणीवरच अनैसर्गिक अत्याचार केल्याची घटना उघड झाली आहे.वाडी पोलीस ठाणे हद्दीतील दवलामेटी येथे बुधवारी सायंकाळी ही घटना उघडकीस आली.

पीडित मुलगी आणि आरोपी काका हे दोघेही मूळचे उत्तर प्रदेशातील रहिवासी असून, मजुरीच्या निमित्ताने नागपुरातील दवलामेटी परिसरात शेजारी-शेजारी भाड्याच्या खोल्यांमध्ये राहतात. बुधवारी दुपारी १२ वाजेच्या सुमारास पीडित मुलगी घरात आपल्या भावासोबत टीव्ही पाहत होती, तर तिचे आई-वडील मजुरीच्या कामासाठी बाहेर गेले होते. आईने दाखवलेल्या




सतर्कतेमुळे या घटनेचे बिंग फुटले.आई आणि वडिल दोघेही मजुरीसाठी गेल्याने दुपारी १२ च्या सुमारास पीडिता भावासोबत घरीच होती. भाऊ काही कामानिमित्त थोड्या वेळासाठी घराबाहेर गेला. मुलगी घरात एकटीच असल्याची संधी साधून आरोपी काकाने घरात प्रवेश केला. ओळखीचा असल्याने मुलीलाही त्याच्या हेतूचा संशय आला नाही. मात्र, याचाच गैरफायदा घेत नराधम काकाने तिच्यावर अनैसर्गिकरीत्या अत्याचार केला. सायंकाळी पीडितेची आई कामावरून घरी परतल्यानंतर मुलीने घडलेला सर्व प्रकार तिला सांगितला. हा धक्कादायक प्रकार ऐकताच आईने तातडीने वाडी पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. पोलिसांनी घटनेचे गांभीर्य ओळखून तत्काळ पीडित मुलीची वैद्यकीय तपासणी केली असता, तिच्यावर अनैसर्गिक अत्याचार झाल्याचे निष्पन्न झाले. यानंतर वाडी पोलिसांनी आरोपी काकाविरुद्ध 'पॉक्सो' आणि संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करत त्याला बेड्या ठोकल्या आहेत.

## निवडून आलेल्यांऐवजी नियुक्त सदस्यांची व्यवस्था घटनात्मक

### उच्च न्यायालयाचा निर्वाळा

**नागपूर** : बाजार समितीवर निवडून आलेल्या प्रतिनिधींऐवजी राज्य सरकारने नियुक्त केलेल्या सदस्यांमार्फत व्यवस्थापन चालविण्याची तरतूद घटनाबाह्य नाही, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिला आहे. राष्ट्रीय महत्त्वाच्या बाजाराचे स्वरूप सामान्य बाजार समितीपेक्षा वेगळे असल्याने स्वतंत्र व्यवस्थापन रचना करता येते, असे स्पष्ट करीत न्यायालयाने नागपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचा 'राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार' हा दर्जा कायम ठेवला. या निर्णयाला आव्हान देणाऱ्या दोन्ही याचिका फेटाळण्यात आल्या.

# केजरीवाल यांच्या कुटुंबाला जीवे मारण्याची धमकी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** दिल्लीचे माजी मुख्यमंत्री आणि आम आदमी पक्षाचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याची घटना समोर आली आहे. विशेष म्हणजे, केजरीवाल यांच्यासह त्यांची मुलगी हर्षिता केजरीवाल यांनाही ठार मारण्याची धमकी देण्यात आली आहे. या धमकीच्या बदल्यात संबंधित व्यक्तीने सात कोटी रुपयांची खंडणी मागितल्याचे समोर आले आहे. लॉरेन्स बिश्नोई टोळीचा सदस्य असल्याचा दावा करणा-या एका व्यक्तीने ही धमकी दिल्याचे सांगण्यात येत आहे.दिल्लीतील तिलक नगरचे आमदार जरनैल सिंह यांनी यासंदर्भात पोलिसांकडे तक्रार दाखल केली आहे. त्यांना एका अज्ञात व्यक्तीचा फोन आला होता. तसेच व्हॉट्सॲपवरूनही धमकीचा संदेश पाठवण्यात आला होता. संबंधित व्यक्तीने आपण लॉरेन्स बिश्नोई टोळीशी संबंधित असल्याचे सांगितले होते. या टोळीचे परदेशातही संपर्क असल्याचा दावा त्याने केला.



६ नोव्हेंबर रोजी पंजाबमधील मोहाली येथे जरनैल सिंह यांनी याबाबत तक्रार दाखल केली. सात कोटी रुपयांची मागणी पूर्ण न केल्यास अरविंद केजरीवाल आणि त्यांच्या मुलीची हत्या करण्याची धमकी देण्यात आल्याचे त्यांनी तक्रारीत नमूद केले आहे. या प्रकरणी मोहाली पोलिसांनी भारतीय न्याय संहिता (बीएनएस) आणि माहिती तंत्रज्ञान कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. सायबर क्राइम विभागातील सुनील कुमार यांच्याकडे या प्रकरणाचा तपास सोपवण्यात आला आहे. दरम्यान, धमकी देण्यासाठी वापरण्यात आलेल्या मोबाइल क्रमांकाचे कॉल रेकॉर्ड, इंटरनेट प्रोटोकॉल (आयपी) लॉग आणि लोकेशन डेटाची तपासणी पोलिसांकडून केली जात आहे. तसेच अरविंद केजरीवाल आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या सुरक्षेसाठी पुरेशी व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणीही जरनैल सिंह यांनी केली आहे.

**बिश्नोई टोळीचे नाव पुन्हा समोर-** लॉरेन्स बिश्नोई टोळीचे नाव यापूर्वीही खंडणी, गोळीबार आणि लक्ष्य करून हत्या करण्याच्या अनेक प्रकरणांमध्ये समोर आले आहे.

# राज ठाकरे आणि उद्धव ठाकरेंची एकत्र भाऊबीज

**मुंबई/प्रतिनिधी-** भाऊबीजेच्या निमित्ताने उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे दोन्ही भाऊ तसेच सगळेच ठाकरे कुटुंबीय हे जयवंती यांच्या घरी एकत्र जमले. या ठिकाणी ठाकरे बंधूंनी भाऊबीज साजरी केली. जयवंती या राज ठाकरेंची बहीण आहेत. मागील वर्षाप्रमाणे या वर्षीही ठाकरे कुटुंबाची भाऊबीज एकत्र पार पडली. राज ठाकरे, शर्मिला ठाकरे, अमित ठाकरे, उद्धव ठाकरे, रश्मी ठाकरे, आदित्य ठाकरे असे सगळेच ठाकरे कुटुंबीय भाऊबीजेच्या निमित्ताने एकत्र आले होते. याचे फोटोही सोशल मीडियावर चर्चेत आले आहेत. गेल्या वर्षीही त्यांनी जयवंती देशपांडे यांच्या घरी एकत्रितपणे भाऊबीज साजरी केली होती. ही परंपरा यंदाही कायम राहिली असून, दिवाळीच्या निमित्ताने संपूर्ण ठाकरे कुटुंब एकत्र आल्याने आनंदाचे वातावरण होते. २०२५ च्या डिसेंबर महिन्यात ठाकरे बंधूंनी महापालिका निवडणुकांसाठी एकत्र येण्याची घोषणा केली होती. त्याआधीच ठाकरे बंधू हे जुलै महिन्यात मराठी भाषेच्या मुद्द्यावर एकत्र आले होते. आता सलग दुस-या वर्षी ठाकरे बंधूंनी एकत्र येत भाऊबीज साजरी केली आहे.

## गोंदियातील भटक्या विमुक्त जमातीतील मुलांनी घेतली राज्यपालांची भेट

# प्रथमच समुद्र पाहून मुले अचंबित

**मुंबई/प्रतिनिधी-**: गोंदिया जिल्ह्यातील कुडवा येथे पालावरच्या शाळेत शिकणाऱ्या भटक्या विमुक्त जमातीतील उपेक्षित, वंचित मांग गारुडी समाजाच्या ३० मुलामुलींनी राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांची लोकभवन येथे भेट घेतली व राज्यपालांशी मनमोकळ्या गप्पा केल्या. रोजगारासाठी पालकांच्या होणाऱ्या स्थलांतरामुळे शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या मुलामुलींच्या शिक्षणासाठी विदर्भात अनेक ठिकाणी पालावरची शाळा चालविणाऱ्या भटके विमुक्त विकास परिषद, महाराष्ट्र व भटके विमुक्त कल्याणकारी परिषद, विदर्भ प्रांत यांच्या वतीने या भेटीचे आयोजन करण्यात आले होते. 'मुंबईत आपण नेहरू विज्ञान केंद्र, सिद्धिविनायक मंदिर, विधान भवन पाहिले परंतु आज येथून पाहिलेला समुद्रच सर्वांना खूप आवडला,' अशी माहिती यावेळी मुलांनी राज्यपालांना दिली. भटके विमुक्त विकास



परिषद ही संस्था भटक्या विमुक्त जमातीतील मुलामुलींच्या शिक्षणाच्या माध्यमातून त्यांना जीवनदान देण्याचे राष्ट्रकार्य करीत आहे असे गौरवोद्गार राज्यपालांनी यावेळी काढले. यावेळी राज्यपालांसमोर मांग गारुडी समाजातील ३० विद्यार्थ्यांनी भगवद्गीतेतील पंधरावा अध्याय पाठ म्हणून दाखवला. पाठांतर व उच्चाराबाबत राज्यपालांनी मुलांना कौतुकाची थाप दिली.भटके विमुक्त जमातीतील मुलामुलींना परिषदेने शिक्षण व संस्कारांसोबत रोजगारोन्मुख प्रशिक्षण द्यावे अशी सूचना राज्यपालांनी यावेळी केली. सर्वांनी शिक्षण घ्यावे, अभ्यास करावा व उत्तम भविष्य बनवावे असा सल्ला राज्यपालांनी यावेळी मुलांना दिला. पुढील सुट्ट्यांमध्ये आपण मुलामुलींना पुणे दर्शन घडविण्यासाठी सूचना करू, असे राज्यपालांनी यावेळी सांगितले.भटके विमुक्त जमातीतील पालकांचे रोजगारासाठी गोंदिया येथून छत्तीसगड, ओडिसा, हरियाणा, पंजाब व काश्मीरपर्यंत स्थलांतर होत असल्यामुळे त्यांची मुले शिक्षणापासून वंचित राहतात व बरेचदा व्यसनांच्या आहारी जातात. अशा मुलांसाठी पालावरची शाळा हा उपक्रम सुरु करण्यात आला आहे, अशी माहिती संस्थेचे शिक्षा आयाम प्रमुख प्रशांत सुरेश बोरसे यांनी राज्यपालांना दिली.

सर्व मुलामुलींना अभ्यास व शिस्तीसोबतच खर्रा न खाण्याची, जुगारासाठी पत्ते न खेळण्याची तसेच चांगले नागरिक होण्याची शपथ दिली जाते तसेच त्यांना भगवद्गीतेतील अध्याय शिकवले जात असल्याची माहिती त्यांनी दिली. मुलामुलींना दररोज खेळ खेळण्यासाठी तसेच आरोग्याची काळजी घेण्यास सांगितले जाते असे प्रशांत बोरसे व उर्मिला बोरसे यांनी सांगितले.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय



# संपादकीय

## प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## रूपयाची झेप

आंतरराष्ट्रीय बाजारातील कच्च्या तेलाच्या घसरत्या किमती, परकीय गुंतवणुकीचा ओघ आणि पश्चिम आशियातील तणाव निवळण्याच्या शक्यता निर्माण झाल्याने या परिस्थितीचा फायदा भारतीय रुपयाला होताना दिसत आहे. गेल्या काही महिन्यांपासून अमेरिकी डॉलरच्या तुलनेत सातत्याने दबावाखाली असलेल्या भारतीय रुपयाने चालू आर्थिक वर्षात आशियातील आघाडीच्या चलनांमध्ये स्थान मिळवत उल्लेखनीय कामगिरी केली. चालू आर्थिक वर्षात भारतीय रुपयाने आतापर्यंत ०.९७ टक्क्यांची वाढ नोंदवली आहे. याच कालावधीत दक्षिण कोरियाच्या वॉनने ११.२९ टक्के, तर चीनच्या युआॅनने ३.०६ टक्के वाढ नोंदवली. जपानी येनमध्ये ०.३२ टक्के आणि सिंगापूर डॉलरमध्ये ०.१३ टक्के सुधारणा झाली आहे. मात्र, मलेशियन रिंगिट, तैवान डॉलर, थाई बात, फिलिपिन्स पेसो आणि इंडोनेशियन रुपिया या चलनांना घसरणीचा सामना करावा लागला. विशेष म्हणजे, कृत्रिम बुद्धिमतेशी संबंधित गुंतवणुकीचा मोठा फायदा दक्षिण कोरिया आणि चीनच्या चलनांना झाला. एआय क्षेत्रातील गुंतवणुकीसाठी भारतही तुलनेने वेगळे आकर्षण ठरत असून, जागतिक गुंतवणूकदारांच्या दृष्टीने भारतीय बाजारपेठेचे महत्त्व कायम राहिल्याचे चित्र आहे. त्याचबरोबर कच्च्या तेलाच्या किमतीतील घसरणही भारतीय रुपयाला मजबूत करण्यासाठी निर्णायक घटक ठरताना दिसते. भारत कच्च्या तेलाचा मोठा आयातदार देश असल्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारातील तेलाच्या किमर्तीचा रुपयाच्या मूल्यावर थेट परिणाम होतो. तेलाच्या किमती वाढल्या की भारताची आयात बिले वाडतात. त्यासाठी अधिक डॉलरची आवश्यकता निर्माण होते आणि रुपयावर दबाव येतो. याउलट, कच्च्या तेलाच्या किमती कमी झाल्यास आयात खर्च आणि डॉलरची मागणी कमी होण्यास मदत होते. नेमकी हीच स्थिती सध्या अनुभवण्यास मिळत आहे.अलीकडच्या काळात कच्च्या तेलाच्या किमती त्यांच्या उच्चांकावरून जवळपास २० टक्क्यांनी घसरल्या. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेला काहीसा दिलासा मिळाला. अमेरिका आणि इराण यांच्यातील तणाव कमी होण्याची शक्यताही जागतिक बाजारातील अनिश्चितता कमी करण्यास कारणीभूत ठरत आहे. मात्र, पश्चिम आशियातील परिस्थिती पुन्हा बिघडल्यास तेलाच्या किमती वाढू शकतात. अशा परिस्थितीत रुपयाला मिळालेला सध्याचा आधार कमकुवत होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मात्र असे असले तरी भारतीय बाजारात परकीय गुंतवणुकीचा वाढता ओघ दिलासादायक आहे. रुपयाच्या मजबुतीमागे विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांची भूमिका महत्त्वाची आहे. गेल्या आठवड्यात विदेशी गुंतवणूकदारांनी भारतीय समभागांमध्ये तब्बल ३८,९७१ कोटी रुपयांची निव्वळ गुंतवणूक केली. यातील बहुतांश गुंतवणूक दुय्यम बाजारातून झाली असून, प्राथमिक बाजारातून सुमारे ४५२ कोटी रुपये आले. विदेशी गुंतवणूकदार भारतीय बाजारात गुंतवणूक करतात, तेव्हा त्यांना डॉलरचे रुपयांमध्ये रूपांतर करावे लागते. त्यामुळे डॉलरचा पुरवठा वाढून रुपयाला आधार मिळतो. त्याचबरोबर भारतीय शेअर बाजारातील तेजी आणि बँकिंग क्षेत्रातील समभागांची सुधारलेली कामगिरी यामुळेही विदेशी गुंतवणूकदारांचा विश्वास वाढल्याचे दिसते. बुधवारी सेन्सेक्स ०.९५ टक्क्यांनी वाढून ८१८७९.४० अंकांवर बंद झाला, तर निफ्टी ०.८४ टक्क्यांनी वाढून २५२५५.०५ अंकांवर स्थिरावला. बँकिंग क्षेत्रातील मोठ्या कंपन्यांच्या समभागांनी बाजाराला आधार दिला. बँकांचे समभाग मोठ्या तेजीत होते. रिझर्व्ह बँकेने ऑक्टोबरमध्ये रेपो दरात २५ गुणांनी वाढ केल्यानंतर सर्व प्रकारची कर्जे महागली होती. असे असूनही बँकांची कामगिरी सुधारत असल्याची नोंद सातत्याने होत आहे. दरम्यान रुपयाची मजबुती ही अर्थव्यवस्थेसाठी सकारात्मक असली, तरी त्यातील अतिवेग नियंत्रित ठेवण्याचे आव्हान रिझर्व्ह बँकेसमोर आहे. रुपया अधिक मजबूत झाल्यास आयातदारांना फायदा होतो; मात्र निर्यातदारांच्या उत्पन्नावर दबाव येऊ शकतो.विशेषतः डॉलरमध्ये व्यवहार करणाऱ्या निर्यातदारांना रुपयाच्या वेगवान वाढीचा फटका बसण्याची शक्यता असते. अर्थात रुपयाची घसरण रोखण्यासाठीच नव्हे, तर त्याची अनावश्यक वाढ मर्यादित ठेवण्यासाठीही रिझर्व्ह बँकेचा हस्तक्षेप आवश्यक असतो. तो होताना दिसत आहे. सोमवारप्रमाणे बुधवारची शेअर बाजाराची स्थिती पाहता रिझर्व्ह बँकेने बाजारात हस्तक्षेप केल्याचे सांगितले जाते. सप्टेंबर २०२६ अखेर रिझर्व्ह बँकेच्या फॉरवर्ड बुकमध्ये २३९ अब्ज डॉलरची निव्वळ शॉर्ट पोझिशन होती. याचा अर्थ भविष्यात मोठ्या प्रमाणात डॉलर वितरित करण्याची जबाबदारी रिझर्व्ह बँकेवर आहे. त्यामुळे आगामी काळात परकीय चलनसाठा पुन्हा वाढवण्यावर रिझर्व्ह बँकेचा भर राहण्याची शक्यता आहे. यासाठी परकीय गुंतवणुकीचा ओघ वाढत असताना बाजारातून डॉलर खरेदी करून साठा मजबूत करण्याची रणनीती रिक्षाव्र्ह बँक अवलंबू शकते.परिणामी, रुपयाच्या मजबुतीचा वेग नियंत्रित ठेवण्याचा प्रयत्न होऊ शकतो. दुसऱ्या बाजूला रुपयाच्या वाढीवर नियंत्रण ठेवण्यासाठी रिझर्व्ह बँकेकडून तेल कंपन्यांच्या डॉलर विषयक गरजांकडेही लक्ष दिले जात आहे. ऑक्टोबरच्या सुरुवातीला सार्वजनिक क्षेत्रातील तेल विपणन कंपन्यांना डॉलर उपलब्ध करून देण्यासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली होती. त्यामुळे या कंपन्यांची डॉलरची मागणी थेट बाजारात येण्याचे प्रमाण कमी झाले. काही तज्ज्ञांच्या मते, रुपयाची वाढ नियंत्रित पातळीवर ठेवण्यासाठी रिझर्व्ह बैंक तेल कंपन्यांना थेट डॉलर पुरवण्याची पद्धत बदलू शकते. परकीय गुंतवणुकीचा ओघ कायम राहिला आणि कच्च्या तेलाच्या किमर्तीमध्ये पुन्हा मोठी वाढ झाली नाही, तर नजीकच्या काळात रुपया डॉलरच्या तुलनेत २२.५० ते २२.७५ या पातळीपर्यंत मजबूत होऊ शकतो. मात्र, निर्यातदारांकडून रुपयाच्या वाढीपासून संरक्षण मिळवण्यासाठी डॉलरची खरेदी म्हणजेच हेजिंगची मागणी वाढण्याची शक्यता आहे. बुधवारी रुपया डॉलरच्या तुलनेत. ०११ टक्क्यानी वधारून ९३.६९ या पातळीवर बंद झाला. गेल्या आर्थिक वर्षाच्या अखेरीस तो ९४.८३ वर होता. मे महिन्यात आणि ऑक्टोबरमध्ये रुपयाने दोनदा डॉलरमागे २७ रुपयांची पातळी गाठण्याच्या दिशेने वाटचाल केली होती. मे महिन्याच्या अखेरीस तर रुपया ९६.९६ या ऐतिहासिक नीचांकी पातळीवर पोहोचला होता. रुपयाची सध्याची सुधारलेली कामगिरी भारतीय अर्थव्यवस्थेसाठी दिलासादायक संकेत देत असले तरी सध्याच्या सुधारणांची पुढील दिशा जागतिक घडामोडींवर अवलंबून असेल. स्वस्त कच्चे तेल, परकीय गुंतवणुकीत झालेली वाढ आणि जागतिक तणाव कमी होण्याची शक्यता वा घटकांचा रुपयाला फायदा होत आहे. मात्र, रुपयाचे मूल्य केवळ या तात्कालिक घटकांवर अवलंबून राहू नये, यासाठी देशाची निर्यात क्षमता, उत्पादन क्षेत्रातील स्पर्धात्मकता, परकीय गुंतवणुकीचा सातत्यपूर्ण ओघ आणि आर्थिक मूलभूत घटक मजबूत करणे गरजेचे आहे, पण मजबूत रुपयापेक्षा स्थिर आणि संतुलित रुपया भारतीय अर्थव्यवस्थेसाठी अधिक महत्त्वाचा आहे. कारण चलनाचे मूल्य हे केवळ आर्थिक बाजारातील आकडेवारी नसून देशाच्या व्यापारसंतुलनाचे, गुंतवणूकदारांच्या विश्वासाचे आणि अर्थव्यवस्थेच्या दीर्घकालीन क्षमतेचे प्रतिबिंब असते. त्यामुळे रुपयाची सध्याची झेप ही आनंदाची बाब असली, तरी तिचे दीर्घकालीन यश जागतिक परिस्थितीपेक्षा देशांतर्गत आर्थिक स्थैर्य किती मजबूत करता येते, यावर अधिक अवलंबून असेल.

# आपण दुष्काळाशी खेळतो आहोत का?

दुष्काळाच्या संकटातून निसर्ग काही सांगत आहे. त्या सांगण्याकडे लक्षपूर्वक पाहायचं, तर इतकी वर्ष आपण सगळ्यांनीच स्वतःला बधीर करून घेतले आहे. दुष्काळ आपोआप येत नाही, तसाच आपोआप परत जात नाही. त्याचे विविध अवतार दुष्काळ वास्तवाचे दर्शन घडवत असतात.



अजिबात पाऊस नसलेले अनेक प्रांत आहेत, उंच पर्वत पठारावर पाऊस नाही पडला तर एकही थेंब माथ्यावर राहत नाही, त्यानंतर कित्येक दशके पाऊस येईल की नाही माहित नसते तरी त्या वैरणात माणसे राहत आले आहेत. शेकडो किमी लांब लांब नुसती वाळू, माती, रेती उडणारी मैदाने, वाळवंट आहेत की तिकडे पाऊस कधी आला होता हेच माणसांना, झाडांना, प्राण्यांना आठवत नसेल पण सर्व सजीव आपापल्या दिनचर्या बदलवून, टिकून राहत आले आहेत. पाऊस पाणी आणि सजीवाची दिनचर्या यांचे नाते कसे घट्ट जैव अतूट आहे. पण मग दुष्काळ ही काय भानगड झाली आहे की माणूस प्राणी या दिनचर्येचा सरधोपट ठोकळा होऊन राहायला लागला आहे.

प्रदीर्घ अनुभवाच्या प्रवाहातून खरे तर माणसाने, त्याच्या समूहाने इतक्या वर्षात शहाणपणाच्या बाबतीत परिपूर्ण व्हायला पाहिजे. पाऊस आला नाही तरी प्रत्येकाच्या पाण्याची तरतूद झाली आहे दुष्काळ संकटात खंबीर राहायला पाहिजे. माणसाकडे असलेले शास्त्रीय ज्ञान अंमलात आणून किमान दोन वर्षासाठी लागणारे पाणी शांतपणे राखून ठेवून त्याचा विनियोग केला पाहिजे. परंतु माणसाने माणसाच्या हजारो वर्षाच्या ज्ञान संचिताला लाथाडले आहे. नवीन सहस्त्रकात प्रवेश करून पंचवीस वर्ष उलटून गेली. या पाव शतकात किमान सहा वेळा तरी दुष्काळ किंवा टंचाई परिस्थिती डोक्यावर आदळली आहे. जवळपास दर तीन चार वर्षात पाऊस गायब होतो, नद्या, विहिरी कोरड्या ठक्क पडतात. दुष्काळातील वर्षात एकजात सगळेच्या सगळे पूर्वीच्या ज्ञानाचा उपयोग न करता डोक्याला कशाला शॉट म्हणत अजून नवीन भन्नाट पाणी पुरवठा योजना आखायला लागतात. सध्या इकडचे पाणी कमी झाले काय, मग चला आणखी शंभर किलोमीटर वरून पाणी उचलून आणू. एका एका शहरासाठी, गावांसाठी शेकडो योजना कागदावर तयार करून त्याच्या आरती गायल्या जात आहेत. एवढे केले की झाले पुढे दररोज चोवीस तास पाणीच पाणी अशा वल्गना, थापा, प्रत्येक तालुक्यातून दरवर्षी सुरू आहेत.

केंद्र आणि राज्याच्या पाणी पुरवठा, पेयजल योजना मग त्याला नाव काहीही असो त्या पूर्ण करायला पाच-दहा वर्षे घालवली जात आहेत. महाराष्ट्रातील पाणी प्रश्न कायमचा मिटवण्यासाठी कोकणातले समुद्रात वाहून जाणारे पाणी उलट दिशेला वळवण्याचा योजनांचा अंदाजित खर्च आत्ताच लाख कोटीच्या पलीकडे आहे. यापूर्वी उजनी व इतर धरणांचे खर्च कसे वाढत गेले हे संबंध राज्यांनी पाहिले आहे. मागच्या सरकारचा सिंचन घोटाळा चर्चेत आणून तेंव्हाच्या विरोधी पक्षांनी सत्ता मिळवली आहे हेही सगळ्यांना माहित आहे. कोकणच्या पाण्याशिवाय पर्याय नाही असे एका एका टोकाला आणि नदी जोडण्याशिवाय पाणी साठणार नाही हे दुसऱ्या टोकाला सांगत राहून संपूर्ण राज्यात पाण्याचा संबंधातील दुष्काळ हा कोट्यावधी रुपयांच्या योजना शिवाय संपणार नाही या निर्णयावर महाराष्ट्र आणून ठेवला आहे. मराठवाड्यासाठी वॉटर ग्रीड योजना नुकतीच मंजूर झाली, त्याचा अंदाजे खर्च वीस हजार कोटी रुपये आहे, त्यासाठी जागतिक बँकेचे कर्ज घेतले जाणार आहे. कोकणातील पाण्यासाठी एक लाख कोटी खर्च येणार आहे, त्यासाठी जागतिक बँक आणि परदेशी गुंतवणूकदार पैसे देणार आहेत. अशा योजना मोठ्या आकारात वाढवून विस्तारून दाखवल्या जातात. त्याशिवाय इतर पर्यायी मार्गाचा विचार मारला जातो. कोकणातले पाणी हे कायम स्वरूपी हवे तितके वाहते राहणार आहे अशी कल्पना कशाच्या जोरावर मांडली जात असेल ?

या शतकाच्या पहिल्या पाच वर्षात मोठ्या धरणात साठलेला गाळ ही समस्या पाणी टंचाईला कारण असल्याचे सांगण्यात येत असे. मग धरणातील गाळ काढायला पाहिजे असे जर कोणी म्हणताच इंजिनियर मंडळी सांगत असत की तो काढण्याच्या खर्चात दुसरे धरण बांधून होईल. त्यामुळे गाळ काढण्याच्या कल्पना स्वप्नाळू आहेत. त्यानंतर काही वर्ष गाळ हा मुख्य चर्चेत आला. रोजगार हमीतून गाळ काढावा, इथपासून ते लोकांनी स्वतःच गाळ काढून न्यावा असे हो नाही करत सगळीकडे गाळ काढण्याचे यंत्र फिरताना दिसू लागले. लहान मोठ्या बंधाऱ्यातून गाळ उचलला चालला. नवीन सरकारने तर अधिकृत धोरणच आणले की जलयुक्त शिवार आणि गाळमुक्त धरण म्हणजे गाळ काढून शिवारात पाणी खेळले जाणार, मातीमध्ये ओलसरपणा टिकून राहून सिंचनाला मदत होणार, जलयुक्त शिवार ही संकल्पना अत्यंत चांगली आहे, फक्त ती व्यापक, परिपूर्ण होण्यासाठी काय करायला हवे त्याचा अभ्यास झाला नाही. अतिघाईत टेंडर्स काढणे त्यातील तांत्रिक भौगोलिक तपशील न पाहता कामे पूर्ण करणे. अशा चुकांमुळे जलयुक्त मधून काही हाती लागले नाही. याच कामासाठी पूर्वी पाटबंधारे आणि लघु पाटबंधारे असे नवे असायचे. या नावात काही उद्देश अभिप्रेत आहेत. पाणी वाहते ठेवणे, पाणी मुरवून जमीन राखणे, पाणी साठवणे, पाणी वाहून, उचलून अन्य ठिकाणी घेऊन जाणे, पिण्यासाठी पाणी उपलब्ध करणे, शेती आणि उद्योगांसाठी पाणी उपलब्ध करणे या सर्व उद्देशाने पाटबंधारे योजनांचा विचार केला जातो. त्या ठिकाणी जलसंपदा आणि जलसंधारण ही नावे लावण्यात आली. जाणीवपूर्वक नांवे बदलून मूळ कार्यपद्धतीला बाजूला केले की ध्येय, उद्देश, हेतू यामध्ये अंतर वाढत जाते, संबंधीत योजना व प्रकल्पाचा बोजवारा उडतो. त्यामध्ये नेमके काय बिनसले यावर पुनर्विलोकन केले जात नाही, अहवाल, तपशील यांचे अभिलेखे राखले जात नाहीत. लिखित नोंदी परिपूर्ण नसण्यातून पाणी विषयक समस्या अधिक गंभीर व्हायला लागतात.

मागील पंचवीस वर्षात सहा सात वेळा दुष्काळ पडला आहे. त्याच्यावर उपाय करण्याच्या पद्धती मात्र तशाच राहिल्या आहेत. दुष्काळावर मात करायची आहे यापेक्षा आम्ही दुष्काळावर कसे भारी काम करत आहोत याचे प्रदर्शन करण्यासाठी जास्त धडपड चालताना दिसते. कांही आकर्षक नाव धारण करणे, तसेच आकर्षक अशा घटकांना प्रसिद्धी मिळवून देण्यात जास्त उत्साह दिसायला लागतो. असाच एक प्रकार लोकसहभाग या नावाने चालतो. लोकसहभाग म्हणजे नेमके काय याबद्दल काहीही आखीव रेखीव ठरलेले नाही.

पाणी योजनांच्या बाबतीत लोकवाटा घेतला जातो, म्हणजे एकूण खर्चाच्या दहा टक्के रक्कम संबंधित गावाने भरायची आहे. असे करण्याचे कारण काय, तर लोकांचा सहभाग आवश्यक अशी बतावणी मागील पंचवीस वर्षात पसरवण्यात आली. लोकवाटा आणि लोकसहभाग या दोन्ही शब्दांचा मारा ग्रामीण जनतेवर सतत केला जात आहे. लोकांना त्याबद्दल आस्था वाटणे, त्यांची मानसिक आर्थिक क्षमता तयार होणे याबद्दल कसलीच सामाजिक धडपड गावातून तयार झालेली नसते. आधी जसे लोक शासनावर पूर्णता अवलंबून आहेत तसेच आत्ताही आहेत.कोणता तरी नवीन कागद मागून सरकारी काम अडून बसते तसेच शासकीय पाणी योजना होण्यासाठी लोकसहभाग लोकवाटा मागितला जातो. आधीच गावात दुष्काळाशी सामना करणारे, सरकारी यंत्रणाबरोबर संपर्क नसलेले लोक स्वतःहून कसा सहभाग देणार आहेत? त्यासाठी गावातीलच मोठ्या ताकदीच्या व्यक्ती लोकांच्या वतीने हा सहभाग द्यायला पुढाकार घेतात, कारण त्या व्यक्तीला स्वतःचे राजकीय नेतृत्व राजकीय लाभ कायम राखायचे असतात. त्यांनीच प्रर्यत्नपूर्वक योजना मंजूर करवून आणलेली असते, निधी मंजूर करण्यास मुंबईकडे फेरे घेतलेले असतात, खर्च केलेला असतो. लोकवाटा रक्कम भरपाई याच व्यक्ती करतात. एवढे करून जर योजना फसली तर त्याचा फटका लोकांना बसणार असतो. कारण दुसरी योजना पुन्हा त्याच चक्रातून जाणार असते. पाणी पुरवठा योजनांच्या बाबतीत तर हे दुर्दैव जवळपास प्रत्येक गावात वाढत आहे. गंमत म्हणजे नव्या येणाऱ्या महाकाय कोकण/वॉटर ग्रीडसाठी मात्र लोकसहभाग अत्यावश्यक केलेला नसतो. इतकेच काय योजना परिक्षेत्रातील गावांच्या पंचायतींना त्यात काहीच किंमत नसते. पण लहान कामे लहान पाणी योजनांसाठी मात्र लोकांच्या डोक्यावर ओझे टाकण्यात येते.

गावातील लोकांना पिण्यासाठी, शेतीसाठी, जनावरांसाठी पाणी लागत असते. त्याच्या नंतर बांधकाम करण्यास पाणी लागते. या चार गरजांसाठी पाण्याचा सविस्तर अभ्यास करण्यास गावकरी लोक कुठेही तयार झालेले दिसत नाहीत. अण्णा हजारे यांचे राळेगण सिद्धी आणि पोपट पवार यांचे हिवरे बाजार या दोन जवळपास अपवादात्मक उदाहरणावरून लोकांचा सहभाग महाराष्ट्र राज्यात चर्चेला आला आहे. त्याचे अनुकरण करण्यासाठी सरकारी यंत्रणांनी भरपूर प्रयत्न केले. त्याची प्रसिद्धी केली, अभ्यास सहली काढल्या, महिला मंडळे बचत गट, ग्राम पंचायत सदस्य, अभियंते, इत्यादींना ही गावे दाखवण्यात आली.

पाणी नियोजन कसे महत्वाचे आहे त्यात अंमलबजावणी साठी काय पावले घ्यावी लागतात याचा अभ्यास महत्वाचा आहे. पण त्या ऐवजी बहुतांश सहलवादी प्रसिद्धी करण्यास उतावीळ असणाऱ्या सरकारी यंत्रणांनी पुढे आदर्श गाव, गावाचा विकास, मध्येच शाश्वत विकास , मध्येच बचत गटांचे उद्देश अशा इतर कारणासाठी सहली काढल्या. पण जलसंधारण प्रयोगांचे अनुकरण इतर ठिकाणी झाले नाही. संपूर्ण गाव शेती पाणी बाबतीत स्वयंपूर्ण झाल्याचे कुठे दिसत नाही. परंतु उत्साही लोकसहभागाच्या प्रसिद्धीतून डोंगर माथा ते पायथा ही कल्पना, आडवे चर खोदणे, विशिष्ट आकाराचे खड्डे खोदणे, तलावाच्या आसपास खड्डे करणे, त्यातील माती भरावावर आणून त्याची क्षमता वाढवणे, नाला ओढ्यातून माती अडकली आहे त्याठिकाणी नाला सरळ, खोल करणे अशा कामाची उठवळ वाढवली गेली. भोवतीचा निसर्ग, पर्यावरण, भौगोलिक वास्तव अभ्यास, न करता अशी चटकन नजरेत भरणाऱ्या कामांचा गवगवा करण्यात आला. या संस्थांनी आडवे चर, शोष खड्डे, नाला सरळीकरण कामासाठी पुढाकार घेतला. त्यांनी केलेल्या कामाच्या नंतर लगेच पावसाळा आला आणि त्यावर्षी पाऊसमान साधारण राहिले, म्हणजे कमी झाले नाही, परिणामी या संस्थांनी केलेल्या खड्ड्यांच्या ठिकाणी पाणी साठलेले दिसले, नाला सरळ केल्याने लांबवर साठलेल्या पाण्याची छायाचित्र प्रसिद्ध झाली. लोकसहभागाच्या यशकथा सर्वत्र प्रसिद्ध झाल्या. अशा कामासाठी यासाठी शासनाचे स्वतंत्र विभाग आहेत. वर्षानुवर्षे त्यांच्याकडून लहान, मध्यम पाझर तलाव, माती नाला बांध, सिमेंट बंधारे बांधले जात आहेत. त्यांच्याकडून सुद्धा पाणी साठून पाझरले जातच आहे. पण त्यांच्या कामात गावकरी सहभाग घेत नाहीत. त्यासाठी गावात सरकारी अधिकारी आले तर लोकांनी अनेक गावातून वाकडे पाऊल उचलले आहे. तसेच एखादी सामाजिक संस्था पाणी विषयात काम करत असेल तर त्याला सरकारी यंत्रणा, गावकरी फार उत्साहाने मदतीला आले नाहीत. पण चित्रपट क्षेत्रातील लोकप्रिय चेहरे आले की परिस्थिती बदलते.

एरवी कुठेही बाहेर न पडणारे सुखवस्तू तरुण-तरुणी कुदळ खोरे, टोपले घेण्यास सहभागी होतात. गावातील म्होरके बॅनर, स्टिकर, टोप्या घालून टीशर्ट घालून पुढे येतात. सर्व सरकारी यंत्रणा कामाला लागतात, अगदी मंत्रालयातून आणि मुख्यमंत्री महोदयाकडून याबद्दल सूचना निघतात. संबंधित जिल्ह्यातील जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शनिवार हा सुट्टीचा वार लोकसहभाग म्हणून जाहीर करतात.सर्व खात्यांचे अधिकारी, कर्मचारी सकाळी सात पासून अकरा वाजेपर्यंत श्रमदान करतात. या कामांच्या बातम्या होतात. पण त्या गावाच्या परिसरात किती चौरस किलोमीटरमध्ये कोणत्या काळात किती तास, किती मिलीमीटर पाऊस पडल्यावर तीन कोटी लिटर पाणी मिळणार आहे याचे गणित त्यांना सांगता येत नाही. खड्डे खोदल्याचा परिणाम नक्की काय झाला याचे मूल्यमापन करायला परत माननीय जिल्हाधिकारी जात नाहीत. त्या गावातील लोक आपल्या विहिरी ओढे नाले यातील पाण्याचे मोजमाप करत नाहीत.

महत्वाचा मुद्दा असा, या संस्थांच्या कामाचा परिणाम मोजला जात नाही. खड्ड्यातून साचलेले पाणी नेमके कसे वापरायचे, त्याचा शास्त्रीय अर्थ काय लावायचा याबदल पुढचा धडा संबंधित संस्थांकडून, सरकारकडून शिकवला जात नाही. यातून विपरीत घडते की पाणी टंचाई आणि दुष्काळ निवारण यासाठी फक्त खड्डे खोदणे, चर काढणे, त्यासाठी छापील टीशर्ट टोप्या घालून सरकारी हौशी यंत्रणा वापरून गवगवा करणे असे होऊन बसले आहे. आत्ता अलीकडे ऑक्टोबर महिन्यात सांगली जिल्ह्यातील बातमी प्रसिद्ध झाली. पंधरा ऑक्टोबर रोजी एकाच दिवशी पाचशे वनराई बंधारे बांधण्यात आले. याचे फोटो प्रसिद्ध झाले. वाळू माती भरलेले पोत्यांच्या थप्पी ओढ्याच्या पात्रात लावून अधिकारी कर्मचाऱ्यांनी बंधारा तयार केला.

प्रसिद्ध झालेल्या फोटोत ओढ्याच्या दोन्ही दिशेला अगदी एक इंच देखील पाणी वाहताना दिसत नाही, संपूर्ण पात्र अक्षरशः कोरडे आहे. तेथे वनराई बंधारा हौसेने श्रमदान केले त्यांच्या कष्टाला कमी लेखण्याचा हा उद्देश नाही पण वनराई बंधारा म्हणजे नक्की काय, कुठे बांधायचा असतो याबद्दल अज्ञान अनास्था असेल तर की उद्देशाचे मुसळ केरात अन श्रमाची वाळू पोत्यात जाऊन अडकते !! त्या ओढ्याच्या आसपास लपून पाहत असणारा 'दुष्काळ' या निवारण कार्याकडे बघत खदखदून हसला असेल.

साधारणतः पावसाचा हंगाम हा सप्टेंबरपर्यंत राहतो. मोठाले पाऊस, पाऊस पडणे थांबले की जोरात वाहणारे पाणी निघून जाऊन हळूहळू वाहणारे पाणी ठिकठिकाणी दिसायला लागते. त्या पाण्याला तग धरण्यासाठी वनराई बंधारा बांधला जातो. वनराई या शब्दाचा अर्थ खूप सुंदर आहे, वनामध्ये झाडा झुडपांच्या मधून वाहणारे, ठिकठिकाणी अडवणे खेळवणे यासाठी त्याच परिसरात असलेल्या वस्तू, दगड, माती, वाळू, लाकडे, पाचोळा इत्यादी वापरून अगदी लहान उंचीचा बांध घालणे याला वनराई बंधारा म्हणतात. पण यावर्षी जुलै महिन्याच्या नंतर अजिबातच पाऊस पडला नाही. कुठेच नदी नाले टच्च भरून वाहिले नाहीत तर असे झुळझुळू पाणी कुठून वाहणार आहे, आता पावसाळा पूर्णतः संपला असताना नाल्यातून पाणीच नसताना वनराई बंधारा म्हणजे बिनकामाची हौस भागवणे आहे. केवळ शासकीय परिपत्रकांचे आदेश आंधळेपणाने पाळत राहण्यातून असे प्रकार घडत आहेत. पंधरा ऑक्टोबर पासून अशी वनराई बंधारा कामे करावीत असे पत्रकात नमूद असते. पंधरा तारीख लक्षात ठेवून सांगली जिल्ह्यातील सरकारी लोक प्रामाणिकपणे आपले कर्तव्य पार पाडून रिकामे झाले. याचा अर्थ इतकाच की उत्साही अधिकारी, कर्मचारी यांनीही मागील काळात दुष्काळाच्या वेगवेगळ्या वर्षी त्यांनी स्वतः जंगलात जाऊन, ओढे नाले पाहून पाणी विषयक ज्ञान घेतले नाही.

ओढ्याच्या पात्रात नदीमध्ये आपल्या परिसरात वाळू, खडी, गारगोट्या शंख शिंपले, वेगवेगळे गवत, वेली अशा बारीकसारीक नैसर्गिक वास्तवाचा कधी अंदाज घेतलाच नाही. चर्चेत असलेल्या संस्थांच्या कौतुकातून टंचाई आणि दुष्काळ हाताळले जात आहेत. अशा हौशी कामाचे ढोल वाजवणे आणि त्याच्या अगदी विरुद्ध म्हणजे कायम पाणी मिळवण्याच्या अफाट कल्पना, शेकडो किलोमीटर पाणी उचलून ट्रान्सपोर्ट करून नेण्याच्या अचाट अजस्त्र योजनांचे नगारे वाजवण्याने दुष्काळ अनेक वर्ष ठाण मांडून बसणार आहे.

**सुनील बडूरकर**

## राजकारणाचा तमाशा?

दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाची चर्चा रंगली असताना, आता उद्धव ठाकरे यांची शिवसेना आणि एकनाथ शिंदे यांची शिवसेना एकत्र येण्याच्या चर्चेनेही जोरदार वेग घेतला आहे.शिवसेना नेते मंत्री प्रताप सरनाईक यांनी संजय राऊतांची नुकतीच भेट घेतल्याची बातमी वाचण्यात आली आणि त्यानंतर मंत्री गुलाबराव पाटील दोन्ही गट एकत्र येण्याची शक्यता पूर्णपणे फेटाळलेली नाही, ज्यामुळे राजकारणात कोणी कोणाचा कायमचा शत्रू किंवा मित्र नसतो ही जुनी चर्चा पुन्हा एकदा ऐरणीवर आली आहे. परंतु, या सर्व घडामोडी घडत असताना सामान्य जनतेच्या मनात अनेक गंभीर आणि बोचरे प्रश्न उभे राहिले आहेत.

शिवसेना ज्या मूळ हिंदुत्वाच्या मुद्द्यावरून आणि विचारांवर फुटली, तो मुद्दा आज अचानक कसा काय गौण ठरला? कारण उद्धव ठाकरेंनी अजूनही आपला सर्वधर्मसमभाव आणि 'इंडिया' आघाडीचा मार्ग सोडलेला नाही.

तसेच, दुसरीकडे शिंदे गटाच्या दृष्टीने एकेकाळी अत्यंत जिव्हाळ्याचे आणि कळीचे असणारे हिंदुत्व 'पन्नास खोके', 'गद्दार' आणि ज्येष्ठ नेत्यांचा झालेला अपमान हे सर्व मुद्दे आता एका झटक्यात कसे मागे पडले? जर हे सगळे मतभेद आणि वाद शेवटी आपापसातच मिटवायचे होते, तर मग तेव्हा राजकारणाचा आणि विचारांचा इतका मोठा विचका किंवा तमाशा घडवण्याची आवश्यकताच काय होती? या प्रश्नांची उत्तरे आज कुणाकडेही नाहीत.

राजकारणात कोणतीही शक्यता नाकारता येत नसली आणि सत्तेच्या समीकरणांसाठी वाटाघाटी कितीही वेगाने बदलत असल्या, तरी जनमानसात उमटणारे प्रामाणिक प्रश्न आणि मतदारांचा विश्वास यापेक्षा मोठे जगात काहीही असू शकत नाही.

जेव्हा सत्तेच्या राजकारणात मतभेद आणि विचारसरणीचे कट्टे सोयीनुसार गौण ठरवले जातात, तेव्हा खरा तमाशा हा जनतेच्या विश्वासाचा आणि लोकशाहीचा होतो. त्यामुळे केवळ तात्कालिक राजकीय सोयीसाठी तडजोड करण्यापेक्षा, जनतेच्या प्रश्नांची आणि लोकशाहीच्या नैतिक मूल्यांची कास धरणे हीच आजच्या काळातील खरी राजकारणाची गरज आहे.

**अविनाश देशपांडे**

## कोल्हापूरचा संघर्ष मोर्चा काँग्रेसला बळ देणारा..

गोकुळमधील सत्ता बळकावण्यासाठी महायुतीने केलेल्या कुटील राजनीती विरोधात स्वाभिमानी दूध उत्पादक, शेतकरी आणि जनतेचा महामोर्चा काँग्रेसचे विधानपरिषद गटनेते सतेज पाटील यांच्या नेतृत्वाखाली सरकारच्या विरोधात धडकी भरवणारा ठरला आहे.बंटी पाटील यांच्याकडे बहुमत असताना कोरमचा मुद्दा पुढे करुन सत्ता स्थापनेला महायुतीने अर्थात सरकारने सुरुंग लावून गोकुळची सत्ता हस्तगत केली आणि आपलाच अध्यक्ष बनविला याचं अनुषंगाने ९ नोव्हेंबर रोजी कोल्हापुरात विराट मोर्चा निघाला तो निश्चितच काँग्रेस पक्षाला बळ देणारा ठरला आहे.

महायुती सरकारने घेतलेला चुकीचा निर्णय कोणाला पचणी पडलेला नाही त्यामुळे आगामी काळात पश्चिम महाराष्ट्रसह संपूर्ण राज्यात याचे पडसाद उमटणार आहेत बंटी पाटील यांनी मोर्चातून सगळ्यांना विशेष करुन विरोधकांना दाखवून दिले आहे,की आगामी निवडणूक सोपी राहिलेली नाही शेवटपर्यंत लढणारा नेता अशी बंटी पाटलांची जनमाणसात छबी तयार झाली आहे.त्यामुळे वादंग गोकुळचा असला तरी बंटींनी २९ मधील विधानसभेची साखर पेरणी केली आहे.असे म्हंटले तरी वावगे ठरणारं नाही.ठरल्याप्रमाणे १० नोव्हेंबर रोजी संपूर्ण प्रक्रिया पार पडली असली तरी अंतिम निकाल हा न्यायालच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहिलं असे न्यायल्याने म्हंटले आहे.त्यामुळे २५ नोव्हेंबरच्या निर्णयाकडे संपूर्ण राज्यासह राष्ट्रीय पातळीवरील नेत्यांचे लक्ष लागले आहे.मात्र याचे उत्तर काळाच्या उदरातचं दडले आहे.

**राजू जाधव,**

शुक्रवार, दि. १३ नोव्हेंबर २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# बाभूळगावात फटाकेबाज बुलेटस्वरांचा हैदोस!

## कर्णकर्कश आवाजाने नागरिक हैराण

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**बाभूळगाव, दि. १२ :** बाभूळगाव शहरासह तालुक्यात काही बेशिस्त बुलेटस्वारांनी अक्षरशः धुमाकूळ घातला असून, त्यांच्या फटाकेबाज बुलेटच्या आवाजाने सर्वसामान्य नागरिक त्रस्त झाले आहेत. बुलेटच्या सायलेन्सरमध्ये फेरफार करून भरवस्तीत, बाजारपेठेत, चौकाचौकांत तसेच गर्दीच्या ठिकाणी अचानक मोठ्या आवाजाचे फटाके फोडण्याचा प्रकार सुरू आहे. या प्रकारामुळे नागरिकांच्या शांततेचा अक्षरशः भंग होत आहे.



विशेष म्हणजे, हा त्रास केवळ एखाद्या-दुसऱ्या व्यक्तीपुरता मर्यादित नसून अनेक नागरिकांनी आपली आपबीती आमच्या प्रतिनिधीसमोर मांडली आहे. अचानक होणाऱ्या मोठ्या आवाजामुळे लहान मुले दचकतात, वृद्ध नागरिक घाबरतात, विद्यार्थ्यांच्या अभ्यासात व्यत्यय येतो, तर आजारी व्यक्तींनाही मोठा त्रास सहन करावा लागत आहे. काही बुलेटस्वारांनी मूळ सायलेन्सरमध्ये बदल करून मोठ्या आवाजाचे सायलेन्सर बसविल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. भरवस्तीतून भरधाव वेगाने जाताना अचानक फटाक्यासारखा आवाज करून नागरिकांना दचकविणे, हा प्रकार नेमका कोणत्या शौकापोटी केला जात आहे? स्वतःची हौस भागविण्यासाठी दुसऱ्यांच्या जीवाशी आणि मानसिक शांततेशी खेळण्याचा अधिकार या बुलेटस्वारांना कोणी दिला? असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित होत आहे. बुलेटच्या कर्णकर्कश आवाजामुळे अनेक नागरिक वैतागले असून, या प्रकारावर वेळीच नियंत्रण मिळविले नाही तर भविष्यात एखादी गंभीर दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. बेशिस्त वाहनधारकांवर कारवाई करण्यासाठी वाहतूक नियम आहेत की नाहीत? या वाहनांना परवानगी देणारे आर.टी.ओ. काय करत आहेत, असा सवाल आता उपस्थित होत आहे. जिल्ह्याच्या वाहतूक नियंत्रण विभागाने या प्रकाराची तातडीने दखल घ्यावी. शहरातील मुख्य चौक, बाजारपेठ, शाळा परिसर आणि गर्दीच्या ठिकाणी विशेष तपासणी मोहीम राबवावी. नियमबाह्य सायलेन्सर बसविणाऱ्या बुलेटस्वारांची तपासणी करून दोषींवर मोटार वाहन कायद्यानुसार कठोर दंडात्मक कारवाई करावी. तसेच भरधाव वेगाने वाहन चालविणाऱ्यांवरही कारवाई करावी. अशी मागणी नागरिकांतुन होतं आहे.

**आर. टी. ओ. ला हा प्रकार दिसत नाही का?**

**अश्या बेशिस्त बुलेटस्वारांना नागरिकांनी हटकले तर ते नागरिकांशी हुज्जत घालताना दिसून आले आहेत. त्यामुळे आता नागरिकांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. बुलेटस्वारांची दादागिरी थांबणार कधी? नागरिकांना शांततेने जगण्याचा अधिकार नाही का? अशा संतप्त प्रश्नांची उत्तरे परिवहन प्रशासनाने द्यावीत. एखादी मोठी दुर्घटना घडण्याची वाट पाहू नये. आर. टी. ओ. च्या बाभुळगाव येथे आठवड्यातून चार वेळा येणाऱ्या गस्तीच्या वाहनाला वसुली शिवाय दुसरे काहीच दिसत नाही काय? असे अनेक प्रश्न आता जनता विचारत आहे.**

# पोलीस पडताळणी पूर्ण, तरी पासपोर्टला 'ब्रेक'!

## एसपी कार्यालयात ५६७ अर्ज दोन महिन्यांपासून धूळखात..

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. १२ :** पासपोर्ट मिळविण्यासाठी आवश्यक असलेली पोलीस पडताळणी पूर्ण झाली, कागदपत्रांची प्रक्रिया पार पडली; मात्र त्यानंतरही ५६७ नागरिकांचे पासपोर्ट अर्ज गेल्या दोन महिन्यांपासून पोलीस अधीक्षक कार्यालयात प्रलंबित आहेत.

केंद्र सरकारच्या गृह मंत्रालयाकडून आवश्यक कागदपत्रे आणि मंजुरी प्राप्त न झाल्याचे कारण पुढे केले जात असल्याने अर्जदारांना प्रतीक्षेचा मनस्ताप सहन करावा लागत आहे. विशेष म्हणजे, स्थानिक पातळीवरील प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरही प्रशासकीय यंत्रणेतील समन्वयाअभावी नागरिकांचे काम अडकले आहे. यवतमाळ जिल्ह्यातील सर्व १६ तालुक्यामधून पासपोर्टसाठी अर्ज करणाऱ्या नागरिकांची पोलीस विभागाकडून नियमानुसार पडताळणी करण्यात आली. पडताळणी नंतर संबंधित प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी पाठविणे अपेक्षित असताना एसपी कार्यालयातच ही प्रक्रिया थांबली आहे. गृह मंत्रालयाकडून आवश्यक असलेले एक कागदपत्र प्राप्त झाले नसल्याने पुढील कार्यवाही करता येत नसल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली. या अडचणीवर तोडगा काढण्यासाठी यवतमाळ पोलीस अधीक्षक कार्यालयाने सुमारे दोन महिन्यांपूर्वी महाराष्ट्राच्या गृह विभागाकडे आवश्यक माहिती पाठविली. केंद्राच्या गृह मंत्रालयालाही प्रस्ताव सादर करण्यात आला. मात्र, अद्याप मंजुरी मिळालेली नाही. त्यामुळे ५६७ अर्जदारांचे भवितव्य प्रशासकीय मंजुरीच्या प्रतीक्षेत अडकले आहे. परदेशात नोकरी, उच्च शिक्षण, व्यवसाय किंवा कौटुंबिक कारणांसाठी पासपोर्ट आवश्यक असलेल्या नागरिकांना या विलंबाचा थेट फटका बसत आहे. पडताळणी पूर्ण झाल्यानंतरही अर्जदारांनी आणखी किती काळ प्रतीक्षा करायची, हा प्रश्न उपस्थित होत आहे. प्रशासकीय यंत्रणेतील समन्वयाचा अभाव नागरिकांच्या अडचणीचे कारण ठरत असेल, तर त्याची जबाबदारी निश्चित कोणाची? गृह विभाग आणि गृह मंत्रालयाने तातडीने समन्वय साधून प्रलंबित अर्जांचा मार्ग मोकळा करावा, अशी मागणी होत आहे.

## थोडक्यात

### ३५ वर्षांच्या आठवणींना उजाळा, महाविद्यालयात माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा!

**१५ नोव्हेंबरला विविध क्षेत्रांतील माजी विद्यार्थी एकाच व्यासपीठावर**

**राळेगाव :** महाविद्यालयीन जीवनातील मैत्री, आठवणी आणि संस्कारांचा वारसा पुन्हा एकदा अनुभवण्याची संधी राळेगावकरांना मिळणार आहे. कला व वाणिज्य महाविद्यालय आणि माजी विद्यार्थी संघटनेच्या संयुक्त विद्यमाने रविवार, १५ नोव्हेंबर रोजी भव्य माजी विद्यार्थी स्नेहमिलन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. महाविद्यालयाच्या ३५ वर्षांच्या प्रवासात प्रथमच होत असलेल्या या उपक्रमात १९९० पासून शिक्षण घेतलेल्या माजी विद्यार्थ्यांचा सहभाग अपेक्षित आहे. शिक्षण, प्रशासन, उद्योग, व्यवसाय, आरोग्य, पत्रकारिता, राजकारण आणि सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेले माजी विद्यार्थी या निमित्ताने एकत्र येणार आहेत. केवळ जुन्या आठवणींना उजाळा देणे एवढाच या मेळाव्याचा उद्देश नसून, महाविद्यालयाच्या विकासात माजी विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविणे आणि आजच्या विद्यार्थ्यांना यशस्वी माजी विद्यार्थ्यांच्या अनुभवातून दिशा देणे, हा या आयोजनामागील महत्त्वाचा हेतू आहे. अनुभव कथन, मनोगत, सांस्कृतिक कार्यक्रम आणि स्नेहभोजन असे कार्यक्रमाचे स्वरूप राहणार आहे. या ऐतिहासिक स्नेहमिलनात सर्व माजी विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. भास्कर सावरकर, माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष विनोद देवतळे आणि आयोजन समितीने केले आहे.

### ११ ते १८ नोव्हेंबर दरम्यान जनजातीय गौरव सेवा सप्ताह..!

**पारधी, कोलाम समाजासाठी १६० कोटींचे विशेष पॅकेज!**

**यवतमाळ :** क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त यवतमाळ जिल्ह्यात ११ ते १८ नोव्हेंबर दरम्यान 'जनजातीय गौरव सेवा सप्ताह २०२६' आयोजित करण्यात आला आहे. आदिवासी समाजाचे हक्क, जल-जंगल-जमीन आणि सर्वांगीण विकासाचा संकल्प या सप्ताहातून मांडला जाणार असल्याची माहिती पालकमंत्री संजय राठोड यांनी पत्रकार परिषदेत दिली. मात्र, केवळ शासकीय कार्यक्रम आणि निधीच्या घोषणा न करता योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्याचे आव्हान प्रशासनासमोर राहणार आहे. सप्ताहात योजनांचे लाभवाटप, आदिवासी स्मारकांची स्वच्छता, दीपोत्सव, सांस्कृतिक कार्यक्रम, आरोग्य तपासणी, सिकलसेल जनजागृती, शासकीय कागदपत्रांची दुरुस्ती, वनपट्टेधारकांना मदत आणि युवकांसाठी रोजगार मेळावे आयोजित केले जाणार आहेत. १५ नोव्हेंबर रोजी बिरसा मुंडा जयंतीनिमित्त जिल्हा व तालुकास्तरावर कार्यक्रम होणार असून राज्यस्तरीय मुख्य सोहळा गडचिरोली येथे होईल. या घोषणामधील महत्त्वाचा भाग म्हणजे पारधी आणि आदिम जमातीसाठीचे विशेष आर्थिक पॅकेज. जिल्ह्यातील ६१ पारधी बेड्या वरील ३,३२५ कुटुंबांसाठी वैयक्तिक व सामूहिक योजना करिता २० कोटी, तर मूलभूत सुविधांसाठी १० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. वैयक्तिक लाभासाठी ५० हजार, तर सामूहिक लाभासाठी ७.५० लाख रुपयांपर्यंत मदत मिळणार आहे. दुसरीकडे, ६५४ कोलाम पोडामधील २५,२२३ कुटुंबांसाठी वैयक्तिक व सामूहिक योजनांकरिता ३० कोटी आणि मूलभूत सुविधांसाठी तब्बल १०० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. पाणी, रस्ते, वीज, शिक्षण, आरोग्य आणि रोजगार निर्मितीवर भर दिला जाणार आहे. आकडेवारी मोठी असली तरी प्रत्यक्षात किती कुटुंबांना लाभ मिळतो, रखडलेल्या मूलभूत सुविधा किती दिवसांत उपलब्ध होतात आणि रोजगाराच्या संधी किती निर्माण होतात, यावरच या सप्ताहाचे यश ठरणार आहे. आदिवासी विकासाच्या घोषणा प्रत्यक्ष परिवर्तनात उतरविण्याची ही प्रशासनासाठी कसोटी ठरणार आहे.

### मुकुटबनमध्ये पहाटेपासून अवैध देशी दारू विक्रीचा आरोप!

**उत्पादन शुल्क विभाग आणि पोलिसांचे दुर्लक्ष?**

**झरी :** मुकुटबन येथील देरकर भट्टी परिसरात पहाटे चार वाजल्यापासून ते सकाळी आठ वाजेपर्यंत देशी दारूची कथितपणे चढ्या दराने विक्री होत असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. अधिकृत देशी दारू विक्री केंद्राची वेळ सकाळी ८ ते रात्री १० अशी असताना, केंद्र सुरू होण्यापूर्वीच एका महिलेकडून पहाटेच्या सुमारास जादा दराने दारू विक्री केली जात असल्याची स्थानिकांकडून चर्चा आणि तक्रार होत आहे. नियमित विक्रीची वेळ सुरू होण्यापूर्वीच दारू उपलब्ध होत असल्याने या विक्रीला नेमका कोणाचा आशीर्वाद आहे? संबंधित महिलेला एवढ्या पहाटे दारू कुठून उपलब्ध होते? तसेच निर्धारित किमतीपेक्षा अधिक पैसे घेऊन विक्री होत असल्याच्या आरोपांची चौकशी कोण करणार, असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

पहाटे चार ते आठपर्यंत नेमका कोणाचा कारभार?

शहरात अधिकृत विक्री केंद्राच्या वेळेचे नियम असताना पहाटेपासून सुरू असलेल्या या कथित विक्रीकडे संबंधित विभागाचे लक्ष का जात नाही? उत्पादन शुल्क विभाग आणि स्थानिक पोलीस प्रशासन याबाबत काय भूमिका घेणार, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. प्रशासनाने तातडीने चौकशी करावी! या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून पहाटेच्या वेळेत होणाऱ्या कथित दारू विक्रीची सत्यता तपासावी, जादा दराने विक्री होत असल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई करावी आणि परिसरातील अवैध दारू विक्रीला आळा घालावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

आता मुकुटबन पोलीस प्रशासन आणि उत्पादन शुल्क विभाग या गंभीर तक्रारीची दखल घेऊन प्रत्यक्ष कारवाई करणार का, की हा प्रकार असाच सुरू राहणार? याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

# निधी पूर्ण, तरी क्रीडा संकुलाची दुरवस्था कायम,खेळाडूंच्या सुविधांचा पैसा गेला कुठे?

## पिण्याचे पाणी नाही, स्ट्रीट लाईट बंद विकासकामांच्या दर्जासह निधी खर्चाची चौकशी करण्याची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**राळेगाव, दि. १२ :** शासनाकडून निधी उपलब्ध झाल्याची माहिती, विकासकामांची आश्वासने आणि कागदोपत्री प्रगतीचा दावा असतानाही राळेगाव येथील राजीव गांधी क्रीडा संकुलाची दुरवस्था कायम आहे. खेळाडूंना साध्या पिण्याच्या पाण्यासाठीही वणवण करावी लागत असून, परिसरातील स्ट्रीट लाईट बंद असल्याने सायंकाळच्या सरावावरही मर्यादा येत आहेत. मग क्रीडा संकुलाच्या विकासासाठी उपलब्ध झालेला निधी नेमका खर्च कुठे झाला, असा बोचरा सवाल आता उपस्थित होत आहे.





राळेगाव तालुक्यातील अनेक युवक आणि विद्यार्थी विविध खेळांच्या सरावासाठी या संकुलावर अवलंबून आहेत. ग्रामीण भागातील खेळाडूंना दर्जेदार सुविधा मिळाव्यात, त्यांच्यातील गुणवत्ता विकसित व्हावी, या उद्देशाने क्रीडा संकुल उभारण्यात आले. मात्र, प्रत्यक्ष परिस्थिती पाहता या उद्देशालाच हरताळ फासला जात असल्याचे चित्र आहे. पिण्याचे पाणी आणि प्रकाशव्यवस्थेसारख्या प्राथमिक सुविधाही उपलब्ध नसतील, तर खेळाडूंनी सराव कसा करायचा, हा प्रश्न अनुत्तरित आहे. क्रीडा संकुलाच्या विकासासाठी मंजूर निधी, प्रत्यक्ष वितरित रक्कम, झालेली कामे आणि त्यावर झालेला खर्च यांचा सविस्तर लेखाजोखा तपासण्याची मागणी होत आहे. कामांची गुणवत्ता, कंत्राटदारांची बिले, मोजमाप पुस्तिका आणि प्रत्यक्ष कामांची पडताळणी झाली पाहिजे. निधी उपलब्ध असूनही कामे अपूर्ण असतील, तर त्याला जबाबदार कोण, याचेही उत्तर मिळणे आवश्यक आहे.

### जिल्हाधिकाऱ्यांच्या भूमिकेकडे लक्ष

**या प्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन देऊन क्रीडा संकुलाची प्रत्यक्ष पाहणी, निधीच्या विनियोगाची चौकशी आणि दोषींवर नियमानुसार कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच बंद दिवे सुरू करून पिण्याच्या पाण्यासह आवश्यक सुविधा तातडीने उपलब्ध करून देण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. शासनाचा निधी खर्च झाल्याचे दाखविण्यापेक्षा त्याचा प्रत्यक्ष लाभ खेळाडूंना मिळणे महत्त्वाचे आहे. क्रीडा संकुलाची दुरवस्था दूर करण्यासाठी आता केवळ आश्वासन नव्हे, तर ठोस कार्यवाही आवश्यक आहे. अन्यथा, विकासाच्या नावाखाली निधी खर्च होऊनही खेळाडू मात्र सुविधांपासून वंचित राहणार, अशीच परिस्थिती कायम राहील.**

# तेजस कदम यांचे FMGE २०२६ परीक्षेत घवघवीत यश!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**महागाव, दि. १२ :** येथील तेजस कदम यांनी FMGE २०२६ (फॉरेन मेडिकल ग्रॅज्युएट एक्झामिनेशन) परीक्षेत यश संपादन करून महागावच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. तेजस यांनी सन २०२५ मध्ये परदेशातून एमबीबीएसचे वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले.

त्यानंतर भारतात वैद्यकीय व्यवसाय करण्यासाठी आवश्यक असलेली FMGE २०२६ ही परीक्षा त्यांनी यशस्वीरीत्या उत्तीर्ण केली. ही परीक्षा वैद्यकीय ज्ञान, विषयांची सखोल समज आणि सातत्यपूर्ण अभ्यासाची कसोटी पाहणारी मानली जाते. तेजस यांनी कठोर परिश्रम, नियोजनबद्ध अभ्यास आणि आत्मविश्वासाच्या जोरावर हे यश मिळविले. त्यांच्या या यशामुळे कुटुंबीयांसह मित्रपरिवार आणि महागाव परिसरात आनंदाचे वातावरण आहे. तेजस यांचे वडील सुरेश लक्ष्मणराव कदम हे महागाव येथील सावित्रीबाई फुले कन्या विद्यालयात शिक्षक म्हणून कार्यरत आहेत, तर आई सुरेखा कदम या गृहिणी आहेत. आई-वडिलांनी दिलेले संस्कार, शिक्षणासाठी केलेले मार्गदर्शन आणि वेळोवेळी दिलेले प्रोत्साहन यामुळेच तेजस यांना हे यश मिळविता आले. तेजस कदम यांच्या यशाबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत असून, त्यांच्या पुढील वैद्यकीय कारकिर्दीसाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



# गुणवंत विद्यार्थी व यशस्वी तरुणांचा सत्कार सोहळा संपन्न

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**झरी, दि. १२ :** गावातील विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण व्हावी, त्यांच्यापुढे प्रेरणादायी आदर्श निर्माण व्हावेत आणि तरुणांनी शिक्षण, संघर्ष व कर्तृत्वाच्या जोरावर यश संपादन करावे, या उद्देशाने सेपियन्स ग्रुपच्या वतीने कै. भूदेवी केशव तिपर्तीवार व कै. विठ्ठल केशव तिपर्तीवार यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ गुणवंत विद्यार्थी व यशस्वी तरुणांचा सत्कार सोहळा महावीर भवन, मुकुटबन येथे उत्साहात पार पडला.



आजच्या काळात तरुणाईसमोर व्यसनाधीनता, दिशाहीनता आणि नकारात्मक प्रवृत्ती यांसारखी आव्हाने उभी असताना, तरुणांनी योग्य दिशा निवडून शिक्षण, मेहनत आणि जिद्दीच्या बळावर आपले ध्येय गाठावे, हा सकारात्मक संदेश या उपक्रमातून देण्यात आला. गावातील यशस्वी तरुणांचा गौरव म्हणून यश संपादन केलेल्या मनिषा तिपर्तीवार यांनी आपला संघर्षमय प्रवास विद्यार्थ्यांसमोर मांडला. त्यांच्या अनुभवातून विद्यार्थ्यांना जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वासाची प्रेरणा मिळाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संकेत उदकवार होते. त्यांनी अध्यक्षीय भाषणातून विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत आपल्या ध्येयाप्रती सातत्याने प्रयत्नशील राहण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सुरेंद्र गेडाम, विशाल येल्टीवार , सुरेश परचाके ,माधव उदार व सार्थक तिपर्तीवार यांनी आभार प्रदर्शन केले. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी सेपियन्स ग्रुपच्या सर्व सदस्यांनी मोलाचे योगदान दिले. कर्तृत्वाचा गौरव, संघर्षाचा सन्मान आणि नव्या पिढीला प्रेरणेची दिशा देणारा हा उपक्रम मुकुटबनच्या सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात एक सकारात्मक पाऊल ठरला आहे.

# बंद एसटीतील प्रवाशासाठी राज्यमंत्र्याचा ताफा थांबला,माणुसकीला प्राधान्य!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पुसद, दि. १२ :** राजकीय दौरे, कार्यक्रम आणि ताफ्यांच्या गर्दीत सामान्य नागरिकांच्या अडचणींकडे दुर्लक्ष होण्याचे चित्र अनेकदा दिसते. मात्र, जामनाईक येथील कुस्तीदंगल आटोपून परतताना राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी कृतीतून माणुसकीचे दर्शन घडविले.

रात्री सुमारे आठ वाजता जामनाईक क्रमांक १ ते पुसद मार्गावरील देवठाणा फाट्याजवळ राज्य परिवहन महामंडळाची बस अचानक बंद पडली होती. बसमध्ये महिला आणि ज्येष्ठ नागरिकांसह अनेक प्रवासी अडकले होते. रात्रीची वेळ आणि निर्जन परिसर यामुळे प्रवाशांची गैरसोय वाढली होती. याचदरम्यान तेथून जाणाऱ्या राज्यमंत्री नाईक यांच्या निदर्शनास ही बाब येताच त्यांनी क्षणाचाही विलंब न करता आपला ताफा थांबविला. बसचालक व वाहकांकडून परिस्थितीची माहिती घेतल्यानंतर त्यांनी ताफ्यातील डी.व्ही. वाहनातून प्रवाशांना पुसदपर्यंत, तसेच त्यांच्या घरापर्यंत पोहोचविण्याची व्यवस्था केली. प्रशासकीय यंत्रणेची मदत मिळेपर्यंत प्रवाशांना ताटकळत ठेवण्याऐवजी त्यांनी दाखविलेल्या तत्परतेमुळे महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना मोठा दिलासा मिळाला. पदापेक्षा प्रसंगाचे गांभीर्य ओळखून मदतीला धावून जाण्याची ही कृती प्रवाशांसाठी सुखद अनुभव ठरली. उपस्थित प्रवाशांनी राज्यमंत्री नाईक यांचे आभार मानले.



# मदनसिंह फत्तेसिंह दीक्षित यांचे मरणोत्तर नेत्रदान

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. १२ :** येथील विद्याविहार, जांब रोड निवासी ज्येष्ठ नागरिक मदनसिंह फत्तेसिंह दीक्षित यांचे गुरुवार, दिनांक १२ डिसेंबर रोजी दिनेशसिंह गहरवार वृद्धापकाळाने निधन झाले. ते ८८ वर्षांचे होते.



त्यांच्या इच्छेनुसार दिशा नेत्रपेढीच्या वतीने डॉ. आलोक गुप्ता यांनी नेत्रदान पूर्ण केले. मदनसिंह दीक्षित यांच्यावर उद्या, शुक्रवार, दिनांक १३ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता वडगाव मोक्षधामात अंत्यसंस्कार करण्यात येतील.

# दिवाळी अंकांतून साहित्य संस्कृतीचा जागर..!

## 'वाचाल तर वाचाल'चा संदेश देत नगर वाचनालयात भव्य प्रदर्शनाचे उद्घाटन.

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**वणी, दि. १२ :** मोबाईल आणि डिजिटल माध्यमांच्या वाढत्या प्रभावामुळे वाचनाची सवय कमी होत असल्याची चिंता व्यक्त होत असताना, दिवाळी अंकांच्या माध्यमातून समृद्ध मराठी साहित्यपरंपरा जिवंत ठेवण्याचा स्तुत्य उपक्रम नगर वाचनालयाने हाती घेतला आहे. ग्रंथवाचनामुळे माणसाचे जीवन समृद्ध होते.

'वाचाल तर वाचाल' ही उक्ती केवळ घोषवाक्य न राहता प्रत्येकाने ती आचरणात आणावी, असे प्रतिपादन नगराध्यक्ष विद्याताई सचिन आत्राम यांनी केले. नगर वाचनालयाच्या वतीने बुधवार, ११ नोव्हेंबर रोजी आयोजित भव्य दिवाळी अंक प्रदर्शनाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार तथा वाचनालयाचे अध्यक्ष संजीवरेड्डी बोदकुरवार होते. उपाध्यक्ष राकेश बुगेवार प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. प्रदर्शनात आरोग्य, विनोद, महिला विशेष, ज्योतिष, आध्यात्म, रहस्यकथा, चित्रपट, पाककृती आणि पर्यटन अशा विविध विषयांवरील नामांकित दिवाळी अंक उपलब्ध करून देण्यात आले आहेत. प्रत्येक ग्रंथाला वाचक मिळावा आणि वाचनसंस्कृतीचा विस्तार व्हावा, अशी अपेक्षा राकेश बुगेवार यांनी व्यक्त केली. अवघ्या ३०० रुपये नोंदणी शुल्कात उपलब्ध दिवाळी अंकांचा आस्वाद घेण्याची संधी असून, नागरिकांनी प्रदर्शनाला भेट देऊन वाचन चळवळीला बळ द्यावे, असे आवाहन संजीवरेड्डी बोदकुरवार यांनी केले. सूत्रसंचालन गजानन कासावार यांनी केले, तर अर्जुन उरकुडे यांनी आभार मानले.



# जिल्हा परिषद शाळेच्या संस्कारांची यशोगाथा,कर्तृत्ववान माजी विद्यार्थ्यांचा गौरव!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**टाकळी, दि. १२ :** ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळेतून शिक्षण घेतलेले विद्यार्थी आज विविध क्षेत्रांत कर्तृत्वाचा ठसा उमटवत आहेत. त्यांच्या यशातून शाळेच्या गुणवत्तेची आणि संस्कारांची प्रचिती येत असून, याच कर्तृत्वाचा गौरव करण्यासाठी जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळा, टाकळी येथे माजी विद्यार्थी सत्कार सोहळा उत्साहात पार पडला.

अधिकारी, कर्मचारी, डॉक्टर, शिक्षक, अभियंते आणि शासकीय सेवेत कार्यरत माजी विद्यार्थ्यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. अध्यक्षस्थानी जालेंद्र गोपेवार होते. प्रमुख अतिथी म्हणून दुर्गाबाई बुर्रेवार, केंद्र समन्वयक विपीन मुस्कावार, उपाध्यक्ष वनिता पिन्नमवार यांच्यासह शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य उपस्थित होते. मुख्याध्यापक अनिल चिंतकुंटलावार यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सागर टोंगलवार, दिलीप सीर्तावार, सुरेश मंचलवार, जीवन गोपेवार, वैभव पोतराजवार, दत्ता बुर्रेवार, अशोक बुर्रेवार, कुणाल गोपेवार, श्रीकांत बत्तुलवार, भावना गोपेवार, डॉ. आकाश दूधबावणे यांच्यासह अनेक माजी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. शाळेचे ऋण विसरू नका! माजी विद्यार्थ्यांनी आपल्या अनुभवातून सध्याच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे, असे आवाहन मान्यवरांनी केले. विद्यार्थिनी आचल दूधबावणे व प्रणवी पोतराजवार यांनी सूत्रसंचालन, तर सना दूधबावणे हिने आभार प्रदर्शन केले. या सोहळ्याने जुन्या आठवणींना उजाळा देतानाच ग्रामीण शिक्षणातूनही मोठी स्वप्ने साकार होऊ शकतात, हा प्रेरणादायी संदेश दिला.



जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# चौघांचा बळी घेणाऱ्या वाघिणीच्या मृत्यूने वनविभागात खळबळ

## अधिकाऱ्यांसह गावकऱ्यांच्या मागे चौकशीला वेग!

**अचलपूर/वार्ताहर**

चौघांचा बळी घेणाऱ्या नरभक्षी वाघिणीच्या मृत्यूनंतर आता वनाधिकाऱ्यांची चौकशी सुरू झाली आहे. सोनोरीवासीयांच्या मागेही पोलिसांचा ससेमिरा लागला आहे. त्यांच्या 'चल बुलाती'ने ग्रामस्थ त्रस्त झाले आहेत. त्यांनी लोकप्रतिनिधींकडे धाव घेतली आहे.

परतवाडा वनपरिक्षेत्र अंतर्गत येत असलेल्या चांदूर बाजार तालुक्यातील सोनोरी गावातील उर्मिला इवने या युवतीला नरभक्षी वाघिणीने ६ सप्टेंबरला ठार केले. तेव्हा लोकांच्या रोषाला वनविभागाला सामोरे जावे लागले. यादरम्यान संतप्त जमावातील अज्ञात व्यक्तीने वनविभागाच्या गाडीच्या काचा फोडल्या.यावर वनविभागाने चांदूर बाजार पोलिसांकडे तक्रार नोंदविली. या तक्रारीच्या अनुषंगाने चांदूर बाजार पोलिसांनी शोधमोहीम सुरू केली. तेव्हा गावकऱ्यांनी लोकप्रतिनिधींकडे धाव घेतली. दरम्यान, वनविभागाने पुरविलेल्या व्हिडिओवरून शोधमोहीम राबविली जात असल्याचे पोलिसांनी सांगितले.



**व्हायरल व्हिडिओची चौकशी अधिकाऱ्यांपर्यंत**

या वाघिणीने चौघांचा बळी घेतला असला तरी ती उपाशी होती. तर तिला बेशुद्ध करताना जे डॉट मारले गेले त्यात पहिल्या डॉटनंतर दुसऱ्या डॉटकरिता बऱ्यापैकी विलंब झाल्याचे पुढे आले. काही व्हायरल व्हिडिओ चौकशी अधिकाऱ्यांपर्यंतही पोहोचले आहेत. वरिष्ठ पातळीवर या चौकशी सुरू असून यात वाघीण जीवनिशी गेली आणि घोर लावून गेली असे म्हणण्याची वेळ वनविभागावर आली आहे.

**अनेक गंभीर चुका**

सोनोरी येथे बळी घेणारी ती वाघीण पुढे शिरजगाव कसबा शेत शिवारात घुसली. लागलीच दुसऱ्या दिवशी तिने आवारे नामक इसमास ठार केले.अखेर त्या वाघिणीला बेशुद्ध करून पकडले गेले. बेशुद्ध अवस्थेतच तिच्यावर औषधोपचार केले गेले.यादरम्यान काही गंभीर स्वरूपाच्या चुका अनवधानाने घडल्या. बेशुद्ध अवस्थेतच तिला गोरेवाडा येथे हलविताना प्रवासात मोर्शी दरम्यान तिची प्राणज्योत मालवली आणि चौकशीचा फेरा वन अधिकाऱ्यांच्या मागे लागला. या चौकशी दरम्यान अनेक गंभीर प्रकारच्या चुका चौकशी अधिकाऱ्यांच्या पुढे आल्या. तिला ठार करण्याचे आदेश नसताना ठार केले गेल्याची माहिती पुढे आली.

## संक्षिप्त

### इंग्रजी विषयात डॉ.विनयकुमार विरुळकर यांना पीएच.डी.प्रदान



**अमरावती** - न्यु रविदास कॉलनी, गोपाल नगर, अमरावती येथील रहिवाशी डॉ.विनयकुमार मधुकरराव विरुळकर यांनी इंग्रजी विषयात विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवी संपादन केल्याबद्दल राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने शाल सन्मान चिन्ह व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा गौरवपूर्ण सत्कार करण्यात आला. त्यांच्या शैक्षणिक यशाची आणि संशोधनात्मक कार्याची दखल घेत मान्यवरांच्या हस्ते त्यांना सन्मानित करण्यात आले.

डॉ. विरुळकर यांनी अमेरिकन लेखक रिचर्ड राईट आणि भारतीय लेखिका अरुंधती रॉय यांच्या निवडक कादंबऱ्यांमधील वर्णद्वेष आणि जातिभेद यांचा तुलनात्मक अभ्यास या विषयावर संशोधन पूर्ण केले आहे. अमेरिकन लेखक रिचर्ड राईट यांच्या 'नेटिव्ह सन' आणि 'ब्लॅक बॉय' या साहित्यकृतींसह भारतीय लेखिका अरुंधती रॉय यांच्या 'द गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज' आणि 'द मिनिस्ट्री ऑफ अटमोस्ट हॅपिनेस' या कादंबऱ्यांचा त्यांनी सखोल अभ्यास केला आहे. या गौरव सोहळ्याला सामाजिक कार्यकर्ते राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष निलेश जामठे, जिल्हा संपर्कप्रमुख पी.बी. वनस्कर, जेष्ठ मार्गदर्शक भास्कर भटकर,जिल्हा सचिव पांडुरंग गोंडेकर, प्रमोद सावळे, महादेव ढोकणे, ज्येष्ठ साहित्यिक भास्कर भटकर, प्रियंका विरुळकर, यमुना विरुळकर आदी मान्यवर उपस्थित होते.

### शेतशिवारात पंपाचे साहित्य लंपास

**पांढरी खानमपूर** - आधीच दुष्काळी परिस्थिती आणि नापिकीमुळे आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांच्या अडचणीत आता चोरीच्या घटनांनी भर घातली आहे. पांढरी खानमपूर येथील गोपाळ हाडोळे यांच्या शेतातील शेतीपंपाच्या मीटर बॉक्समधून चोरट्यांनी स्टार्टर, फ्यूज, ऑटोस्विचसह इतर विद्युत साहित्य चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे शेतकऱ्यांमध्ये चिंता आणि संताप व्यक्त होत आहे. शेतात पिके जगवायची की शेतीपंपाच्या साहित्याची राखण करायची, असा सवाल शेतकरी उपस्थित करीत आहेत. रात्रीच्या वेळी शेतशिवारात पोलिसांची गस्त नसल्याने चोरट्यांचे धाडस वाढत असल्याची चर्चा आहे. शेतशिवारातील चोरीच्या घटना रोखण्यासाठी पोलिस प्रशासनाने रात्रीची गस्त वाढवून ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

## श्री क्षेत्र कौंडण्यपूर येथे १९ ते २९ नोव्हेंबरदरम्यान कार्तिक मास सोहळा

**कुऱ्हा/वार्ताहर**

विदर्भाची पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री क्षेत्र कौंडण्यपूर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी संस्थानमध्ये दरवर्षीप्रमाणे यंदाही १९ ते २९ नोव्हेंबरदरम्यान कार्तिक मास सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल राहणार आहे.

सोहळ्यादरम्यान दररोज सकाळी ६ वाजता काकडा आरती, सामुदायिक प्रार्थना तसेच सायंकाळी ६ वाजता हरिपाठ होणार आहे. विविध मान्यवरांच्या हस्ते दररोज श्रींची महापूजा संपन्न होईल. २१ नोव्हेंबरला प्रबोधिनी एकादशी आणि २५ नोव्हेंबरला कार्तिक प्रतिपदेनिमित्त विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. २५ नोव्हेंबरला सकाळी ७.३० वाजता ह.भ.प. पंकज महाराज महल्ले यांच्या नेतृत्वाखाली चार दिंड्यांसह नगरप्रदक्षिणा काढण्यात येईल. यानंतर खंजेरी भजन, काल्याचे कीर्तन, संत-महंतांचे मार्गदर्शन आणि सायंकाळी ४ वाजता गोपाळपुरी टेकडी येथे दहीहंडी सोहळा पार पडणार आहे. यावेळी विविध संत-महंतांची उपस्थिती लाभणार आहे. २९ नोव्हेंबरला संत सद्गुरू सदाराम महाराज समाधीची महापूजा, गरकरी भजन आणि दुपारी १ वाजता महाप्रसादाने सोहळ्याची सांगता होईल.या धार्मिक सोहळ्यास विविध संत-महंत, लोकप्रतिनिधी, मान्यवर आणि पंचक्रोशीतील भाविक उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्थानचे सचिव सदानंद साधू करणार आहेत. या सोहळ्याचा भाविकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थानचे अध्यक्ष, विश्वस्त मंडळ व समस्त गावकरी मंडळींनी केले आहे.

## अनाथ मुलांच्या चेहऱ्यावर फुलविला दिवाळीचा आनंद

### श्री संत बेंडोजी बाबा संस्थानचा माणुसकीचा दीप!

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

दिवाळी म्हणजे प्रत्येक घरात आनंदाचे दिवे उजळण्याचा, आप्तस्वकीयांसोबत सुखाचे क्षण साजरे करण्याचा सण! मात्र, ज्यांच्या डोक्यावर आई-वडिलांचे छत्र नाही, अशा अनाथ मुलांसाठी सण-उत्सवांचे क्षण अनेकदा एकटेपणाची जाणीव करून देणारे असतात. याच मुलांच्या जीवनात आनंदाचे काही क्षण फुलावेत, त्यांच्या चेहऱ्यावर हसू उमलावे आणि त्यांनाही आपण समाजाचा एक महत्त्वाचा भाग आहोत, याची जाणीव व्हावी, या संवेदनशील भावनेतून चांदूर रेल्वे तालुक्यातील घुईखेड येथील श्री संत बेंडोजी बाबा संस्थानने माणुसकीचा अनोखा दीप प्रज्वलित केला.

दिवाळीनिमित्त आयोजित लक्ष्मीपूजन कार्यक्रमाचे औचित्य साधून संस्थानच्या वतीने अनाथ मुलांचा सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. एवढेच नव्हे, तर या मुलांना आर्थिक मदत देऊन त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्याचा मनापासून प्रयत्न करण्यात आला. संस्थानचे अध्यक्ष श्री. वसंतराव घुईखेडकर यांच्या हस्ते हा सत्कार व आर्थिक मदतीचा उपक्रम पार पडला. दरम्यान, लक्ष्मीपूजनाचा धार्मिक विधी प्रवीण घुईखेडकर यांच्या हस्ते पार पडला. या कार्यक्रमाला गावातील महिला, ज्येष्ठ नागरिक, पुरुष आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



दिवाळीत केवळ घरातील पणत्या उजळविणे महत्त्वाचे नाही, तर एखाद्याच्या आयुष्यात आशेचा दिवा पेटविणे अधिक महत्त्वाचे आहे. श्री संत बेंडोजी बाबा संस्थानने अनाथ मुलांना आर्थिक मदत देत साजरी केलेली ही दिवाळी धार्मिक श्रद्धेसोबतच सामाजिक संवेदनशीलता, सेवाभाव आणि माणुसकीचा खरा संदेश देणारी ठरली. संस्थानचा हा उपक्रम निश्चितच इतरांसाठी प्रेरणादायी आदर्श आहे. सदर कार्यक्रमाचे संचलन संगम तायडे तर आभार प्रदर्शन लहानू मेश्राम यांनी केले. यावेळी अभय घुईखेडकर, नंदकिशोर काकडे, गिरीष काकडे, श्रीकृष्ण उघडे, मनोहर कोल्हे, मारोतराव मेश्राम, जनार्दन शेंडे, केशव चनेकार, संजय काकडे, नामदेव हिवरकर, राजू कुकडकर, यशवंत काकडे, गणेश वानखडे, मनोहर गावंडे, नाना उघडे, लखपती मेश्राम, विनय गोटेफोडे, कैलास सावणकर, मुकुंद काकडे, किशोर शिरसागर, किशोर मेहर, एकनाथ लोणारे, राजू गडलिंगकार, श्याम काकडे, सागर गावंडे, बालू बंड, दत्ता शेंडे, रामेश्वर तिवाडे, रामकृष्णा पवार, गजानन गिरी, राजूभाऊ मेश्राम, बंडू बनकर यांसह अनेकांची उपस्थिती होती.

## वृद्धाश्रमात आ.राजेश वानखडे यांनी वृद्धांसोबत साजरी केली दिवाळी

### वृद्धांना कपडे, मिठाईचे वाटप; आपुलकीच्या सहवासातून आनंदाचे क्षण

**गुरुकुंज मोझरी/वार्ताहर**

येथील वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज गुरुदेव वृद्धाश्रमात दरवर्षीप्रमाणे यंदाही दिवाळीचा सण मोठ्या आपुलकीने आणि आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. आमदार राजेश श्रीरामजी वानखडे यांच्या वतीने वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांना दिवाळीनिमित्त नवीन कपडे, फराळ व मिठाईचे वाटप करण्यात आले. यावेळी आ.राजेश वानखडे यांनी वृद्धांसोबत बसून त्यांच्याशी स्नेहपूर्ण संवाद साधत दिवाळीचा आनंद वाटून घेतला.

यंदाचे वर्ष हे आत्यंतिक कोरड्या दुष्काळाचे वर्ष असून समाजातील विविध घटकांसमवेत दिवाळी साजरी करण्याच्या क्रमात काल लेहेगाव येथील भटक्या विमुक्तांच्या पालावर व आज मोझरी येथील वृद्धाश्रमात सणाचा आनंद त्यांच्या मध्ये जाऊन साजरा करण्याचे मालिकेत आज वृद्धाश्रमात या सण-उत्सवांच्या काळात ज्येष्ठ नागरिकांच्या चेहऱ्यावर आनंद पुलवणे आणि त्यांना आपलेपणाची जाणीव करून देणे, हाच या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता. दिवाळीच्या निमित्ताने वृद्धांसोबत वेळ घालवत त्यांना कुटुंबातील सदस्यांप्रमाणे सन्मान व प्रेम देण्याचा हा उपक्रम उपस्थितांसाठी भावनिक आणि आनंददायी ठरला.



याप्रसंगी संजय देशमुख, सुभाष श्रीखंडे, प्रदीप गौरखेडे, विवेक गुल्हाने, निलेश श्रीखंडे, सुधीर गोंडसे, पप्पू देशमुख, आरती वानखडे, छाया दंडाळे, मयुरी राऊत, सीमा समरीत, भारता हरणे, सोनाली भोयर, शुभम बोथे, अजय गुल्हाने, गजानन राऊत, अंकुश देशमुख, पुरुषोत्तम मुंदडा, राहुल थोटे, सुनील बारबुद्धे, विनोद पटेल सर, सचिन राऊत, प्रकाश पडोळे, आशिष निस्ताने, विक्रम जोशी, पुरुषोत्तम मंजू, मुकेश कठाळे, एकनाथ गुजर, सुधीर वानखडे, प्रतीक नंदवार, गुड्डू आमले, संतोष जयस्वाल, रामकृष्ण चोपकर, गोवर्धन आप्पा इजापुरे, दिलीप आमले, निखील रोंघे, रंगरावजी लांडे, पुरुषोत्तम फाटे, निशांत भुरे, मनोज घुरडे आदी पदाधिकारी व मित्रपरिवार उपस्थित होते.

## शनिवारी पर्यावरणवादी सोनम वांगचुक दाम्पत्य अमरावतीत; युवा वर्गाशी साधणार संवाद

**अमरावती/का.प्र.**

पर्यावरण संवर्धन, विज्ञान आणि शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यामुळे देशभरात ओळख निर्माण करणारे प्रसिद्ध पर्यावरणवादी व शिक्षणतज्ज्ञ सोनम वांगचुक हे पत्नी गीतांजली वांगचुक यांच्यासह अमरावतीत दाखल होणार आहेत. त्यांच्या आगमनामुळे शहरातील विशेषतः युवा वर्गात उत्सुकतेचे वातावरण निर्माण झाले आहे. सोनम वांगचुक हे १० हजार विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहे. तसेच महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ७ फुटी पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण होणार असल्याची माहिती श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्टच्या अध्यक्ष किर्ती अर्जुन यांनी पत्रपरिषदेत दिली.

दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने आयोजित पत्रपरिषदेत माहिती देताना सांगितले की, शनिवार, १४ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता उत्तम नगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयात सोनम वांगचुक यांच्या हस्ते महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य पुतळ्याचे अनावरण करण्यात येणार आहे. महादेवखोरी रोडवरील उत्तम नगर परिसरात हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्टच्या अध्यक्षा कीर्ती राजेश अर्जुन राहणार आहेत. प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ विपश्यनाचार्य डॉ. कमल गवई, रिपब्लिकन पार्टीचे महासचिव डॉ. राजेंद्र गवई, गीतांजली वांगचुक आणि ट्रस्टचे उपाध्यक्ष धरम अर्जुन उपस्थित राहतील.



सोनम वांगचुक हे केवळ पर्यावरणवादी आणि वैज्ञानिक म्हणूनच नव्हे, तर नावीन्यपूर्ण शैक्षणिक प्रयोग आणि सामाजिक प्रश्नांबरील ठाम भूमिकेमुळेही तरुणाईमध्ये लोकप्रिय आहेत. लडाखच्या पर्यावरणीय आणि घटनात्मक प्रश्नांसाठी त्यांनी केलेल्या आंदोलनामुळे ते देशभर चर्चेत आले होते. दिल्लीतील जंतर-मंतर येथे त्यांनी केलेल्या उपोषणालाही युवा वर्गातून मोठा पाठिंबा मिळाला होता. त्यांच्याच जीवनकार्यावर प्रेरित असलेल्या 'श्री इडियट्स' या चित्रपटातील 'पुन्सुख वांगडू' या व्यक्तिरेखेमुळेही त्यांचे नाव तरुणाईच्या घराघरांत पोहोचले.

सोनम वांगचुक यांच्यासारख्या प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वाच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे अनावरण होणार असल्याने या सोहळ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. कार्यक्रमाला उपस्थित राहावे, असे आवाहन ट्रस्टचे अध्यक्ष किर्ती अर्जुन, सचिव प्राचार्य डॉ. कमलाकर पायस, प्रशासकीय अधिकारी डॉ. सचिन पंडित, डॉ. प्रितेश पाटील यांनी पत्रपरिषदेतून केले आहे.

## गावाच्या विकासाचा मंत्र सांगण्यासाठी भास्करराव पेरे पाटील सावळापुरात

### मंगळवारी साधणार ग्रामस्थांशी संवाद

**आसेगाव पूर्णा/वार्ताहर**



गावाचा विकास करायचा असेल तर गावातच तीर्थ शोधा, गावाच्या विकासासाठी प्रत्येकाने पुढाकार घ्या, असा संदेश देणारे प्रसिद्ध आदर्श सरपंच तथा ग्रामविकासाचे मार्गदर्शक मा. भास्करराव पेरे पाटील (पाटोदा) यांचे जाहीर व्याख्यान मंगळवार, दि. १७ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता सावळापूर येथील आठवडी बाजार चौकात आयोजित करण्यात आले आहे.

'तु रिकामं कशाला फिरतं, तुझं गावंच नाही का तीर्थ' या श्री गुरुदेवांच्या विचारातून गावाच्या विकासाचे महत्त्व अधोरेखित करणाऱ्या या व्याख्यानातून ग्रामविकास, स्वच्छता, लोकसहभाग, ग्रामपंचायतीचे कामकाज आणि गावाच्या सर्वांगीण प्रगतीविषयी ते मार्गदर्शन करणार आहेत.

पाटोदा या गावाचा विकास करून त्याला नंदनवनाचे स्वरूप देण्यात भास्करराव पेरे पाटील यांचे मोलाचे योगदान आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत गावाला शासनाचे एकूण २२ पुरस्कार प्राप्त झाले आहेत. देशातील ११ आदर्श ग्रामपंचायतींमध्ये पाटोदा गावाचा समावेश असल्याचा उल्लेखही त्यांच्या कार्याच्या निमित्ताने केला जातो.

गावाचा विकास केवळ शासनाच्या निधीवर अवलंबून नसून ग्रामस्थांची इच्छाशक्ती, लोकसहभाग आणि लोकप्रतिनिधींची तळमळ महत्त्वाची असते, हा विकासाचा विचार त्यांच्या व्याख्यानातून ऐकण्याची संधी सावळापूर व परिसरातील नागरिकांना मिळणार आहे. त्यामुळे सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, युवक, महिला तसेच ग्रामविकासाची आवड असलेल्या नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# दिवाळीतील पारंपरिक 'गवळण' हरवली

### ग्रामीण संस्कृतीचा ठेवा लोप पावण्याच्या मार्गावर!

**आसेगाव पूर्णा/वार्ताहर**

दिवाळी म्हटलं की गावागावांत आनंद, उत्साह अन् पारंपरिक सणांची रेलचेल असायची. दिवाळीच्या पाडव्याला आणि भाऊबीजेच्या दिवशी ग्रामीण भागात निघणारी पारंपरिक 'गवळण' हा त्यातील एक खास आकर्षणाचा भाग होता. मात्र, काळ बदलला तशी गावातील ही जुनी परंपराही मागे पडू लागली आहे. आसेगावसह परिसरातील अनेक गावांतून गवळणीचा खेळ जवळपास बंद झाल्याने ग्रामीण संस्कृतीचा हा ठेवा लोप पावण्याच्या मार्गावर आहे.

पूर्वी दिवाळीचा पाडवा उजाडला की गावातील तरुण मंडळी गवळण काढण्यासाठी एकत्र यायची. कुणी कृष्णाची, तर कुणी गवळणीची वेशभूषा करून ढोलकी,टाळ आणि मृदंगाच्या तालावर गवळणी सादर करायचे. गावातील गल्लीबोळांतून फिरणारी ही गवळण पाहण्यासाठी आबालवृद्धांची गर्दी जमायची.लहान मुलांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वच जण या पारंपरिक खेळाचा आनंद घ्यायचे. यातून मनोरंजनासोबतच गावातील एकोपा आणि सामाजिक सलोखाही जपला जायचा.

मात्र,आता मोबाईल, टीव्ही आणि सोशल मीडियाच्या वाढत्या प्रभावामुळे तरुण पिढीचा पारंपरिक लोककलांकडे ओढा कमी झाला आहे. गावात एकत्र येऊन अशा कला सादर करण्याची इच्छाशक्ती आणि पुढाकारही कमी होताना दिसत आहे. परिणामी, पूर्वी दिवाळीच्या दिवसांत गाजणारी गवळण आता आठवणींपुरतीच उरली आहे.

**जुन्या आठवणींना उजाळा!**

पूर्वी दिवाळी आली की गवळणीची तयारी अनेक दिवस आधीपासून सुरू व्हायची. गावातील प्रत्येक घराला या गवळणीची उत्सुकता असायची. आज मात्र नव्या पिढीला या लोककलेची माहितीही नाही. ग्रामीण संस्कृतीचा हा वारसा जपण्यासाठी तरुणांनी पुढाकार घेण्याची गरज असून, गावपातळीवर अशा पारंपरिक कलांना पुन्हा संजीवनी देण्याची अपेक्षा ज्येष्ठ नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

■ 'आमच्या लहानपणी दिवाळीचा पाडवा आला की गावात गवळणीचा मोठा उत्साह असायचा. कृष्ण-गवळणींची वेशभूषा, ढोलकीचा आवाज अन् गावभर फिरणारी गवळण हे दिवाळीचं खास आकर्षण होतं. आता हे सगळं बंद झालं, याची खंत वाटते.'

**गोपाळराव शिरभाते आसेगाव पूर्णा**

■ 'आजच्या तरुणांना मोबाईल आणि सोशल मीडियात जास्त रस आहे. आपल्या गावातील जुन्या परंपरा काय होत्या, हेच त्यांना माहीत नाही. निदान दिवाळीत तरी तरुणांनी एकत्र येऊन गवळण सादर करावी, म्हणजे आपल्या संस्कृतीचा वारसा पुढच्या पिढीपर्यंत पोहोचेल.'

**मोहनराव नेरकर आसेगाव पूर्णा**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय



# शेतकरीहिताचा अर्थ

**मराठवाड्यातील, विदर्भातील शेतकऱ्यांच्या शेतात बारमाही पाणी वाहू लागेल, त्यांच्या मालाला रास्त भाव मिळेल आणि नागरिकांना नियमित पाणीपुरवठा होईल, तेव्हाच 'शेतकरीहित' आणि 'विकास' या शब्दांना खरा अर्थ प्राप्त होईल.**

रोगझाल्यावर महागडे उपचार केले तरी शरीराला वेदना सहन कराव्याच लागतात. त्यामुळे रोग प्रतिबंधात्मक उपाय योजण्यात अधिक शहाणपण असते. दुष्काळाच्या बाबतीतही हेच सूत्र लागू पडते. प्रत्यक्ष दुष्काळ पडल्यानंतर सरकारने कितीही खर्च केला, तरी दुष्काळाच्या झळा शेतकऱ्यांसह सर्वच घटकांना, जनावरांना आणि संपूर्ण सजीव सृष्टीला सहन कराव्या लागतात. त्यामुळे दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्यानंतर संवेदना जाग्या होण्यापेक्षा त्या सदैव जागृत असणे अधिक आवश्यक आहे. भारतासारख्या कृषिप्रधान देशात तर शेतीसाठी बारमाही पाणी हे उद्दिष्ट प्रत्येक सरकारच्या अग्रक्रमावर असणेच अभिप्रेत आहे. खेदाची गोष्ट ही आहे की, कुठल्याही लोकशाही व्यवस्थेत अपेक्षा, स्वप्ने आणि प्रत्यक्ष वास्तव यांच्यामध्ये सरकार नामक यंत्रणा असते; जी जनतेच्या इच्छापूर्तीला अग्रस्थानी ठेवतेच असे नाही.

'शेतकऱ्यांच्या मदतीसाठी शासन कटिबद्ध', 'आम्ही सदैव शेतकऱ्यांच्या पाठीशी आणि 'शेतकऱ्यांना सरकार वाऱ्यावर सोडणार नाही', अशा घोषणा गेल्या साडेसात दशकांत शेतकऱ्यांनी असंख्य वेळा ऐकल्या आहेत. तरीही दुष्काळाची, कवडीमोल दरात माल विकण्याची आणि हजारो रुपये मोजूनही बोगस बियाणे मिळण्याची साडेसाती संपलेली नाही.

भारताला कृषिप्रधान देश म्हणताना शेतकरी, शेतकऱ्यांचे श्रम आणि त्याच्या घामातून पिकवलेल्या अन्नधान्याला प्रत्यक्ष व्यवहारात किती किंमत दिली जाते, हा प्रश्न आहे. शेतकऱ्याला उत्पादन करताना विक्रीचा दर, उत्पादन खर्च आणि बाजारातील मागणी यांची शाश्वती नसते. त्यामुळे आज शेती म्हणजे जुगार, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

जर सरकारे खरोखरच शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहिली असती, तर महाराष्ट्रात आणि विशेषतः मराठवाड्यात आणि विदर्भात देखील आज दिसणारे विदारक चित्र निर्माण झाले असते का? विकासाच्या मोठमोठ्या घोषणा होतात. जलसंधारण, सिंचन आणि पाणीपुरवठ्यावर निधी खर्च झाल्याचे सांगितले जाते. मात्र, इतक्या वर्षांनंतरही शेतकरी पावसाच्या भरवशावर आणि नागरिक टँकरच्या भरवशावर असतील, तर या विकासाच्या दाव्यांचे मूल्यमापन करणे आवश्यक नाही का? प्रत्येक योजनेत गैरव्यवहार झाला आहे, असा सरसकट निष्कर्ष काढण्याऐवजी निधीचा विनियोग आणि योजनांचे प्रत्यक्ष परिणाम स्वतंत्रपणे तपासून सत्य जनतेसमोर आणले पाहिजे.

मराठवाड्यात व विदर्भात गेल्या दोन दशकांत जलसंधारणासाठी किती योजना राबविण्यात आल्या, त्यावर किती निधी खर्च झाला आणि त्यांचा प्रत्यक्ष उपयोग किती झाला, याचे स्वतंत्र व निष्पक्ष लेखापरीक्षण होणे आवश्यक आहे. या काळात वेगवेगळ्या राजकीय पक्षांची सरकारे झाली. त्यामुळे हा प्रश्न कोणत्याही एका पक्षाच्या सरकारपुरता मर्यादित मानून चालणार नाही. तो प्रशासनाच्या उत्तरदायित्वाचा आणि सार्वजनिक निधीच्या परिणामकारक वापराचा आहे.

**तपासणी गरजेची**

प्रत्येक जिल्ह्यात किती बंधारे, तलाव, पाझर तलाव आणि जलसाठे उभारले? त्यापैकी किती कार्यरत आहेत ? भूजलपातळी किती सुधारली किती क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळाला? किती कामे केवळ कागदावर पूर्ण दाखविण्यात आली? या प्रश्नांची उत्तरे प्रत्यक्ष स्थळपाहणी, तांत्रिक तपासणी, खर्चाच्या नोंदी आणि लाभार्थ्यांच्या पडताळणीतून मिळावीत.

पाणीपुरवठा योजनांवर कोट्यवधी रुपये खर्च होऊनही नागरिकांना नियमित पाणी मिळत नसेल, तर त्याची जबाबदारी निश्चित झाली पाहिजे. किती योजना मंजूर झाल्या, किती पूर्ण झाल्या, किती बंद आहेत आणि देखभाल-दुरुस्तीवर किती खर्च झाला, याची



माहिती जनतेसमोर आली पाहिजे.

मराठवाड्याला महाराष्ट्रातील अन्य भागांतून अधिकचे पाणी देण्याच्या घोषणा ऐकता ऐकता दोन-तीन पिढ्या मातीत गाडल्या गेल्या. मात्र, आजही शेतीसाठी बारमाही पाण्याची वानवा आहे. पाण्याअभावी शेतीचे नुकसान, आर्थिक संकट आणि ग्रामीण नागरिकांचे हाल सुरूच आहेत. मराठवाडा, विदर्भातील शेतकऱ्यांच्या शेतात बारमाही पाणी उपलब्ध होईल, तेव्हाच शासनाने शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिल्याचा दावा अधिक स्रोतांचा विकास, सिंचन प्रकल्पांची कार्यक्षमता आणि विश्वासार्ह ठरेल. पाण्याचे नियोजन, उपलब्ध स्रोतांचा विकास, सिंचन प्रकल्पाची कार्यक्षमता आणि वितरण व्यवस्थेतील त्रुटी यांचा एकत्रित आढावा घेतला पाहिजे.

**भ्रष्टाचार नको**

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर या समस्येची झळ बसलेल्या भागांत राबविल्या जाणाऱ्या योजनांमध्ये तरी भ्रष्टाचार होऊ नये, ही जनतेची माफक अपेक्षा आहे. दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी आलेला निधी हा संकटात सापडलेल्या शेतकरी आणि नागरिकांचा हक्क आहे; तो कोणाच्याही वैयक्तिक फायद्याचे साधन बनता कामा नये,

दुष्काळ निवारणाच्या कामांना तातडी असते. या तातडीचा गैरफायदा घेऊन कामांच्या गुणवत्तेशी तडजोड होऊ नये, अपूर्ण कामे पूर्ण झाल्याचे दाखवून निधी उचलला जाऊ नये आणि अंदाजपत्रक व प्रत्यक्ष खर्चातील अनियमितता लपवली जाऊ नये. प्रत्येक कामाचे दस्तऐवजीकरण, प्रत्यक्ष स्थळपाहणी, खर्चाची सार्वजनिक माहिती आणि स्वतंत्र तांत्रिक तपासणी झाली पाहिजे. दुष्काळ हा शेतकऱ्यांसाठी संकट असतो; तो कोणासाठीही सार्वजनिक निधी लाटण्याची संधी बनता कामा नये, याकडे लक्ष द्यायला हवे.

**ठोस कृती गरजेची**

शेतकऱ्यांच्या उत्पादनाला रास्त भाव मिळावा, बाजारातील मध्यस्थांकडून होणारे अनावश्यक शोषण कमी व्हावे आणि शेतकरी व ग्राहक यांच्यातील अंतर कमी व्हावे, यासाठी शासनाने ठोस व्यवस्था उभी केली पाहिजे. एकीकडे शेतकरी उत्पादन खर्चही वसूल करू शकत नाही, तर दुसरीकडे ग्राहकाला त्याच मालासाठी कित्येक पटीने अधिक पैसे मोजावे लागतात. या व्यवस्थेतील दोष दूर करण्याची जबाबदारी शासनाचीच आहे.

मुख्यमंत्री, कृषिमंत्री आणि महाराष्ट्र शासन यांनी आता घोषणांच्या पलीकडे जाऊन ठोस कृती आराखडा जनतेसमोर ठेवावा. गेल्या दोन दशकांतील जलसंधारण आणि पाणीपुरवठा योजनांचे स्वतंत्र लेखापरीक्षण करावे. निष्क्रिय योजना, खर्चातील अनियमितता आणि तांत्रिक त्रुटींची निष्पक्ष चौकशी करून दोष सिद्ध झाल्यास नियमानुसार कारवाई करावी. भविष्यातील निधीचा प्रत्येक रुपया प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचेल, अशी व्यवस्था उभी करावी. शेतकऱ्यांच्या आयुष्यातील दुष्काळ संपवायचा असेल, तर सर्वप्रथम घोषणांचा सुकाळ थांबवून कृतीचा हिशेब द्यावा लागेल.

**शेवटी एकच प्रश्न :**

शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे असल्याचे सांगणाऱ्या सरकारने आता शेतकऱ्यांना आपल्या पाठीशी उभे राहण्यासारखे नेमके काय दिले आहे?

मराठवाड्यातील, विदर्भातील शेतकऱ्यांच्या शेतात बारमाही पाणी वाहू लागेल, त्यांच्या मालाला रास्त भाव मिळेल आणि नागरिकांना नियमित पाणीपुरवठा होईल, तेव्हाच 'शेतकरीहित' आणि 'विकास' या शब्दांना खरा अर्थ प्राप्त होईल. तोपर्यंत घोषणांचा गजर सुरू राहील, पण शेतकऱ्यांच्या वाट्याला दुष्काळच येत राहिला, तर त्या घोषणांना फुकाच्या आश्वासनांपेक्षा वेगळे स्थान देता येणार नाही.

**-सुधीर दाणी**

# माणुसकीचा खरा अलंकार

माणसाचे मोठेपण त्याच्या संपत्तीमध्ये, पदामध्ये किंवा प्रसिद्धीमध्ये नसून तो इतरांशी किती प्रेमाने, आदराने आणि संवेदनशीलतेने वागतो यामध्ये असते. दुसऱ्याच्या दुःखाची जाणीव ठेवणे, गरजेच्या वेळी मदतीचा हात पुढे करणे आणि कोणत्याही अपेक्षेविना इतरांच्या जीवनात आनंद निर्माण करणे म्हणजे दयाळूपणा होय. हा गुण मानवी नात्यांना जोडणारा आणि समाजात बंधुभाव निर्माण करणारा महत्त्वाचा जीवनमूल्य आहे. याच मूल्याचा प्रसार करण्यासाठी दरवर्षी १३ नोव्हेंबर रोजी जागतिक दयाळूपणा दिन साजरा केला जातो.

१९९७ मध्ये जपानमधील टोकियो येथे दयाळूपणाचा प्रसार करणाऱ्या विविध संस्थांचे प्रतिनिधी एकत्र आले. त्यातून जागतिक दयाळूपणा चळवळीला चालना मिळाली आणि १३ नोव्हेंबर १९९८ रोजी पहिला जागतिक दयाळूपणा दिन साजरा करण्यात आला. भाषा, धर्म, जात आणि संस्कृती यांतील भेद विसरून मानवतेच्या भावनेने एकत्र येणे, हा या दिनाचा मुख्य उद्देश आहे.दयाळूपणा म्हणजे केवळ आर्थिक मदत करणे नव्हे, तर दुसऱ्याच्या भावना समजून घेणे, त्याच्या अडचणी ऐकून घेणे, त्याला धीर देणे आणि स्वाभिमानाने जगण्यासाठी आधार देणे होय. काही वेळा आर्थिक मदतीपेक्षा प्रेमाचे दोन शब्द आणि संकटाच्या वेळी दिलेली साथ अधिक मोलाची ठरते.आजच्या धावपळीच्या आणि स्पर्धात्मक जीवनात माणसामाणसांमधील



भावनिक जवळीक कमी होत चालली आहे. तंत्रज्ञानामुळे जग जवळ आले असले, तरी माणसांमधील संवाद आणि आपुलकी टिकविण्याचे आव्हान निर्माण झाले आहे. त्यामुळे आधुनिकतेचा स्वीकार करताना माणुसकीची ऊब जपणे आवश्यक आहे.

मानसिक आरोग्याच्या दृष्टीनेही दयाळूपणा महत्त्वाचा आहे. अनेक व्यक्ती ताणतणाव, एकाकीपणा आणि निराशेचा सामना करत असतात. अशा वेळी त्यांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेणे, दोष न देता समजून घेणे आणि आवश्यक मदत मिळवून देणे गरजेचे आहे. सहानुभूतीपूर्ण संवादामुळे व्यक्तीला मानसिक आधार मिळतो. दयाळूपणा केवळ माणसांपुरता मर्यादित नसून प्राणी, पक्षी आणि निसर्गाविषयीची संवेदनशीलताही त्यात समाविष्ट आहे. उन्हाळ्यात पक्ष्यांसाठी पाणी ठेवणे, भटक्या प्राण्यांना मदत करणे, झाडांचे संरक्षण करणे आणि पाण्याची बचत करणे या छोट्या कृतींतून निसर्गाविषयीची जबाबदारी व्यक्त होते.

आपत्तीच्या वेळी मदतीसाठी पुढे येणारे नागरिक, स्वयंसेवी संस्था आणि सामाजिक कार्यकर्ते माणुसकीचे उत्तम उदाहरण ठरतात. पूर, दुष्काळ किंवा इतर संकटांमध्ये अन्न, पाणी, औषधे आणि निवारा उपलब्ध करून देणे ही दयाळूपणाची कृती आहे. जात, धर्म, भाषा आणि प्रदेश यांचा विचार न करता गरजूंना मदत करणे आवश्यक आहे. समाजमाध्यमांच्या वाढत्या वापरामुळे अपमानास्पद टिप्पणी, अफवा आणि द्वेषपूर्ण संदेशांचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे डिजिटल संवादातही सभ्य भाषा वापरणे, इतरांच्या मतांचा आदर करणे आणि खात्री नसलेली माहिती पुढे न पाठवणे गरजेचे आहे. तसेच अन्याय आणि शोषणाविरुद्ध आवाज उठवणे हीदेखील सामाजिक संवेदनशीलतेचीच जबाबदारी आहे.

**– डॉ. राजेंद्र बगाटे**

# मी कशाला आरश्यात पाहू गं...

आरश्याचा मोह सर्वच वयाच्या स्त्री पुरुषांना लहानपणापासूनच असतो. वयाची साठी ओलांडल्यावर मात्र आरस्यात बघतांना 'जाने कहा गये ओ दिन' असे प्रकर्षाने वाटायला लागते, आणि त्यातल्यात्यात महिलावर्ग ही बाब जरा जास्तच मनाला लावून घेते.'चेहरा जणू भिंतीवरचा आरसा बिल्लोरी, आपुलीच प्रतिमा होते, आपुलीच वैरी', अशी अवस्था होते.साठी ओलांडली की आपण म्हातारे झाल्याची भावना बळावते. खरे पाहता साठी म्हणजे तारुण्याचे म्हातारपण आणि म्हातारपणाचे तारुण्य. त्यामुळे आपण म्हाताऱ्या झालोत, थकलो, दमलो असे मानू नये. अशातच हार्मोन्सचे बॅलन्स बिघडल्याने मनात अस्वस्थता निर्माण होऊन चिडचिड वाढू लागते व आपण निष्कारण म्हातारपण ओढवून घेतो. वास्तविक पाहता वयाची साठी गाठणे म्हणजे आयुष्याची परिपक्वता. जगाचा बरा-वाईट, खरा-खोटा या गोष्टीचा पुरेसा अनुभव घेऊन अनुभवसंपन्नतेचा भाव आपल्या मनी असायला हवा. कुटुंबासाठी आयुष्यभर जी मरमर केलेली असते, तिचा समारोप साठीत व्हायला पाहिजे व पुढील नवीन इनिंगसाठी आपण नव्या दमाने तयार असायला हवे. घरात सून येणे, नातू येणे, नात होणे, नवीन जावई येणे म्हणजे म्हातारपण नाही, तर ती कुटुंबाची परिपक्वता आणि तुम्हाला मिळालेला कुटुंबज्येष्ठत्वाचा बहुमान होय.

ज्येष्ठ असणे आणि म्हातारे असणे यात फार मोठा फरक आहे. ज्येष्ठ म्हणजे तुमच्या भात्यात अनुभवाचे उत्तमोत्तम बाण उपलब्ध असणे आणि म्हातारपण म्हणजे



सर्व अवसान गळून पडलेला व निष्प्रभ झालेला निराश्रित जीव. वार्धक्य वाढत्या वयामुळे येत नसून स्वतःकडे दुर्लक्ष केले की म्हातारपण तुमच्या स्वागतासाठी तयार असते. अशावेळी आपल्याकडेच आपण फोकस करायला हवा.

**एका शायरने यावर सुंदर असे विचार मांडले की,**
**'खुद से बेहतर खुद का कोई हमसफर नहीं होता।'**

आपल्यामुळे कुटुंबाचे काही अडेल ही भावना मनातून कायमची काढून टाकावी. आपण जगात असलो काय किंवा नसलो काय, काहीही फरक पडणार नाही. थोड्या वेळासाठी जग म्हणेल हाय हाय व नंतर सर्व जैसे थे! हे कालचक्र असेच चालू राहणार आहे.अशा वेळी पूर्वापार सुरू असलेल्या कौटुंबिक जबाबदारीतून थोडे मोकळे होण्याचा प्रयत्न करावा व स्वतःकडे लक्ष देऊन व्यायाम, योगासने इत्यादींमध्ये रमण्याचा प्रयत्न करावा. उत्तम शरीर ठेवण्यासाठी डाएट करा किंवा नका करू, हा तुमचा चॉईस. मात्र कपडे नीटनेटके ठेवून टापटीप राहायचे, पेहराव आकर्षक व सुंदर ठेवावा. चालण्या-बोलण्यात, वागण्यात प्रचंड आत्मविश्वास ठेवावा.

साड्यांची निवड करताना त्या ब्रँडेड व महागड्या असाव्यात असे मात्र मुळीच नाही, पण त्या आकर्षक असाव्यात ही किमान अपेक्षा. शामलवर्णी व्यक्तीने कथ्था, जांभळा, राखाडी रंग टाळावा व अशांनी फेंट रंगाच्या साड्यांना पसंती द्यावी. काळ्या वर्णाच्या व्यक्तींनी आपल्या रंगाचा न्यूनगंड कधीही बाळगू नये. अशा वेळी आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या टेनिसपटू सेरेना विलियम्स, अमेरिकेच्या मिशेल ओबामा यांना डोळ्यापुढे ठेवावे व आपल्या आत्मविश्वासाला बळकटी द्यावी. ज्या गौरवर्णीय सौंदर्यवती आहेत त्यांचा प्रश्नच नाही, त्यांना कुठलाही रंग खुलूनच दिसेल.

एक माझे असे निरीक्षण सुद्धा आहे की, बऱ्याच महिला सनकोट वापरतात. बरेचदा तो जुनाट व रंगहीन झालेला असतो. तसेच बहुतांश वेळी सनकोट हा व्यक्तीच्या परफेक्ट मापाचा नसतोच, तो एक तर आखूड असतो किंवा डगला असतो. अशावेळी आपण जे साड्यांवर लक्ष देतो तेवढेच लक्ष या बाबींवर सुद्धा देणे आवश्यक आहे. हल्ली तोंडाला स्कार्फ/स्ट्रोल बांधण्याचा ट्रेंड आहे, तो सुद्धा स्वच्छ व आकर्षक दिसायला हवा. अनेकदा सबंध अंगावर अख्खी बेडशीटच ओढून घेतल्यासारखे अनेक महिला स्ट्रोल बांधताना करतात, ते टाळावे.तुमचे घर तुमच्या व्यक्तिमत्त्वाचा आरसा आहे हे नेहमी लक्षात ठेवावे, त्यामुळे प्रभावी व्यक्तिमत्त्वासाठी नेहमी जागृत असावे. अमिताभ बच्चन ८४ वर्षांचे आहेत, परंतु केबीसी शोच्या दरम्यान अनेक तरुण महिला बच्चन साहेबांना आलिंगन देण्यासाठी व त्यांना कवेत घेण्यासाठी किती अधीर झालेल्या असतात हे आपण नेहमीच टीव्हीवर पाहतो. आपल्या जन्माचे सार्थक झाल्याचा आनंद त्याक्षणी त्यांच्या चेहऱ्यावर दिसत असतो.

आपल्या आवडीच्या मैत्रिणींचा ग्रुप करून छोट्या-मोठ्या ट्रिपला जाण्याचा प्लॅन करायचा, स्वतःसाठी वेळ द्यायचा. गायन, वादन, लेखन, वाचन यासारखे छंद जोपासायचे. तेही शक्य होत नसतील तर आवडीची गाणी ऐकावीत, नाट्यगीते, सिनेगीते आवर्जून ऐकावीत. कारण संगीत ही फार मोठी साधना असून त्याचा मानवी जीवनावर खोलवर परिणाम होत असतो. संगीताने आत्म्याचा विकास होतो असे ग्रीक तत्त्वज्ञ प्लेटोने आपल्या शिक्षणविषयक विचारसंहितेत इसवी सन पूर्व ३२० मध्ये नमूद केले आहे. संगीत मानवी जीवनाचे अभिन्न असे अंग आहे. जन्मापासून खुळखुळ्याच्या रूपात सुरू झालेला संगीताचा प्रवास मानवी जीवनाच्या अखेरीस बिगुल वाजूनच संपतो, एवढे त्याचे महत्त्व आहे.

प्रेमाने जग जिंकता येते असे म्हणतात आणि प्रत्येक व्यक्ती ही प्रेमाची भुकेली असते, आपल्याशी कुणी दोन गोड शब्द बोलावेत असे प्रत्येकाला वाटत असते, त्याला 'नवरा ' हा प्राणी सुद्धा अपवाद नाही. बायकोने त्याला नुसते गोड शब्दात सांगून पाहावे, तो विहीरीत सुद्धा उडी मारायला मागे पुढे पाहणार नाही, हा माझा दावा आहे. परंतु दुर्दैवाने तसे होत नाही, असा सार्वत्रिक अनुभव आहे, हे खेदाने सांगावेसे वाटते.अशाने सुद्धा त्यांच्या आवाजाची गुणवत्ता कायमची खराब होते व त्यांच्या आकर्षक व्यक्तिमत्त्वात केवळ आवाजामुळे मोठी बाधा निर्माण होते. आवाजात नेहमी मृदुता, लयबद्धता व संयम असावा. हळू आवाजात संवाद साधणे हे सुसंस्कृतपणाचे लक्षण समजले जाते व ती फार मोठी कला आहे.

तुमच्या व्यक्तिमत्त्वात आवाजाची भूमिका जेवढी महत्त्वाची आहे तेवढेच तुमचे एकंदरीत प्रेझेंटेशन सुद्धा महत्त्वाचे आहे. तुम्ही कशा चालता, उभ्या कशा राहता, दिसता कशा, ह्या सर्व गोष्टी मॅटर करतात. त्यासाठी सोयीनुसार पार्लरला जाऊन फेशियल, मसाज, स्टीम बाथ इत्यादीसारखे आवश्यक उपचार करून आपला स्वतःचा रखरखाव योग्य ठेवणे गरजेचे असते. योग्य आहार-विहार यावर लक्ष देऊन आपल्या दैनंदिन सवयी आपण नेहमी अद्ययावत ठेवत राहावे.

**प्रा.डॉ. राजेंद्र भुयार**
' ऋतुगंध '
फ्रेंड्स कॉलनी,अमरावती
मो. ९५०३०४६५५५



# १४ लांडगे आणि नदीचे पुनरुज्जीवन!

अमेरिकेतील येलो स्टोन नॅशनल पार्कमधली ही नदी गेल्या शंभर वर्षांत हळूहळू आटत गेली आणि आता ती फक्त पावसाळ्यातच वाहू लागली. पावसाळ्यानंतर अल्पावधीतच नदी कोरडीच पडू लागली. भरपूर पाऊस पडूनही ती फक्त पावसाळ्यात वाहत होती. शतकभरापूर्वी ती बारमाही वाहत होती.

बऱ्याच अभ्यासानंतर बारमाही वाहणारी ही नदी आटण्याची कारणे आणि तिला पुन्हा वाहते करण्यासाठीच्या उपाययोजनांवर राष्ट्रीय स्तरावर चर्चा झाल्या. त्यातून नदी आटण्याचा संबंध लांडग्यांशी आहे आणि लांडग्यांचा संबंध माणसांशी असल्याचे लक्षात आले.येलो स्टोन नॅशनल पार्क हे अमेरिकेतील पश्चिम युनायटेड स्टेटमधील वायव्य कोपऱ्यात विस्तारलेले एक राष्ट्रीय उद्यान आहे. हे अमेरिकाच नव्हे, तर जगातील पहिले राष्ट्रीय उद्यान म्हणून मानले जाते. तेथील वन्यजीव आणि अनेक भूऔष्णिक वैशिष्ट्यांसाठी हे उद्यान ओळखले जाते. गेल्या शतकाअखेर म्हणजे १९०० पर्यंत या जंगलातील लांडगे तेथील स्थानिक लोकांनी शिकार करून संपवले होते.

लांडग्यांच्या कातडीपासून बनवलेल्या वस्तूंना अमेरिका व युरोपमध्ये खूप मागणी असल्याने त्यांची बेसुमार शिकार होत होती. त्यातून या लांडग्यांचे अस्तित्त्वच माणसाने पूर्ण संपवले होते. त्यामुळे चक्क नदी आटली होती. पण तुम्ही म्हणाल 'हे कसे शक्य आहे?' तर हे रहस्य पुढे उलगडत जाईल....

**...अन् नदी जीवंत झाली**

ही नदी बारमाही वाहती करण्यासाठी पर्यावरण अभ्यासकांच्या सूचनेनुसार १९९५ मध्ये येलो स्टोन पार्कच्या जंगलात फक्त १४ लांडगे आणून सोडण्यात आले. आणि पुढच्या पंचवीस वर्षांत परिस्थिती हळूहळू चमत्कार व्हावा तशी बदलत गेली. २०१९ मध्ये नदी केवळ वाहू लागली नाही तर असंख्य जीव तिच्या आश्रयाला देखील आले. तिथे एक समृद्ध जैवविविधतेचा मोठा खजिनाच तयार झाला. तर त्याच झाले असे, की लांडग्यांची शिकार झाल्यामुळे जंगलातील हरणांची संख्या हळूहळू वाढत गेली. अनेक वर्षे जंगलात हरणांचेच राज्य होते. हरणांना कुणीही भक्षक नसल्याने वर्षानुवर्षे त्यांची संख्या बेसुमार वाढत होती. याच हरणांनी नदीच्या पाणलोट क्षेत्रातील झाडे, गवत फस्त करण्याचेच काम केले होते.

गवताबरोबरच जंगली झाडे, त्यांना आलेली कोवळी पाने खाण्याचा सपाटाच लावला होता. थोडे थोडे करून पाणलोटातील सगळे जंगल त्यांनी बोडखे केले होते आणि हेच नदी आटण्याचे कारण होते. कारण झाडे व गवत नसल्यामुळे पावसाचे पाणी जमिनीत व पुढे खडकात मुरण्याचे प्रमाण जवळपास शून्यच झाले होते.पुढे अभ्यासकांच्या सूचनेनुसार जंगलात लांडगे सोडल्यानंतर त्यांनी हरणांची शिकार करण्यास सुरुवात केली. त्यामुळे हरणांची संख्या फार कमी झाली नाही. परंतु या लांडग्यांना घाबरून हरणे जंगलाच्या काही मर्यादित भागात राहू लागली. हळूहळू लांडग्यांच्या शिकारीमुळे आणि भीतीमुळे हरणांची पैदासही कमी होऊ लागली.

जंगलातील ठरावीक मर्यादित परिसरात हरणे राहू लागल्याने त्यांचे इतरत्र भागातील गवत आणि झाडे खाणे थांबले. त्यामुळे हरणे राहत असलेला जंगलाचा भाग सोडून उर्वरित जंगलातील गवताची आणि झाडांची वाढ व्यवस्थित सुरू झाली. अगदी सहा-सात वर्षांतच जंगल उत्तम फोफावले. जंगलामुळे आणि गवतामुळे पावसाचे पाणी जमिनीत मुरू लागले. मातीची धूपही थांबली. धूप थांबल्यामुळे नदीत गाळ येण्याचे प्रमाण कमी झाले. मुरलेल्या पाण्याने जमिनीखालचे खडक पाण्याने भरू लागले. पावसाळ्यानंतर याच खडकातले पाणी ओसंडून झऱ्याद्वारे नदीत येऊ लागले. हळूहळू चार महिन्यांवरून सहा महिने नदी वाहू लागली. पुढे हळूहळू सहा महिन्यांवरून आठ महिने आणि नंतर बारमाही वाहू लागली. नदी खळखळू लागली... आता नदीच्या काठावरच्या वाढलेल्या झाडांमुळे काठांची झीज अन् पडझडही थांबली.

**अन्नसाखळीचे महत्त्व...**

आता जंगलातील वाढलेल्या गवतात विविध किडे आले. त्यांना खाण्यासाठी बेडूक, सरडे आले. त्यांना खाण्यासाठी साप आणि इतर सरपटणारे प्राणी आले. सरडे अन् सापांमुळे शिकारी पक्षीदेखील येण्यास सुरुवात झाली. अगदी सुवर्ण गरुडही तेथे आला. जंगलात फळे आणि गवतात किडे भरपूर प्रमाणात मिळू लागल्यामुळे स्थलांतरित पक्षीदेखील येऊ लागले. हजारो पक्षी इथे एकेका ऋतूत येऊन राहू लागले.या सर्व पक्ष्यांनी त्यांच्या विष्ठेतून बिया टाकल्या आणि त्याची झाडे उगवली. या झाडांचे मोठे वृक्ष होण्याकडे वाटचाल सुरू झाली. नदीत शेवाळ आले, कायम पाणी असल्याने सूक्ष्मजीव आले, त्यांना खाणाऱ्या कीटकांच्या प्रजाती आल्या. हळूहळू मासे आले. मासे आल्यामुळे मुंगसासारखा बिबरेज वा पाणमांजरासारखे सस्तन प्राणी आले.

हे प्राणी मासे पकडण्यासाठी नदीत लाकडे, फांद्या टाकून बांध करू लागली. त्यांनी केलेल्या या सापळ्यांमध्ये मासे अडकून त्यांना मेजवानी मिळू लागली. अशातही अनुकूल परिस्थिती असल्याने नदीत माशांची पैदास वाढतच गेली. त्यामुळे बदके आली, हेरॉन, बगळ्यांसारखी पक्षी आले. जंगलात बेरीची झाडे आणि माशांची संख्या वाढल्याने अस्वलेदेखील आली. बेरीच फळे आणि नदीतील मासे म्हणजे अस्वलांचे आवडते खाद्य.

तिथे असलेल्या क्वायटीज या लांडग्यासारख्या दिसणाऱ्या रानकुत्र्यांना लांडग्यांनी मारले. त्यामुळे या रानकुत्र्यांचे भक्ष्य असलेले ससे आणि चिचुंदऱ्या यांची संख्या वाढत गेली. त्यांची संख्या वाढल्यामुळे तिथे गरुड, बहिरी ससाण्यासारखे पक्षी आले. तसेच लांडग्यांनी खाऊन शिल्लक राहिलेल्या मांसावर ताव मारायला गिधाड वर्गातील आणि मांस खाणारे पक्षी आले. हे झाले फक्त मोठे ठळक दिसणारे प्राणी.याशिवाय इतरही बऱ्याच वनस्पती अन् प्राणी सृष्टी पुनर्प्रस्थापित झाली. झाडे, गवते, नदी आणि सर्व प्रकारचे जंगलातले प्राणी यांची एक समृद्ध अन्नसाखळी तयार झाली. ती केवळ चौदा लांडग्यांमुळेच. हीच तर खरी गंमत आहे. म्हणजेच अन्न साखळीतील एक दुवा तुटल्यावर अगदी नदीसुद्धा आटू शकते. हे या लांडग्यांच्या उदाहरणावरून आपल्या लक्षात येईल.

ही गंमत जैवविविधता, निसर्ग आणि पाणी या सगळ्यांचा संबंध किती दृढ आहे हे सांगणारी सत्यकथा आहे. नदीमुळे ही अन्नसाखळी की या अन्नसाखळीमुळे नदी, याचे उत्तर कोंबडी आधी की अंडे याच्या उत्तरासारखंच आहे, नाही का? निसर्गातल्या सगळ्यांच अन्नसाखळ्या अद्वैत म्हणता येतील अशाच आहेत. माणसाच्या बेफाम अन् बेफिकीर वागण्याने पाणी प्रदूषणासोबतच विविध जल स्रोतांतील पाणी आटले आहे.

यामुळे आपण अन्नसाखळीतील कोणकोणते दुवे नष्ट केलेत, किंबहुना अन्नसाखळीचे अनेक मनोरे (Food chain pyramid) नष्ट केलेत याची यादी मोठी आहे. यात आपल्याबरोबर सृष्टीचा नाश ही ओढवून घेतला जात आहे. त्यातून वाचायचे असेल तर जैवविविधता, अन्नसाखळ्या यांचे आकलन आवश्यकच आहे.

(लेखक पाणी अभ्यासक असून, पाणी तंत्रज्ञावर लिहिलेल्या 'अभिनव जलनायक' पुस्तकाचे लेखक आहेत.)

संकलन - संदीप संत

**सौजन्य :**
**मारुती वाघाडे**

■ शुक्रवार, १३ नोव्हेंबर २०२६
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सदय

अकोला
जिल्हा विशेष

# भाजपच्या नेत्याला सत्तेचा अहंकार; शेतकऱ्यांचे हित पायदळी

## विकास कामांना आडकाठी आणणाऱ्यांना जागा दाखवणार; उद्धवसेनेचा इशारा

■ प्रतिनिधी | अकोला ■

केंद्र व राज्यातील सत्तेच्या बळावर जिल्ह्यात स्वतःला विकास पुरुष म्हणवून घेणाऱ्या भाजपच्या एका स्थानिक आमदाराला अहंकार व गर्वाने पछाडले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बाळापूर विधानसभा मतदारसंघासाठी मंजूर केलेल्या १० कोटींच्या निधीला भाजपच्या एका स्थानिक अहंकारी आमदाराने खोडा घालून शेतकऱ्यांचे हित पायदळी तुडविल्याचा आरोप उद्धवसेनेचे बाळापूर तालुकाप्रमुख ज्ञानेश्वर म्हैसने यांनी गुरुवारी (१२ नोव्हेंबर) केला आहे.

बाळापूर विधानसभा मतदारसंघातील अनेक प्रमुख रस्त्यांची खड्ड्यांमुळे चाळण झाल्याने अनेक निष्पाप शेतकरी व तरुणांचे बळी गेले आहेत. या मुद्द्यावर उद्धवसेनेचे उपनेता तथा आमदार नितीन देशमुख यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे रस्ते दुरुस्तीसह विकास कामांसाठी १५० कोटी रुपयांचा निधी देण्याची मागणी केली होती. या व्यतिरिक्त केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडेही ८५ कोटी रुपयांची मागणी केली असता केंद्रीय मंत्र्यांनी १० कोटींचा निधी मंजूर केला. दरम्यान, मुख्यमंत्र्यांनी पहिल्या टप्प्यात रस्ते विकासासाठी १० कोटी रुपये निधी मंजूर करताच भाजपच्या स्थानिक लोकप्रतिनिधींना पोटदुखी सुरू झाली. हा निधी कोणत्याही प्रकारे रद्द व्हावा, यासाठी भाजपच्या एका स्थानिक आमदाराने मुख्यमंत्र्यांच्या स्वीय सहाय्यकाला हाताशी धरून हा निधी रद्द करण्याचा खटाटोप केला. याप्रकरणी आमदार देशमुख यांच्यासह मतदारसंघातील अनेक सरपंचांनी नागपूर खंडपीठात धाव घेऊन निधी रद्द करण्याला स्थगिती मिळवल्याने भाजपच्या स्थानिक आमदाराने थयथयाट सुरू केल्याची बोचरी टीका उद्धवसेनेचे तालुकाप्रमुख ज्ञानेश्वर म्हैसने यांनी केली आहे.

### भाजपचा शेतकरी विरोधी चेहरा उघड

आमदार नितीन देशमुख यांच्या शेतकरी आंदोलनाचा धसका घेत भाजपच्या 'त्या' आमदाराने बाळापूर मतदारसंघातील विकास कामांच्या निधीला आडकाठी घातली. हे पाहता भाजपच्या स्थानिक आमदाराचा शेतकरी विरोधी चेहरा उघडा पडल्याची टीका तालुकाप्रमुख म्हैसने यांनी केली आहे.

### विकास आराखड्याच्या आडून कोट्यवधींची लूट

खोट्या तक्रारीच्या आडून राज्य शासनाच्या निर्देशावरून तपास यंत्रणांनी आमदार नितीन देशमुख यांची अनेकदा चौकशी केली. या चौकशीतून काहीही निष्पन्न झाले नाही. दुसरीकडे महापालिकेच्या विकास आराखड्याच्या माध्यमातून भाजपच्या आमदाराने शहरातील अनेक शेतकऱ्यांच्या शेतजमिनी व लेआउटमध्ये ग्रीन झोन, विद्युत सबस्टेशन, भाजी बाजारचे आरक्षण निश्चित केले. आरक्षण हटविण्यासाठी मूळ मालकांकडून कोट्यवधी रुपये उकळल्याचा आरोप तालुकाप्रमुख म्हैसने यांनी केला.

### मुख्यमंत्र्यांनी संपत्तीची चौकशी करावी

भाजपचे दिवंगत ज्येष्ठ आमदार गोवर्धन शर्मा यांच्या आशीर्वादामुळे २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत पहिल्यांदा निवडून आलेल्या संबंधित आमदाराने सत्तेच्या उण्यापुऱ्या १२ वर्षांच्या कालावधीत कोट्यवधी रुपयांची माया जमा केली आहे. मुंबईसह अकोला शहरात मोक्याच्या ठिकाणी आलिशान व्यावसायिक संकुलांची उभारणी केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर प्रामाणिक व निष्कलंक अशी प्रतिमा निर्माण केलेल्या संबंधित आमदाराच्या संपत्तीची चौकशी करण्याची मागणी मुख्यमंत्र्यांकडे करणार असल्याचे तालुकाप्रमुख ज्ञानेश्वर म्हैसने यांनी नमूद केले आहे.

# टीका आम्हालाही करता येते; मात्र महाराष्ट्राची संस्कृती जपा!

## आ. देशमुख यांनी टीका करताना मर्यादा पाळाव्यात; भाजपाचे बाळापूर तालुकाध्यक्ष किशोर कुचके यांचा पलटवार

■ प्रतिनिधी | बाळापूर ■

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे कोणताही राजकीय भेदभाव न करता महाराष्ट्रासह अकोला जिल्ह्याच्या विकासासाठी निधी उपलब्ध करून देत आहेत. मात्र, आमदार नितीन देशमुख यांच्याकडून सातत्याने खालच्या स्तरावर जाऊन टीका केली जात आहे. लोकशाहीत विरोध करण्याचा अधिकार असला, तरी टीका करताना महाराष्ट्राची राजकीय संस्कृती आणि सभ्यतेच्या मर्यादा जपणे आवश्यक आहे. त्यामुळे आमदार देशमुख यांनी आत्मचिंतन करावे, असा सल्ला भाजपाचे बाळापूर तालुकाध्यक्ष किशोर कुचके यांनी दिला.

प्रसिद्धीपत्रकाद्वारे कुचके यांनी आमदार नितीन देशमुख यांच्या टीकेला प्रत्युत्तर दिले. उद्धव ठाकरे यांच्या सरकारच्या तुलनेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बाळापूर विधानसभा मतदारसंघाला विरोधी पक्षाचा आमदार असतानाही अधिक निधी उपलब्ध करून दिला. अशा परिस्थितीत मुख्यमंत्र्यांचे आभार मानण्याऐवजी त्यांच्यावर सातत्याने आरोप करणे योग्य नाही, असे कुचके म्हणाले. आमदार झाल्यापासून देशमुख यांची संपत्ती कशी वाढली, याचा विचार करण्याबरोबरच शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी त्यांनी काय केले, याचेही उत्तर द्यावे, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

निधी रद्द करण्याच्या मुद्द्यावरून देशमुख यांनी केलेल्या टीकेचाही कुचके यांनी समाचार घेतला. आरोप करण्यापूर्वी उद्धव ठाकरे यांच्या सरकारच्या काळात अकोला जिल्ह्यासाठी नेमके काय केले गेले, याचे आत्मपरीक्षण करावे. मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयावर टीका करणे म्हणजे मुख्यमंत्र्यांवर टीका करणे, हे भाजपाच्या कार्यकर्त्यांना चांगलेच ठाऊक आहे. भाजपाचे कार्यकर्ते आणि सर्वसामान्य नागरिकांना अज्ञानी समजण्याची चूक आमदारांनी करू नये, असा इशाराही त्यांनी दिला.

दरम्यान, पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर, खासदार अनुप धोत्रे आणि राज्य सरकार बाळापूरच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील असल्याचा दावा कुचके यांनी केला. खासदार धोत्रे यांनी बाळापूर आणि पातूर परिसरासाठी विविध विकासकामांना निधी उपलब्ध करून दिला आहे.

मात्र, खासदारांचा विरोध करण्यासाठी कार्यकर्त्यांना पाठविण्याचा प्रकारही घडला होता, असा आरोप त्यांनी केला. निधी रद्द होण्यामागे कोणते आर्थिक कारण आहे, याचे स्पष्टीकरण आमदार देशमुख यांनी द्यावे, असे आव्हानही कुचके यांनी दिले.

पारस रस्त्याच्या कामासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १९ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला. मात्र, त्याबद्दल अभिनंदन करणे किंवा मुख्यमंत्र्यांचे नाव घेण्याचे सौजन्यही आमदारांनी दाखविले नाही, अशी टीका कुचके यांनी केली. महायुती सरकार सूडबुद्धीचे राजकारण न करता विकासाच्या संकल्पनेतून काम करीत आहे. त्यामुळे राजकीय आरोप-प्रत्यारोप करताना लोकप्रतिनिधींनी वस्तुस्थितीचे भान आणि भाषेच्या मर्यादा जपाव्यात, असेही कुचके यांनी प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

# वगळलेल्या मतदारांना आणखी एक संधी; गणना प्रपत्र भरण्याचे आवाहन

■ प्रतिनिधी | अकोला ■

विशेष सखोल पुनरिक्षण-२०२६ अंतर्गत महाराष्ट्रातील सर्व २८८ विधानसभा मतदारसंघांच्या प्रारुप मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. घरोघरी भेटीदरम्यान ज्या मतदारांची नावे अनुपस्थित, स्थलांतरित, मयत किंवा दुबार या प्रवर्गात गेल्यामुळे प्रारुप यादीत येऊ शकली नाहीत, अशा मतदारांना भारत निवडणूक आयोगाने नाव नोंदणीसाठी आणखी एक विशेष संधी दिली आहे.

**गणना प्रपत्र भरण्याची प्रक्रिया आणि महत्त्वाच्या बाबी:**

**अर्ज उपलब्धता:** संबंधित मतदारांची जुनी माहिती असलेले गणना प्रपत्र मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत प्रत्यक्ष किंवा व्हॉट्सॲप, ई-मेल आणि एसएमएसद्वारे उपलब्ध करून दिले जातील. तसेच मतदार स्वतः संकेतस्थळावरून किंवा ईसीआयनेटच्या माध्यमातून आपला इपिक क्रमांक टाकून हे प्रपत्र डाउनलोड करून ऑनलाइन भरू शकतात.

स्थानिक रहिवाशांसाठी अट: जे मतदार आपल्या मूळ निवासस्थानापासून स्थलांतरित झालेले नाहीत, त्यांनी गणना प्रपत्रासोबत 'जोडपत्र-ब' जोडून यापूर्वी अर्ज का सादर करू शकले नाहीत याचे कारण नमूद करणे आवश्यक आहे.

**स्थलांतरित मतदारांसाठी अट:** जे मतदार इतरत्र स्थलांतरित झाले आहेत, त्यांनी गणना प्रपत्रासोबत 'जोडपत्र-क' मध्ये आपला नवीन पत्ता आणि विधानसभा मतदारसंघाची माहिती देऊन सध्याच्या ठिकाणच्या मतदार नोंदणी अधिकाऱ्यांकडे अर्ज सादर करावा. **संपर्क मोहीम:** मतदान केंद्रस्तरीय अधिकारी राजकीय पक्षांचे प्रतिनिधी, शेजारी, नातेवाईक किंवा गृहनिर्माण संस्थांच्या मदतीने अशा मतदारांशी संपर्क साधून त्यांना प्रक्रियेची माहिती देतील.

मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या maharashtra.gov.in या संकेतस्थळावर ASDD मतदारांची यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. या यादीत नाव असलेल्या ज्या मतदारांनी प्रारुप यादी प्रसिद्ध झाल्यानंतर नाव नोंदणीसाठी 'फॉर्म-६' भरलेला नाही, त्यांनी तात्काळ ऑनलाइन किंवा ऑफलाइन पद्धतीने गणना प्रपत्र भरावे, असे आवाहन करण्यात आले आहे. मात्र, ज्या मतदारांनी यापूर्वीच फॉर्म-६ भरला आहे, त्यांना पुन्हा गणना प्रपत्र भरण्याची आवश्यकता नाही. तरी सर्व संबंधितांनी पूर्तता करून घेण्याचे आवाहन जिल्हा निवडणूक कार्यालयाने केले आहे.

# पेन्शनर्सना हयातीचा दाखला सादर करणे अधिक सुलभ

## निवृत्तीवेतनधारकांनी डिजीटल हयात प्रमाणपत्र सादर करावे - जिल्हा कोषागार अधिकारी माधव झुंजारे

■ प्रतिनिधी | अकोला ■

राज्य शासनाच्या निवृत्तीवेतनधारकांनी तसेच कुटुंब निवृत्तीवेतनधारकांनी दि. ३० नोव्हेंबरपर्यंत वार्षिक डिजिटल लाइफ सर्टिफिकेट (हयातीचा दाखला) सादर करावे, असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी माधव ब. झुंजारे यांनी केले आहे.

कोषागार कार्यालयामार्फत दरवर्षी निवृत्तीवेतनधारकांना हयातीचा दाखला सादर करण्याबाबत सूचित करण्यात येते. यावर्षी १ ते ३० नोव्हेंबर या कालावधीत प्रचलित पद्धतीनुसार बँकेत हयातीच्या पुस्तकावर सही करून दाखला देण्याऐवजी केंद्र शासनाच्या 'डीएलसी कॅम्पेन ५' अंतर्गत डिजिटल स्वरूपात हयातीचा दाखला सादर करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यासाठी नोव्हेंबर महिनाभर देशव्यापी अभियान चालणार आहे.

त्यामुळे निवृत्ती वेतनधारकांनी आपला वार्षिक हयातीचा दाखला प्रत्यक्ष कागदपत्रांच्या स्वरूपात सादर न करता डिजिटल लाइफ सर्टिफिकेट स्वरूपात सादर करावा. यामुळे प्रमाणपत्र सादर करण्याची प्रक्रिया अधिक सुलभ होणार आहे. तरी अकोला जिल्ह्यातील सर्व राज्य शासकीय निवृत्तीवेतनधारक व कुटुंब निवृत्तीवेतनधारकांनी विहित कालावधीत डिजिटल स्वरूपात हयातीचा दाखला सादर करून सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी माधव ब. झुंजारे यांनी केले आहे.

# जवाहर नवोदय विद्यालय वर्ग सहावीची प्रवेश परीक्षा २८ नोव्हेंबरला

■ प्रतिनिधी | अकोला ■

येत्या २८ नोव्हेंबर २०२६ रोजी होणाऱ्या जवाहर नवोदय विद्यालय वर्ग ६ वी प्रवेश परीक्षेसाठीचे प्रवेशपत्र (ॲडमिट कार्ड) डाउनलोड करण्यासाठीचे पोर्टल सुरू करण्यात आले आहे. या पोर्टलवरुन परीक्षेसाठी ऑनलाइन अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांनी त्यांना अर्ज करताना मिळालेला रजिस्ट्रेशन नंबर (युजर आयडी) आणि जन्मतारीख (पासवर्ड) वापरून आपले प्रवेशपत्र डाउनलोड करून घ्यावे, असे जवाहर नवोदय विद्यालयाचे प्राचार्यांनी केले आहे.

इयत्ता ५ वी मध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी अखिल भारतीय स्तरावर ही परीक्षा घेतली जाते. नवोदय विद्यालय समितीच्या निकषांनुसार वर्ग ६ वी साठी ८० विद्यार्थ्यांची निवड केली जाते.

### प्रवेशपत्र डाउनलोड करण्यासाठी पोर्टल सुरू

निवड झालेल्या विद्यार्थ्यांना इयत्ता ६ वी ते १२ वी पर्यंतचे संपूर्णत: निवासी आणि मोफत सीबीएसई (CBSE) शिक्षण दिले जाते.

अकोला जिल्ह्यातून यावर्षी ६,४१४ विद्यार्थ्यांनी या परीक्षेसाठी ऑनलाइन अर्ज केले असून, जिल्ह्यात २४ परीक्षा केंद्रांची निवड करण्यात आली आहे. या प्रवेश परीक्षेला बसलेल्या सर्व परीक्षार्थींनी २८ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी १०.१५ वाजेपर्यंत प्रवेशपत्रावर नमूद केलेल्या परीक्षा केंद्रावर उपस्थित राहावे. परीक्षेला येताना प्रवेशपत्र (ॲडमिट कार्ड), निळा किंवा काळा बॉल पेन, आधार कार्ड किंवा शासनमान्य निवासी दाखल्याची झेरॉक्स प्रत आदी साहित्य सोबत आणणे अनिवार्य राहील. प्रवेश पत्र डाऊनलोड करण्यासाठी https://cbseitms.rcil.gov.in/nvs/adminCard/Admin2027Card या संकेतस्थळाचा वापर करावा.

अधिक माहितीसाठी जवाहर नवोदय विद्यालय, बाभूळगाव (जहांगीर), अकोला येथे कार्यालयीन वेळेत किंवा प्राचार्यांच्या ८९८०११२७४२ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन विद्यालय प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# नगर परिषदेतर्फे २५ लाभार्थ्यांना घरकुल अनुदानाचे वितरण

## तीन कुटुंबांना हक्काच्या घरांच्या चाव्या; नगर परिषदेत लिफ्टसह अत्याधुनिक स्वच्छता यंत्रणेचे लोकार्पण

■ प्रतिनिधी | अकोट ■

सर्वसामान्यांच्या हक्काच्या घराचे स्वप्न साकार करण्याच्या दिशेने अकोट नगर परिषदेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० अंतर्गत शहरातील २५ लाभार्थ्यांना पहिल्या टप्प्यातील अनुदानाचे वितरण करण्यात आले, तर बांधकाम पूर्ण झालेल्या तीन लाभार्थ्यांना नवीन घरांच्या चाव्या सुपूर्द करण्यात आल्या. घरकुलांच्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या निवाऱ्याचा प्रश्न मार्गी लावत असतानाच नगर परिषदेने आधुनिक सुविधांचीही भर घातली आहे. नगर परिषद इमारतीतील नवीन लिफ्ट आणि स्वच्छता व्यवस्थेसाठी सक्शन कम जेटिंग मशीनचे लोकार्पण यावेळी करण्यात आले.



अकोट नगर परिषद कार्यालयात शुक्रवार, ६ नोव्हेंबर रोजी आमदार प्रकाश पाटील भारसाकळे यांच्या हस्ते हा कार्यक्रम पार पडला. नगराध्यक्षा मायाताई धुळे आणि मुख्याधिकारी शशिकांत मारोती बाबर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी २५ लाभार्थ्यांना पहिल्या टप्प्यातील अनुदान वितरित करण्यासह पात्र लाभार्थ्यांना घरकुल मंजुरी आणि बांधकाम परवानगी पत्रांचे वाटप करण्यात आले.

बांधकाम पूर्ण केलेल्या तीन कुटुंबांना नवीन घरांच्या चाव्या देण्यात आल्या. अनेक दिवसांपासून पाहिलेले हक्काच्या घराचे स्वप्न प्रत्यक्षात उतरल्याने लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि समाधान दिसून आले.

### नागरिकांच्या सुविधांसाठी आधुनिक यंत्रणा

घरकुलांच्या लाभवाटपासोबतच नगर परिषद प्रशासनाने नागरिकांच्या सोयीसाठी दोन महत्त्वपूर्ण सुविधांचे लोकार्पण केले. नगर परिषद इमारतीत बसविण्यात आलेल्या लिफ्टमुळे ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग आणि अन्य नागरिकांना विविध विभागांमध्ये जाणे सुलभ होणार आहे.

तर स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत प्राप्त झालेल्या सक्शन कम जेटिंग मशीनमुळे शहरातील सेप्टिक टँक आणि मलनिस्सारण टाक्यांची स्वच्छता अधिक प्रभावी व सुरक्षितपणे करता येणार आहे. या यंत्रणेमुळे शहराच्या स्वच्छता आणि आरोग्य व्यवस्थेला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड मिळणार आहे.

### घरकुल योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

यावेळी आमदार प्रकाश पाटील भारसाकळे यांनी प्रधानमंत्री आवास योजनेचे महत्त्व अधोरेखित केले. प्रत्येक गरजू कुटुंबाला सुरक्षित, परवडणारे आणि सन्मानाने राहता येईल असे स्वतःचे घर मिळावे, हा या योजनेमागील शासनाचा उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. पात्र नागरिकांनी योजनेचा लाभ घेऊन आपल्या हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण करावे, असे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमाला उपनगराध्यक्ष प्रथमेश बोरोंडे, बांधकाम सभापती सुशील पुंडकर, आरोग्य सभापती अभिजीत कराळे, पाणीपुरवठा सभापती अमोल पालेकर, महिला व बालकल्याण सभापती नैना इंगोले, शिक्षण सभापती सलमा बेगम मोहम्मद खालीद, सर्व नगरसेवक-नगरसेविका, नगर परिषदेचे अधिकारी व कर्मचारी, लाभार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज ॲंड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ३२९**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

**Change In Name**
I Have Change My Name In My Education Document From
**SUNNY HARIRAM MANGHWANI**
-TO-
**SUNNY HARIRAM MANGWANI**
My Residential Address isSindhi Camp, Tq. Akot, Dist. Akola, Maharashtra 444101

# अनुसूचित जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांनीजात वैधता प्रमाणपत्रांचे प्रस्ताव ऑनलाईन सादर करा

■ प्रतिनिधी | अकोला ■

अमरावती अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीच्या कार्यक्षेत्राअंतर्गत येत असलेल्या अमरावती, अकोला व बुलढाणा जिल्ह्यातील अनुसूचित जमाती प्रवर्गातील तसेच आगामी शैक्षणिक वर्षात व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी 'सेवा संकल्प अभियान' राबवले जात आहे. अमरावती अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती यांच्या वतीने हे अभियान राबविले जात असून याद्वारे आदीवासी विद्यार्थ्यांना वेळेत जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध करुन दिल्या जाणार आहे. यासाठी संबंधित विद्यार्थ्यांनी आपले जात वैधता प्रमाणपत्रासाठीचे प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने समितीला सादर करावे, असे आवाहन अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीचे उपाध्यक्ष तथा सहआयुक्त सुदर्शन नगरे यांनी केले आहे.

वर्ग दहावी उत्तीर्ण तसेच इयत्ता अकरावी व बारावी मध्ये शिकत असलेले व शैक्षणिक सत्र २०२७-२०२८ मध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेऊ इच्छिणारे विद्यार्थी जसे नीट, सीईटी, जेईअर् सारख्या प्रवेश परिक्षाकरीता वैधता प्रमाणपत्राची गरज भासते. अशा विद्यार्थ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र प्रस्ताव ऑनलाईन आदि प्रमाण प्रणाली https://etribevalidity.trti-maharashtra.gov.in या संकेतस्थळावर ३० नोव्हेंबर पर्यंत सादर करणे अनिवार्य राहील. ऑनलाईन भरलेल्या अर्जाची मुळ प्रत आवश्यक दस्तऐवजासह अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, अमरावती (पत्ता - सहआयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, अमरावती, मा. राज्य माहिती आयोग कार्यालयाच्या समोर, सना बिल्डींग, चपराशीपुरा, अमरावती, पिन-४४४६०२, दुरध्वनी क्र. ०७२१-२५५०९९५) या कार्यालयात सादर करणे अनिवार्य आहे. व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रस्ताव मुदतीत सादर करण्यासाठी संबंधित शाळा व महाविद्यालयांनी १० डिसेंबर २०१९ च्या शासन निर्णयाचे पालन करावे, अशा सूचना असे अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती व्दारे देण्यात आल्या आहेत.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय



# बोरच्या कोअरमध्ये वाघांचा मुक्काम; बफरमधील पाणवठे आटले

**पाण्याच्या शोधात वाघांचा कोअरकडे मोर्चा; जंगल सफारीत पर्यटकांना घडतेय हमखास व्याघ्रदर्शन**

**वर्धा/जनमाध्यम**

घनदाट जंगल, उंचच उंच वृक्ष, पक्ष्यांचा किलबिलाट आणि अचानक समोर येणारा पट्टेदार वाघ... बोर व्याघ्र प्रकल्पातील जंगल सफारी सध्या पर्यटकांसाठी रोमांचाचा अनुभव ठरत आहे. विशेष म्हणजे, यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने बफर आणि प्रादेशिक क्षेत्रातील निम्म्याहून अधिक नैसर्गिक पाणवठे आटले आहेत. परिणामी, पाण्याच्या उपलब्धतेसह अनुकूल अधिवासाच्या शोधात काही वाघांनी कोअर क्षेत्रात मुक्काम ठोकला आहे. वन्यजीव विभागाच्या निरीक्षणातून ही बाब पुढे आली आहे. त्यामुळे कोअर क्षेत्रातील सफारीदरम्यान पर्यटकांना वाघांच्या दर्शनाची संधी मिळत असून बोरच्या जंगल सफारीकडे पर्यटकांचा ओघ वाढला आहे.





क्षेत्रफळाच्या तुलनेत बोर व्याघ्र प्रकल्पात वाघांची संख्या अधिक असल्याने कोअर क्षेत्रातील व्याघ्र हालचालींना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. बोरची राणी म्हणून ओळखली जाणारी बीटीआर-३ कॅटरिना वाघीण आणि तिचा रुबाबदार बछडा ओम पर्यटकांचे प्रमुख आकर्षण ठरत आहेत.

बीटीआर-१७ या भारदस्त नर वाघाचेही दर्शन पर्यटकांना होत आहे. त्यातच दोन बछड्यांसह कोअर क्षेत्रात आलेली गेस्ट फिमेल टायगर पर्यटकांचे लक्ष वेधून घेत आहे.

जंगल सफारीच्या जिप्सीने प्रवेशद्वार ओलांडताच पर्यटकांची नजर वाघाच्या शोधात जंगल पालथे घालू लागते. कच्च्या रस्त्यांवरील सफारी, झाडाझुडपांमधील वन्यप्राण्यांच्या हालचाली, पक्ष्यांचे आवाज आणि अचानक समोर येणारा वाघ किंवा बिबट्या... प्रत्येक क्षण पर्यटकांसाठी थरारक ठरत आहे. वाघाच्या पावलांचे ठसे आणि त्याच्या हालचालींचे संकेतही सफारीचा रोमांच वाढवत आहेत. दिवाळीच्या सुट्यांपासून नाताळ आणि नववर्षाच्या पर्यटन हंगामापर्यंत बोरमध्ये पर्यटकांची गर्दी वाढण्याची चिन्हे आहेत.

**बफर आणि प्रादेशिक क्षेत्रातील पाणवठ्यांची तहान**

यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने बफर आणि प्रादेशिक क्षेत्रातील नैसर्गिक पाणवठ्यांमधील पाणीसाठा घटला आहे. परिणामी, वन्यप्राण्यांच्या हालचालींमध्ये बदल जाणवत आहेत. तुलनेने पाण्याची उपलब्धता आणि अनुकूल अधिवास असल्याने काही वाघांनी कोअर क्षेत्रात मुक्काम केल्याचे वन्यजीव विभागाच्या निरीक्षणात आढळले आहे. अन्यथा बफर क्षेत्रात वावरणारा बीटीआर-१७ हा नर वाघ सध्या कोअर क्षेत्रात असल्याचे सांगितले जात आहे.

**दिवाळीपासून नववर्षापर्यंत सफारीचे बुकिंग फुल्ल**

दिवाळी, नाताळ आणि इंग्रजी नववर्षाच्या सुट्यांचे नियोजन करून पर्यटकांनी बोर सफारीसाठी ऑनलाइन बुकिंग सुरू केले आहे.

कोअर क्षेत्रातील सफारीचे स्लॉट उपलब्ध होताच आरक्षण पूर्ण होत असून अनेक पर्यटकांना प्रतीक्षा यादीचा पर्याय स्वीकारावा लागत आहे. वाघांचे प्रत्यक्ष दर्शन आणि निसर्गाच्या सान्निध्यातील जंगल भ्रमंती यामुळे बोर व्याघ्र प्रकल्प पर्यटनाच्या नकाशावर विशेष आकर्षण ठरत आहे.

**पर्यटकांची गर्दी; जिप्सी वाढविण्याची मागणी**

बोरच्या कोअर क्षेत्रात अडेगाव गेटवरून दररोज आठ, तर बोरधरण गेटवरून १६ जिप्सी सफारीसाठी सोडल्या जातात. मात्र पुणे, मुंबई, नागपूर, चंद्रपूर, गोंदिया, अकोला यासह राज्याबाहेरील पर्यटकांकडूनही बोरला पसंती मिळत आहे. परिणामी, सफारीचे बुकिंग फुल्ल होत असल्याने पर्यटकांना आरक्षणासाठी प्रतीक्षा करावी लागत आहे. दिवाळी, नाताळ आणि नववर्षाच्या गर्दीच्या काळात कोअर क्षेत्रातील जिप्सींची संख्या वाढवावी, अशी मागणी पर्यटकांकडून होत आहे.

## दुष्काळी मदतीवरचा हक्क सोडला, माणुसकीचा हात पुढे केला

**खा. अमर काळे कुटुंबीयांकडून दिव्यांग निलेश तिवसकरांना पाच हजारांचा आधार**

**आर्वी/जनमाध्यम**

शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झालेली दुष्काळी मदत अनेकांसाठी संकटाच्या काळातील आधार ठरत आहे. मात्र, स्वतःच्या हक्काची पाच हजारांची मदत स्वतःसाठी न वापरता एका निराधार दिव्यांगाच्या हातात देण्याचा निर्णय घेत खासदार अमर काळे यांच्या कुटुंबीयांनी माणुसकीचा वेगळाच आदर्श घालून दिला आहे. राजकारणात आरोप-प्रत्यारोपांची धुळवड सुरू असताना समाजातील गरजू व्यक्तीच्या चेहऱ्यावर हास्य फुलवणारा हा उपक्रम निश्चितच लक्षवेधी ठरला आहे.

आर्वी तालुक्यातील शेतकरी महिला मयूरा अमर काळे यांच्या खात्यात शासनाची दुष्काळी मदत म्हणून पाच हजार रुपये जमा झाले होते. ही रक्कम स्वतःकडे न ठेवता एखाद्या खऱ्या गरजू व्यक्तीला द्यावी, असा विचार खासदारपुत्र अजित काळे यांनी



मांडला. त्यांच्या या संवेदनशील भूमिकेला काळे कुटुंबीयांनी तात्काळ प्रतिसाद दिला.

आर्वी येथील निलेश तिवसकर हे ९० टक्के दिव्यांग असून त्यांच्या आई-वडिलांचे छत्रही हरपले आहे. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत जीवन जगणाऱ्या निलेश यांना मदतीची गरज असल्याचे लक्षात घेऊन खासदार अमर काळे, मयूरा काळे आणि अजित काळे यांनी पाच हजार रुपयांची संपूर्ण दुष्काळी मदत त्यांच्याकडे सुपूर्द केली.

ही मदत स्वीकारताना निलेश भावुक झाले. स्वतःच्या अडचणींशी झुंज देणाऱ्या एका शेतकरी कुटुंबाने आपल्यासाठी आपल्या हक्काची मदत सोडल्याची भावना त्यांच्या मनाला स्पर्शून गेली. त्यांनी काळे कुटुंबीयांचे आभार मानताना अजित काळे यांच्या विचारांचे विशेष कौतुक केले. वडिलांचे संस्कार आणि गोरगरिबांविषयीचा कळवळा अजित यांच्या विचारांत दिसत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

## पारधी बेड्यावर भाजयुमोची दिवाळी; वंचितांच्या दारी पोहोचला सणाचा आनंद

**संजय गाते, पृथ्वीराज शिंदे यांनी साधला नागरिकांशी संवाद**

**वर्धा/जनमाध्यम**

दिवाळीचा झगमगाट शहरांपुरता आणि उत्सव केवळ प्रतिष्ठितांच्या चौकटीत न राहता समाजातील शेवटच्या घटका पर्यंत पोहोचला पाहिजे, या भावनेतून भारतीय जनता युवा मोर्चाने धपकी येथील पारधी बेड्यावर दिवाळीचा आनंद साजरा केला.

या स्नेहसंमेलनातून पारधी बांधवांसोबत आनंदाचे क्षण वाटून घेत सामाजिक बांधिलकीचा संदेश देण्यात आला.

भाजपचे जिल्हाध्यक्ष संजय गाते आणि भाजयुमोचे जिल्हा ध्यक्ष पृथ्वीराज शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा उपक्रम पार पडला. यावेळी केवळ शुभेच्छांची औपचारिकता न करता पारधी समाजातील नागरिकांशी थेट संवाद साधण्यात



आला. समाजातील वंचित आणि उपेक्षित घटकांच्या वस्त्यांपर्यंत सणांचा आनंद पोहोचविणे, त्यांच्याशी आपुलकीचे नाते निर्माण करणे आणि सामाजिक एकोपा अधिक मजबूत करणे, हा या उपक्रमामागील उद्देश असल्याचे यावेळी सांगण्यात आले. दिवाळीच्या निमित्ताने पारधी बांधवांसोबत साजरा केलेला हा आनंद सामाजिक सहभागाचा संदेश देणारा ठरला.

कार्यक्रमाला जिल्हा कार्यालयमंत्री जीवन सुर्वे, सेलू तालुका मंडळ अध्यक्ष प्रफुल खोडे, तालुका महामंत्री विकास मोटमवार, मनोज केळझरकर, अनुसूचित जमाती मोर्चाचे सेलू तालुका अध्यक्ष गजानन परतेकी, युवा मोर्चाचे जिल्हा सचिव शिवा डुकरे, सेलू तालुका अध्यक्ष गोलू कामिणकर, आशिष काळे यांच्यासह भाजयुमोचे पदा धिकारी, कार्यकर्ते आणि पारधी वस्तीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांचे 'नशा मुक्त युवा' अभियान

**देवळी/जनमाध्यम**

'आपला देश जगामध्ये युवा देश म्हणून ओळखला जातो. परंतु अनेक युवक नशेच्या आहारी गेलेले असून त्यांना नशा मुक्त करणे आपल्या देशापुढे फार मोठे आव्हान आहे आणि हे आवाहन केवळ युवा वर्गच स्वीकारू शकतात. म्हणजेच समाजाला नशा मुक्त केवळ युवा वर्गच करू शकतात, असे प्रतिपादन देवळीचे जेष्ठ पत्रकार सत्तार शेख यांनी स्थानिक एस एस एन जे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना युनिट व राष्ट्रीय छात्र सेना युनिट यांच्या संयुक्त विद्यमाने 'नशा मुक्त युवा' या जनजागृती पर देवळी बस स्थानकावर आयोजित कार्यक्रमात करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी एनसीसी अधिकारी तथा रासेयो कार्यक्रम अधिकारी कॅप्टन मोहन गुजरकर तर प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ पत्रकार सत्तार शेख व पत्रकार संतोष तुरक उपस्थित होते.

पर्यावरण पूरक दिवाळी उपक्रमांतर्गत राष्ट्रीय सेवा योजना युनिटच्या स्वयंसेवकांनी बस स्थानकावर 'नशा मुक्त युवा' या विषयावर सार्जंट आरती मरघडे, वैष्णवी भोयर व वैष्णवी चौधरी यांनी भव्य रांगोळी काढून सदर रांगोळीतून नशा मुक्त समाजाचा संदेश दिलेला आहे. कार्यक्रमाची सुरुवात स्थानिक एस एस एन जे महाविद्यालयातील एनसीसी सभागृहात 'पर्यावरण पूरक दिवाळी साजरी करू या!' ही शपथ सार्जंट साक्षी पारिसे हिने दिली.



स्काऊट चे जनक लॉर्ड बेडन पॉवेल यांना भारत आणि गाईड्स च्या स्थापना दिनानिमित्त तर क्रांतिकारक डॉ पांडुरंग सदाशिव खानखोजे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करण्यात आले. नशा मुक्त अभियानात सोमेश्वर पोराटे, प्रवेश किटे, राम देशमुख, कोमल शिवरकर, आकांशा थूल, आर्यन शिवरकर, राज ठाकरे, तेजस वाघाडे, पवन पुरी, अंजली गढवेकर, समीक्षा कन्नाके वैष्णवी भोयर, चांद पोहाणे व स्वयंसेवकांनी पथनाट्य सादर करून बस स्थानकावरील वातावरण मंत्रमुग्ध केले. यशस्वीते करिता अंडर ऑफिसर स्नेहा मडकाम, सलोनी अजमिरे, सार्जंट कुंदन कावडे, युवराज डफरे, राधिका नागोसे, रश्मी मडावी, उदय काळे व राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी अथक परिश्रम केले.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**

(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष** - १४ **अंक** - ३४५

आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

**मुख्यकार्यालय :** — अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१

फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८

**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiramdeshpande@gmail.com

## कौशिक झेंडेची वैद्यकीय क्षेत्रात यशस्वी भरारी

**बीएएमएससाठी प्रवेश मिळाल्याने पत्रकार संघटनेकडून गौरव**

**आर्वी/जनमाध्यम**

जिद्द, मेहनत आणि ध्येयाप्रती असलेल्या समर्पणाच्या बळावर यशाचे शिखर गाठण्याच्या दिशेने कौशिक मिनल विजय झेंडे याने महत्त्वपूर्ण पाऊल टाकले आहे. वैद्यकीय क्षेत्रात डॉक्टर होण्याचे स्वप्न उराशी बाळगणाऱ्या कौशिकला डॉ. राजेंद्र गोडे आयुर्वेद महाविद्यालयात बीएएमएस अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळाला आहे. त्याच्या या यशाने झेंडे (जयस्वाल) परिवाराचा आनंद



द्विगुणित झाला असून, त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

लहानपणापासूनच वैद्यकीय शिक्षण घेऊन रुग्णसेवेच्या माध्यमातून समाजाचे ऋण फेडण्याचे स्वप्न कौशिकने पाहिले. त्याच्या या स्वप्नपूर्तीच्या दिशेने सुरू झालेल्या वाटचालीचे सर्वत्र कौतुक होत आहे. विजय झेंडे यांचा पाल्य असलेल्या कौशिकच्या यशाची दखल घेत आर्वी तालुका पत्रकार संघटनेच्या वतीने त्याचा सत्कार करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी पत्रकार अनिल जोशी, डॉ. श्यामसुंदर भुतडा, विजय अजमिरे, सूर्यप्रकाश भट्टड, प्रा. अभय दर्भे, सुशीलसिंह ठाकूर, उदय बाजपेयी, सतीश शिरभाते, सुनील पारसे, अरविंद लिल्लोरे, गौरव कुऱ्हेकर, मीनल झेंडे, असित दहाट, अभिनव झेंडे व मयंक झेंडे उपस्थित होते.

## गुन्हे वृत्त

### विविध ठिकाणी गांजा प्रकरणात पोलीस कारवाई

**वर्धा-** शहरातील रेल्वे स्थानक परिसरात गांजाचे सेवन करणाऱ्यांविरुद्ध पोलिसांनी कारवाई केली. ११ नोव्हेंबर रोजी दुपारी १२.४३ ते १.१७ वाजताच्या दरम्यान रेल्वे स्टेशनच्या ऑटो पार्किंग परिसरात ही कारवाई करण्यात आली. पोलिसांनी केलेल्या तपासणीत संबंधित व्यक्तींकडे गांजा सेवनासाठी वापरली जाणारी चिलीम, जळालेली काडी तसेच इतर साहित्य आढळून आले. यामध्ये शेख शहनवाज रोखार (३२, रा. जाकीर हुसेन कॉलनी, वर्धा) याचाही समावेश असल्याची नोंद आहे. पोलिसांनी चिलीम व गांजा सेवनासाठी वापरलेले साहित्य जप्त केले. या प्रकरणी एनडीपीएस कायद्याच्या कलम २७ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. रेल्वे स्थानक परिसरात अंमली पदार्थांचे सेवन करणाऱ्यांवर पोलिसांकडून लक्ष ठेवण्यात येत आहे.

तसेच रेल्वे स्थानकासमोरील परिसरात गांजाचे सेवन करणाऱ्या दोघांविरुद्ध पोलिसांनी कारवाई केली. ११ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ४.१५ ते ५ वाजताच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली. पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पथकाने रेल्वे स्थानक परिसरात शोधमोहीम राबविली. यावेळी अक्षय संपपाल शंभरकर (३७, रा. स्टेशन परिसर, वर्धा) हा गांजाचे सेवन करताना आढळून आला. पोलिसांनी पंचांसमक्ष त्याची अंगझडती घेतली असता अर्धवट जळालेली गांजा पिण्याची चिलीम, पांढरा कपडा, बिडीचा तुकडा तसेच जळालेल्या काड्या व राख आढळली. पोलिसांनी हे साहित्य जप्त करून वैद्यकीय तपासणीसाठी नमुने घेतले. एनडीपीएस कायद्याच्या कलम २७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच शहरातील रेल्वे स्थानकासमोरील परिसरात गांजाचे सेवन करणाऱ्या तरुणावर पोलिसांनी कारवाई केली. ११ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ४.३० ते ५.१५ वाजताच्या दरम्यान ही घटना उघडकीस आली. पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पथकाने रेल्वे स्थानक परिसरात शोध घेतला. यावेळी कृष्णानगर येथील हरीश गजानन लोणकर (२३) हा गांजाचे सेवन करताना आढळला. पोलिसांनी पंचांसमक्ष त्याची झडती घेतली असता अर्धवट जळालेली चिलीम, पांढरा कपडा, बिडीचा तुकडा तसेच जळालेल्या काड्या आणि राख आढळून आली. पोलिसांनी संबंधित साहित्य जप्त केले. तसेच वैद्यकीय तपासणी करून नमुने घेण्यात आले. याप्रकरणी एनडीपीएस कायद्याच्या कलम २७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

### महादेव मंदिर परिसरात गांजा ओढताना दोघांना पकडले

**हिंगणघाट -** शहरातील सार्वजनिक ठिकाणी अमली पदार्थांचे सेवन करणाऱ्यांविरुद्ध हिंगणघाट पोलिसांनी विशेष मोहीम राबविली. या मोहिमेदरम्यान डागा जिन्याजवळील महादेव मंदिर परिसरात चिलममधून गांजा ओढताना दोघांना पोलिसांनी रंगेहात पकडले. विजय अशोकराव वाढरे (४०, रा. शास्त्री वॉर्ड, हिंगणघाट) आणि शंकर अन्नाजी ढोकपांडे (५०, रा. हनुमान वॉर्ड, हिंगणघाट) अशी आरोपींची नावे आहेत. पोलीस अधीक्षकांच्या विशेष आदेशानुसार हिंगणघाट पोलिसांचे पथक ११ नोव्हेंबर रोजी शहरात गस्तीवर होते. दरम्यान, डागा जिन्याजवळील महादेव मंदिर परिसरात काही व्यक्ती गांजाचे सेवन करीत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. मंदिराच्या मागील बाजूस दोन व्यक्ती चिलममधून गांजा ओढताना आढळून आल्या. पोलिसांनी दोघांना ताब्यात घेऊन झडती घेतली असता गांजा सेवनासाठी वापरण्यात येणारी चिलीम, खडा, कापड आणि माचिस असा साहित्य आढळून आले. पोलिसांनी पंचनामा करून हे साहित्य जप्त केले. तसेच दोघांची वैद्यकीय तपासणी करून रक्त व लघवीचे नमुने घेतले. या प्रकरणी पोलीस हवालदार नरेंद्र नामदेवराव सहाके यांच्या तक्रारीवरून दोघांविरुद्ध एनडीपीएस कायदा १९८५ च्या कलम २७ व २९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सोनकुसरे करीत आहेत.

### ८० वर्षीय महिलेचा सेवाग्राममध्ये मृत्यू

**हिंगणघाट -** कवडघाट येथील ८० वर्षीय महिलेचा सेवाग्राम येथील रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. सिंधुबाई नानाजी माने (८०, रा. कवडघाट, ता. हिंगणघाट) असे मृत महिलेचे नाव आहे. या प्रकरणी हिंगणघाट पोलिसांत अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ९ नोव्हेंबर रोजी सिंधुबाई माने यांची प्रकृती अचानक बिघडली. त्यांना उपचारासाठी सेवाग्राम येथील कस्तुरबा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, तपासणीदरम्यान डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. त्यानंतर शवविच्छेदनाची प्रक्रिया पूर्ण करून मृतदेह अंत्यसंस्कारासाठी नातेवाइकांच्या ताब्यात देण्यात आला. याप्रकरणी सेवाग्राम पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली होती. मात्र, मृत्यूचे घटनास्थळ हिंगणघाट पोलीस ठाण्याच्या हद्दीत येत असल्याने संबंधित कागदपत्रे प्राप्त झाल्यानंतर हिंगणघाट पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद घेतली. महिलेच्या मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. पुढील तपास पोलीस हवालदार प्रवीण चौधरी करीत आहेत.

### चौकात बसलेल्या तरुणाला लोखंडी साखळीने मारहाण

**देवळी -** चौकात बसलेल्या तरुणाला जुन्या वादातून शिवीगाळ करीत लोखंडी साखळीने मारहाण केल्याची घटना ११ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ४ ते ४.३० वाजताच्या सुमारास घडली. याप्रकरणी राजू राजुरकर आणि त्याच्या मुलाविरुद्ध पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली आहे. तक्रारीनुसार, फिर्यादी हा कामावरून घरी परतल्यानंतर चौकात बसला होता. यावेळी राजुरकर कुटुंबातील महिलेने त्याला तू माझ्याकडे का पाहतोस, असा जाब विचारत वाद घातला. त्यानंतर राजू राजुरकर आणि त्याच्या मुलाने तेथे येत फिर्यादीला शिवीगाळ केली. लोखंडी साखळीने मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणी पोलिसांनी संबंधितांविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

शुक्रवार, १३ नोव्हेंबर २०२६
E-paper - www.janmadhyam.com
जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# वडरपुरा येथे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी साजरी केली दिवाळी-भाऊबीज

## -वनजमिनीचे पट्टे महसूल विभागामार्फत कष्टकऱ्यांना मोफत देण्याचा निर्धार!





**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्याचे महसूल मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी वडरपुरा येथील कष्टकरी महिलांसमवेत दिवाळी भाऊबीज साजरी केली. यावेळी कष्टकरी महिलांकडून त्यांचे औक्षण करण्यात आले. ४० वर्षापासून वन विभागाकडे नोंदलेल्या जमिनी महसूल विभाग ताब्यात घेऊन संजय नगरातील गोरगरीब जनतेला घर बांधकामासाठी उपलब्ध करून देण्याचा निर्धार त्यांनी यावेळी व्यक्त केला. यासाठी येत्या २७ तारखेला विशेष बैठक घेण्यात येईल अशी घोषणाही पालकमंत्री बावनकुळे यांनी यावेळी केली.

दिवाळीचा सण यावर्षीच्या दुष्काळजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर गोरगरीब जनतेमध्ये जाऊन साजरा करण्याच्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार पालकमंत्री नागपूर जिल्ह्याच्या दौऱ्यानंतर आज अमरावती जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. यादरम्यान त्यांनी अचलपूर तालुक्यातील आदिवासी बांधवांसोबत दिवाळी साजरी करून सायंकाळी अमरावती शहरातील वडरपुरा येथील कार्यक्रमास उपस्थित झाले. यावेळी हजारोच्या संख्येने या परिसरातील कष्टकरी महिला उपस्थित होत्या.

सर्व उपस्थित महिलांना दिवाळीनिमित्त शुभेच्छा व्यक्त करून पालकमंत्री बावनकुळे म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्याचा सर्वांगिन विकासाचा संकल्प केला असून अमरावती जिल्ह्याच्या विकासासाठी अनेक प्रश्न मार्गी लावले जात आहेत. शेतकरी आणि शेतमजूर हा विकासाचा केंद्रबिंदू मानून गोरगरीब कष्टकरी वर्गाला आधार देण्यात येणार आहे. वडार समाजाच्या मुलांना ७०० ब्रासपर्यंत दगड-गोटा रॉयल्टी शिवाय मोफत देण्यात येणार आहे. अशी सवलत कुंभार समाजाला यापूर्वी देण्यात आली असून ई-श्रम कार्ड, प्रधानमंत्री आवास योजनांचा लाभ या कष्टकऱ्यांना देण्यात येणार आहे. वन विभागाच्या जमिनीच्या बदल्यात महसूल विभाग जमिनी देऊन अशा जमिनी समाज घटकाला दिल्यानंतर प्रॉपर्टी कार्ड देण्यात येणार आहे. अडीच लाख रुपयांचे अनुदान घर बांधण्यासाठी देण्याचा निर्णय घेण्यात येईल व त्यांना पुढील २० वर्षे वीज बिल शून्य येईल अशा सूर्यघर योजनेचा लाभ देण्यात येईल. या माध्यमातून वडार समाजाच्या उन्नतीचे ध्येय साध्य करण्यात येईल असेही ते म्हणाले.

१ जानेवारी, २०११ पूर्वी ज्या ज्या जमिनीवर घर बांधून राहत असेल अशांना प्रॉपर्टी कार्ड देण्याची योजना असल्याचे सांगून पालकमंत्री बावनकुळे यांनी रहिवाशांना १ हजार रुपयांमध्ये रजिस्ट्री करून देण्यात येईल यासाठी विशेष शिबिराचे आयोजन करून रजिस्ट्री करून देण्याची सूचनाही त्यांनी यावेळी केली.

प्रारंभी आमदार रवी राणा आणि माजी खासदार नवनीत राणा यांनी पालकमंत्र्यांचे शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी अचलपूरचे आमदार प्रवीण तायडे व इतर मान्यवरांची उपस्थिती होती.

प्रास्ताविकपर भाषणात आमदार रवी राणा यांनी गोरगरीब कष्टकरी महिलांसमवेत दिवाळी भाऊबीज साजरी करण्याचा मनोदय व्यक्त करून उपस्थित राहिल्याबद्दल पालकमंत्री बावनकुळे यांचे आभार मानले व या भागातील अडीअडचणी सांगितल्या.

यावेळी पालकमंत्री बावनकुळे यांच्या हस्ते २०२७ सालच्या दिनदर्शिकेचे विमोचन करण्यात आले. पालकमंत्री यांच्या समवेत सर्व मान्यवरांनी यावेळी फुलझडी पेटवून प्रतीकात्मक दिवाळी साजरी केली. भाऊबीज भेट म्हणून यावेळी महिलांना माहेरची साडी आणि किराणा वाटप करण्यात आले.

## भूतान येथे ४ थे आंतरराष्ट्रीय योग सम्मेलन व योगासन स्पर्धा २८ ते २९ नोव्हेंबर ला

**अमरावती/प्रतिनिधीः-** बृहन महाराष्ट्र योग परिषद व विख्यात श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या मार्गदर्शनाखाली ४ थे आंतरराष्ट्रीय योग्य समेलन व योगासन स्पर्धा भूतानची राजधानी थीम्पू येथे २८ व २९ नोव्हेंबर २०२६ ला आयोजित होत आहे. या अगोदरची संमेलने श्रीलंका, दुबई व काश्मीर येथे यशस्वीपणे आयोजित श्री.ह.व्या.प्र. मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य, सविच व उपप्राचार्य डॉ. माधुरी चेंडके, डी.सी.पी.ई. चे प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपाडे, माजी प्राचार्य डॉ. अरुण खोडस्कर यांच्या मार्गदर्शनात झाली आहेत.

या संमेलन आयोजनाचा मुख्य उद्देश योगाचा प्रचार प्रसारासोबतच श्री.ह.व्या.प्र. मंडळाच्या कार्याची माहीती भूतान देशात व्हावी व त्या ठिकाणचे युवक प्रशिक्षणाकरिता मंडळात यावे असा आहे. संमेलनाला भारतातील नामवंत योगतज्ञ तसेच श्रीलंका येथील प्रा. डॉ. इंडिका, सेशल्स येथील प्रा. स्टीव्ह मार्गदर्शन करतील. याशिवाय भूतानच्या ध्यान केंद्राचे मार्गदर्शक सुद्धा मार्गदर्शन करतील.

संमेलनाच्या प्रतिनिधी मध्ये अमरावती स्थानिक प्रतिनिधी सोबतच बृहन महाराष्ट्र योग परिषदेच्या जिल्हा योग शाखा मुंबई, पुणे, कोल्हापूर, नाशिक, संभाजीनगर, अमरावती येथील योगप्रेमी सहभागी होत आहेत. दोन दिवसाच्या समेलनानंतर भूतानच्या प्रेक्षणीय स्थळांना भेटी देण्याचा कार्यक्रम असेल. समेलनाचे उद्घाटन करिता तेथील शिक्षण व क्रीडा अधिकाऱ्याना निमंत्रित केले आहे.

निवास, भोजन, प्रवास व्यवस्था स्थानिक यात्रेचे प्रमुख गणेश गावंडे (मो-९३७०१७७४९९) यांच्याकडे असून, प्रा डॉ. वशिष्ठ खोडस्कर (मो-७०२१७७६६४०) हे शोध निबंध प्रस्तुतीकरण पाहतील व स्पर्धा आयोजन प्रा डॉ. पल्लवी गव्हाणे (पुणे) हे साभाळतील. अधिक माहिती करिता प्राचार्य डॉ. अरुण खोडस्कर (मो-९४२३६२३९६७) यांचाशी संपर्क साधावा.

## श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळातर्फे २२ नोव्हेंबरला भव्य सायकल रॅली




**अमरावती/प्रतिनिधीः-** युवा पिढीला व्यसनांपासून दूर ठेवून शारीरिक तंदुरुस्ती, आरोग्यदायी जीवनशैली आणि व्यसनमुक्त समाजाचा संदेश देण्याच्या उद्देशाने श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या खेलो इंडिया केंद्रातर्फे रविवार, २२ नोव्हेंबर रोजी भव्य सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. केंद्र सरकारच्या युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयाच्या माय भारत आणि फिट इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या 'नशामुक्त युवा फॉर विकसित भारत' अभियानांतर्गत ही सायकल रॅली आयोजित करण्यात येत आहे. श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य यांची प्रेरणा आणि मंडळाचे उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत चेंडके, सचिव प्रा. डॉ. माधुरीताई चेंडके यांच्या प्रमुख उपस्थितीतमध्ये सकाळी ६.३० वाजता श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती येथून या उपक्रमाला सुरुवात होणार आहे.

श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ हे गेल्या अनेक वर्षांपासून क्रीडा, शारीरिक शिक्षण आणि युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत आहे. याच परंपरेतून खेलो इंडिया केंद्राच्या माध्यमातून युवकांमध्ये व्यसनमुक्ती, फिटनेस आणि क्रीडा संस्कृती रुजविण्यासाठी हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

व्यसनमुक्त युवा हीच विकसित भारताची खरी ताकद असून तरुणाईने व्यसनांच्या आहारी न जाता क्रीडा, व्यायाम आणि आरोग्यदायी उपक्रमांकडे वळावे, हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. सायकलिंग हा उत्तम शारीरिक व्यायाम असून त्यातून शारीरिक क्षमता, सहनशक्ती आणि मानसिक स्वास्थ्य वृद्धिंगत होण्यास मदत होते. त्याचबरोबर पर्यावरणपूरक वाहतुकीचा संदेशही या उपक्रमातून दिला जाणार आहे.

या सायकल रॅलीत सहभागी होणाऱ्या सायकलस्वारांना अभियानाचे मोफत टी-शर्ट देण्यात येणार असून त्यांच्या आरोग्याची काळजी घेत हेल्दी फराळ आणि स्पोर्ट्स ड्रिंक्सची व्यवस्थाही करण्यात आली आहे. त्यामुळे युवकांसह सायकलिंगची आवड असणाऱ्या नागरिकांनाही या उपक्रमात सहभागी होण्याची संधी मिळणार आहे.

या रॅलीत जास्तीत जास्त युवक, विद्यार्थी, क्रीडाप्रेमी आणि नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून व्यसनमुक्त भारताच्या संकल्पनेला बळ द्यावे, असे आवाहन श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्यावतीने करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी जितेंद्र भुयार (९४०३०८६७९१) आणि अनिल नागपुरे (९७६५१७५५७३) यांच्याशी संपर्क साधावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

## जेवण करून परतणाऱ्या दोन युवकांवर चाकूहल्ला

**अमरावती/प्रतिनिधीः-** जेवण करून दुचाकीने घरी परतणाऱ्या दोन युवकांवर जुन्या वादातून चाकूने जीवघेणा हल्ला करण्यात आल्याची घटना रविवारी रात्री अंबागेट परिसरातील इंद्रभुवन थिएटरजवळ घडली. या हल्ल्यात कार्तिक महेंद्र खंडेतोड (वय २९) हा गंभीर जखमी झाला असून, हर्षल गुप्ता यालाही दुखापत झाली आहे. कार्तिकवर खासगी रुग्णालयात उपचार सुरू असून त्याची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती आहे. या प्रकरणातील तिन्ही हल्लेखोर फरार असून खोलापुरी गेट पोलिस त्यांचा शोध घेत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, कार्तिक खंडेतोड आणि त्याचा मित्र हर्षल गुप्ता हे दोघे रविवारी रात्री लोणी येथून दुचाकीने अमरावतीकडे परतत होते. अंबागेटच्या आतील भागात इंद्रभुवन थिएटरजवळ त्यांना काही परिचित युवक भेटले. त्यामुळे दोघांनी तेथे थांबून त्यांच्याशी संवाद साधला. यावेळी बोलण्यावरून वादाला सुरुवात झाली. 'तू मध्ये का बोलत आहेस?' अशा शब्दांवरून वाद वाढल्याची माहिती आहे. सुरुवातीला हर्षलला थापडा मारण्यात आल्या. त्यानंतर हल्लेखोरांनी अचानक चाकू काढून हल्ला करण्याचा प्रयत्न केला. हर्षलला वाचविण्यासाठी कार्तिक पुढे सरसावला असता, हल्लेखोरांनी त्याच्या पोटावर आणि छातीवर चाकूने सहा ते सात वार केले. या हल्ल्यात कार्तिक गंभीर जखमी झाला. हर्षललाही मारहाण करण्यात आली. घटनेनंतर तिन्ही हल्लेखोर घटनास्थळावरून पसार झाले.

घटनेची माहिती मिळताच खोलापुरी गेट पोलिसांनी जखमींना जिल्हा रुग्णालयात दाखल केले. कार्तिकची प्रकृती गंभीर असल्याने त्याला पुढील उपचारासाठी खासगी रुग्णालयात हलविण्यात आले. पोलिसांनी जीवघेण्या हल्ल्याचा गुन्हा दाखल करून फरार आरोपींचा शोध सुरू केला आहे.

## मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरीक्षण

### दावे व हरकती दाखल करण्यासाठी १३ नोव्हेंबरपर्यंत मुदत

**अमरावती/प्रतिनिधीः-** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार महाराष्ट्रातील मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरीक्षण २०२६ कार्यक्रमाचे सुधारित वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. सुधारित वेळापत्रकानुसार, दावे व हरकती दाखल करण्याची मुदत १३ नोव्हेंबर पर्यंत असणार आहे. तसेच नोटीस टप्पा, दावे व हरकती निकाली काढण्याची मुदत २५ नोव्हेंबर पर्यंत आहे. अंतिम मतदार यादी ३० नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध करण्यात येणार असल्याचे अवर सचिव तथा उप मुख्य निवडणूक अधिकारी प्रशांत नावगे यांनी कळविले आहे.

## १० वी आणि १२ वी परीक्षा आवेदनपत्रांसाठी मुदतवाढ

**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी - मार्च २०२७ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षांसाठी नियमित शुल्काने विद्यार्थ्यांची ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यास ३० नोव्हेंबर २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. तसेच माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी ३० नोव्हेंबर २०२६ पर्यंत विहित पध्दतीने शुल्क भरावयाचे आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी - मार्च २०२७ मध्ये भरण्याबाबतच्या तारखा कळविण्यात आल्या आहेत.

त्यानुषंगाने नियमित विद्यार्थी, तसेच पुनर्रिक्षार्थी, नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी, श्रेणी सुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय घेऊन प्रविष्ट होणारे तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थेदवारे ट्रांसफर ऑफ क्रेडिट घेणारे विद्यार्थी विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे नियमित शुल्काने सादर करावयाची असून त्यास ३० नोव्हेंबर २०२६ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. आवेदनपत्रे www.mahahsscboard.in संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने भरावयाची आहेत. माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी ३० नोव्हेंबर २०२६ पर्यंत विहित पध्दतीने शुल्क भरावयाचे आहे. तसेच ७ डिसेंबर २०२६ पर्यंत शुल्क पावती, विद्यार्थ्यांच्या प्रिलिस्ट विभागीय मंडळाकडे जमा करावयाची आहे.

## कर्जमुक्तीमुळे डोक्यावरील कर्जाचे ओझे उतरल्याच्या शेतकऱ्यांच्या भावना

### ५ हजारांच्या अग्रीम मदतीने दिवाळीत मिळाला दिलासा

**अमरावती/प्रतिनिधीः-** कर्ज माफीमुळे शासन भक्कमपणे आपल्या पाठीशी उभे असल्याच्या व डोक्यावरील मोठ ओझ कमी झाल्याच्या भावना सुरेन्द्र अरुण सावरकर या शेतकऱ्याने व्यक्त केल्या.इसराइल तोगा इब्राहिम खान पठाण आणि मंगेश भाऊरावजी पाटील या शेतकऱ्यांना दिवाळीआधी राज्य शासनाकडून ५ हजार रुपयांची अग्रीम मदत प्राप्तझाल्याने दिलासा मिळाल्याच्या भावना त्यांनी मांडल्या.

'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' अंतर्गत अमरावती जिल्ह्यातील राष्ट्रीयीकृत बँका आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या माध्यमातून ७ ऑगस्ट ते ४ नोव्हेंबर या कालावधीत चार टप्प्यात एकूण ८१ हजार ६१८ लाभार्थी शेतकरी कुटुंबांना ७८३ कोटी २२ लाख रुपयांचे वितरण करण्यात आले आहे. अमरावती तालुक्यातील टाकळी जहांगीर गावातील सुरेन्द्र अरुण सावरकर यांना पहिल्या टप्प्यात कर्जमाफीचा लाभ मिळाला.शेतीसाठी त्यांनी कर्ज घेतले होते. राज्य शासनाच्या कर्जमुक्ती योजनेचा लाभ मिळाल्याने शेतकरी आत्महत्याच करणार नाहीत, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.शासन असे संकटाच्या काळात आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याने त्यांनी समाधान व्यक्त केले.

याच गावातील शेतकरी इसराइल तोगा इब्राहिम खान पठाण म्हणाले, माझ्या शेतातील विहिरीला आजपर्यंत पाण्याची तूट झाली नाही. मात्र, यावर्षी दुष्काळ सदृश्य परिस्थितीमुळे केवळ पाच ते सहा तासा नंतरच विहिरीचा पाणी पुरवठा खंडित होतो. अशा स्थितीत शेती करणे कठीण होत आहे. अशात राज्य शासनाकडून मिळालेली ५ हजारांची अग्रीम रक्कम मोलाची ठरली.राज्य शासनाने शेतकऱ्यांसाठी विविध कल्याणकारी योजना आखल्या आहेत. त्या सर्व योजना व उपक्रमांचा लाभ शेतकऱ्यांना मिळेल,असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. मंगेश भाऊरावजी पाटील यांनी सांगितले, अमरावती जिल्ह्यासह राज्यात दुष्काळाची स्थिती निर्माण झाली आहे. शेती व शेतकरी संकटात सापडले आहे. यावर्षी दिवाळीही साजरी करता येणार नाही अशी स्थिती उत्पन्न झाली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुष्काळाच्या सावटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिवाळी साजरी करता यावी म्हणून ५ हजार रुपयांची अग्रीम मदत जाहीर केली. या मदतीचा लाभ अन्य शेतकऱ्यांसह मलाही लाभ मिळाला असून माझ्यासह राज्यातील शेतकऱ्यांना हा मोठा दिलासा असल्याचेही त्यांनी सांगितले. जिल्ह्यात २ नोव्हेंबर पासून शेतकऱ्यांच्या आधारलिंक खात्यात रक्कम जमा केली जात आहे. तालुका व जिल्हास्तरावर खाती स्विकृत करण्यात आलेल्या शेतकऱ्यांच्या ३ लाखांवर खात्यांमध्ये प्रत्येकी ५ हजार याप्रमाणे १५३ कोटीवर रुपये जमा करण्यात आले आहेत. या मदतीमुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

## रहाटगावजवळ कार डिव्हायडरवर चढली

### चालकाचे नियंत्रण सुटल्याने अपघात

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील नागपूर रोडवर रहाटगावजवळ गुरुवारी सायंकाळी भरधाव कार अनियंत्रित होऊन थेट रस्त्याच्या डिव्हायडरवर चढली. अचानक घडलेल्या या घटनेमुळे परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. सुदैवाने या अपघातात कोणालाही दुखापत झाल्याची किंवा जीवितहानी झाल्याची माहिती समोर आलेली नाही. मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवारी सायंकाळी सुमारे ५ वाजताच्या दरम्यान नागपूर रोडवरील राहाटगाव परिसरातून एक कार जात होती. यावेळी अचानक चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यामुळे कार रस्त्याच्या मधोमध असलेल्या डिव्हायडरवर जाऊन चढली. अचानक कार डिव्हायडरवर चढल्याने रस्त्याने ये-जा करणाऱ्या वाहनचालकांची एकच तारांबळ उडाली.

या घटनेनंतर घटनास्थळी नागरिकांची गर्दी जमा झाली. काही काळ वाहनचालकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते. डिव्हायडरवर कार अडकल्याने इतर वाहनांना मार्ग काढताना अडचणींचा सामना करावा लागला. मात्र, अपघातात अन्य कोणतेही वाहन सहभागी झाल्याची माहिती नाही.

नागपूर रोड हा शहरातील वर्दळीचा मार्ग असल्याने या मार्गावर दिवसभर वाहनांची मोठी गर्दी असते. अशा परिस्थितीत वाहनावरील नियंत्रण सुटल्याने गंभीर अपघात होण्याची शक्यता होती. मात्र, सुदैवाने मोठी दुर्घटना टळली.

प्राथमिक माहितीनुसार, चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटणे हे अपघाताचे कारण असल्याचे सांगितले जात आहे. कार डिव्हायडरवर कशी चढली आणि वाहनाचे नेमके किती नुकसान झाले, याबाबत अधिकृत माहिती उपलब्ध झालेली नाही.

## नाल्याच्या बंधाऱ्यावर सुरू होता हातभट्टीचा अड्डा

### -१.४८ लाखांचा मुद्देमाल जप्त -आठ ड्रम सडवा माल जागीच नष्ट, एकाला अटक

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात अवैध हातभट्टीची दारू तयार करण्याच्या तयारीत असलेल्या एकाला गाडगेनगर पोलिसांच्या डीबी पथकाने रंगेहात पकडले. वलगाव रोडवरील शाळेच्या मागील बाजूस नाल्याच्या बंधाऱ्यावर सुरू असलेल्या या कारवाईत पोलिसांनी आठ ड्रम सडवा माल, दारू तयार करण्याचे साहित्य आणि दुचाकीसह एकूण १ लाख ४८ हजार ९३० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. रामनाथ कन्हैयालाल वाघमारे (वय ४९, रा. सिद्धार्थनगर, नवसारी) असे ताब्यात घेतलेल्या आरोपीचे नाव आहे.

शुक्रवारी ६ नोव्हेंबर रोजी दुपारी १२.४० वाजताच्या सुमारास गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या डीबी पथकाला वलगाव रोड परिसरात हातभट्टीची दारू तयार केली जात असल्याची गोपनीय माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी ऑर्चिड शाळेच्या मागील बाजूस असलेल्या नाल्याच्या बंधाऱ्यावर छापा टाकला. यावेळी रामनाथ वाघमारे हा हातभट्टीची दारू तयार करण्याच्या तयारीत असल्याचे आढळून आले.

पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी केली असता, मोहा, गूळ आणि तुरटी मिश्रित आठ ड्रम सडवा माल आढळून आला. याशिवाय चार लोखंडी ड्रम, जर्मन धातूचे तीन कोपर, दारू तयार करण्यासाठी लागणारे अन्य साहित्य, कच्चा माल आणि आरोपी वापरत असलेली ॲक्टिव्हा दुचाकी असा मुद्देमाल मिळून आला. पंचांसमक्ष पोलिसांनी हा मुद्देमाल जप्त केला. आठ ड्रममधील सडवा माल घटनास्थळीच नष्ट करण्यात आला. या प्रकरणी रामनाथ वाघमारे याच्याविरुद्ध गाडगेनगर पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमाच्या कलम ६५ (क) अन्वये गुन्हा दाखल करून कारवाई करण्यात आली आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त परिमंडळ-१ यशवंत सोळंके आणि सहाय्यक पोलीस आयुक्त निलेश ब्राह्मणे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव यांच्या निर्देशानुसार करण्यात आली. डीबी पथकाचे सहायक पोलीस निरीक्षक संदीप हिवाळे, पोलीस हवालदार भारत वानखडे, पोलीस नाईक राजेश गुरले, पोलीस शिपाई मतीन शेख, सुशांत प्रधान, धनराज कुमरे, महेश शर्मा आणि चालक पोलीस हवालदार अजय निस्ताने यांनी या कारवाईत सहभाग घेतला.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे

संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक ७०
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## नगर परिषद कार्यालय, अचलपूर
## जाहीरनामा

या जाहीरनाम्याद्वारे सर्व जनतेला कळविण्यात येते की, अर्जदाराचे नांव **श्री.मोहम्मद फहीम अब्दुल रशिद**, पत्ता बिलनपुरा, अचलपूर जि.अमरावती यांनी अचलपूर नगर परिषदेच्या वार्ड क्र.३२ संगणक मालमत्ता क्र.ACHA000/29999 जुना मालमत्ता क्र. ३२००११३८ नझुल शिट क्र.२०, प्लॉट नं.३, लेआऊट प्लॉट ४६ ही कर आकारणी नोंदवहीनुसार **मोहम्मद मुजीब खान मिया खान** या नावाने असून वरील अर्जदार यांनी या श्री.मोहम्मद फहीम अब्दुल रशिद नावाने फेरफार घेण्याकरीता/नाव बदलण्यास/नाव लावण्यास/नावामध्ये-क्षेत्रामध्ये दुरुस्ती करण्याकरीता (खरेदी, मृत्यूपत्र, बक्षीसपत्र, नोटरी, प्रतिज्ञापत्र, न्यायालयाद्वारे) या कार्यालयामध्ये दिनांक ०६.११.२०२६ रोजी अर्ज सादर केलेला आहे. याविषयी कोणास आक्षेप/हरकत घ्यावयाची असल्यास हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत लेखी स्वरुपात दस्तऐवजाचे पुराव्यासह दाखल करुन हजर रहावे. मुदतीनंतर नियमाप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

उपरोक्त मालमत्तेची चतुःसिमा -

**पुर्वेस** - शेत
**पश्चिमेस** - प्लॉट नं.४७
**दक्षिणेस** - प्लॉट नं.५४-ए, ५४-बी
**उत्तरेस** - लेआऊटमधील १८ मिटर रोड

शिक्का

**मुख्याधिकारी,**
**नगर परिषद, अचलपूर**

## जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांस कळविण्यात येते की, माझे पक्षकार नामे या खालील शेत मालमत्तेविषयी जाहीर नोटीस देत आहे, त्याचे वर्णन-

शेत मालमत्ता मौजे शिरजगांव (भी) ता.मोर्शी, जि.अमरावती येथील गट नं.२४१, ० हे.८२ आर, गट नं.२४१, १ हे.१९ आर, गट नं.१४, ० हे.६० आर या शेत मालमत्ता **मयत अंजनाबाई महादेवराव अवघड** यांच्या मालकीच्या आहेत व त्यांचा मृत्यू २१.०९.२०२६ रोजी झालेला असून सदर मालमत्तेमध्ये **श्रीमती कांताबाई देविदासराव घुरडे व सुरेश महादेवराव अवघड** यांचा कायदेशीर वारस असल्यामुळे प्रत्येकी निम्मा वाटा आहे. तरी नमूद शेत मालमत्तेबाबत नामे **सुरेश महादेवराव अवघड** यांच्यासोबत कुणीही खरेदी-विकीचा व्यवहार करु नये. तसे केल्यास आपणास गंभीर परिणामास सामोरे जावे लागेल व सदरचा झालेला व्यवहार **श्रीमती कांताबाई देविदासराव घुरडे** यांच्यावर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

करीता ही जाहीर नोटीस.

दिनांक / २०२६
स्थळ - अमरावती

संपर्काचा पत्ता
श्रीमती कांताबाई देविदासराव घुरडे तर्फे
अधिवक्ता ॲड.निलेश आर.वांगे
रा.जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावती,
ता.जि.अमरावती
मो.नं.९५२७२५८८३२

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांसाठी राज्यव्यापी लढ्याची हाक

## नागपूर हिवाळी अधिवेशनापूर्वी जिल्हानिहाय मोर्चे काढण्याचे आवाहन

**अमरावती/का.प्र.**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळा, विद्यार्थी, शिक्षण आणि शिक्षकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत शासनाचे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने राज्यव्यापी लढ्याची हाक दिली आहे. शिक्षकांच्या प्रश्नांवर प्रभावी तोडगा काढण्यासाठी राज्यातील सर्व शिक्षक संघटनांनी आपापसातील मतभेद, गट-तट आणि वैयक्तिक प्रतिष्ठा बाजूला ठेवून एकत्रितपणे आंदोलन उभारावे,असे आवाहन समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे,राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर यांनी केले आहे.




स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांमध्ये अत्यावश्यक सुविधांचा अभाव,विद्यार्थ्यांच्या दैनंदिन शिक्षणावर होणारा परिणाम, विविध शैक्षणिक उपक्रम व अभियानांचा वाढता भार आणि शिक्षकांचे प्रलंबित सेवाविषयक प्रश्न यामुळे शैक्षणिक व्यवस्था अडचणीत आली आहे.शिक्षकांना अध्यापनाव्यतिरिक्त विविध अशैक्षणिक कामे करावी लागत असल्याने विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणावर परिणाम होत असल्याची चिंता समितीने व्यक्त केली आहे.

टीईटी, पदोन्नती, वेतनवाढ, पदवीधर वेतनश्रेणी, शिक्षण सेवक योजना, वरिष्ठ शिक्षकांची मूळ सेवा, बदली धोरण,जुनी पेन्शन योजना, प्रवासभत्ता, मुख्यालयी निवास तसेच शिक्षकांच्या इतर सेवाविषयक मागण्यांकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रश्नांवर केवळ निवेदने देऊन भागणार नसून संघटित संघर्षाची आवश्यकता असल्याचे समितीने स्पष्ट केले आहे.

येत्या ७ डिसेंबर २०२६ पासून नागपूर येथे विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन सुरू होत आहे. या अधिवेशनापूर्वी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात विविध मागण्यांसाठी मोर्चे काढून शासनाचे लक्ष वेधावे,असे आवाहन करण्यात आले आहे.अधिवेशनादरम्यान मागण्यांबाबत ठोस निर्णय न झाल्यास पुढील काळात जिल्हास्तरावर उपोषण आणि ठिय्या आंदोलन करण्याची भूमिका मांडण्यात आली आहे.

यासाठी राज्यातील सर्व शिक्षक संघटनांच्या प्रमुख प्रतिनिधींची दोन ते तीन दिवसांची ऑनलाइन बैठक घेऊन मागण्यांवर सविस्तर चर्चा करावी.त्यानंतर सर्व संघटनांच्या सहमतीने एकत्रित मागण्यांचे निवेदन तयार करून 'प्राथमिक शिक्षक संघटनांची समन्वय कृती समिती – महाराष्ट्र' यांच्या माध्यमातून शासनापर्यंत पोहोचवावे, अशी सूचना करण्यात आली आहे.

शिक्षकांचे प्रश्न हे केवळ शिक्षकांपुरते मर्यादित नसून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याशीही निगडित आहेत. त्यामुळे सर्व संघटनांनी एकजुटीने पुढाकार घेऊन 'आपला लढा आपणच लढूया!' या निर्धाराने संघर्षात सहभागी व्हावे, असे आवाहन प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे,राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर यांनी केले आहे.असे शिक्षक समितीचे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी कळविले आहे.

# रस्त्यावर बंगाली काट्यांच्या फांद्या; वाहनचालकांना अपघाताचा धोका!

**टाकरखेडा संभू/वार्ताहर**

पूर्णानगर–रामा ते टाकरखेडा शंभू या मार्गावर रस्त्याच्या दुतर्फा वाढलेल्या बंगाली काट्यांच्या झाडांच्या फांद्या थेट रस्त्याच्या मधोमध आल्याने वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या फांद्यांमुळे दुचाकी व चारचाकी वाहनचालकांना अपघाताचा धोका निर्माण झाला असून, संबंधित विभागाने तातडीने छाटणी करण्याची मागणी होत आहे.



या मार्गाच्या दोन्ही बाजूंनी बंगाली काट्यांची झाडे आणि झुडपे मोठ्या प्रमाणात वाढली आहेत. त्यातील अनेक फांद्या रस्त्यावर पसरल्याने वाहन चालविताना अडचणी निर्माण होत आहेत. विशेषतः समोरून वाहन आल्यास दुसऱ्या वाहनाला बाजू देताना कसरत करावी लागते. काही ठिकाणी फांद्या रस्त्याच्या मधोमध आल्याने वाहनचालकांना अंदाज घेऊन मार्ग काढावा लागत आहे.रात्रीच्या वेळी या फांद्या स्पष्टपणे दिसत नसल्याने दुचाकीस्वारांच्या अंगाला काटे लागण्याची तसेच वाहनावरील नियंत्रण सुटून अपघात होण्याची शक्यता आहे. या मार्गावरून दररोज विद्यार्थी, शेतकरी, शेतमजूर आणि इतर नागरिकांची ये-जा सुरू असते. त्यामुळे ही समस्या केवळ गैरसोयीची नसून नागरिकांच्या सुरक्षिततेशी संबंधित बनली आहे.

संबंधित विभागाने या मार्गाची पाहणी करून रस्त्याच्या दुतर्फा वाढलेल्या बंगाली काट्यांच्या फांद्या व झाडाझुडपांची तातडीने छाटणी करावी, अशी मागणी वाहनचालक व परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

# मुंबई आणि पुण्याका येथून ये-जा करणाऱ्या गाड्यांचे आरक्षण फुल

**अमरावती/का.प्र.**

अमरावती, बडनेराहून दिवाळीमुळे मुंबई सीएमटी, दादर आणि पुण्यकडे येथून ये-जा करणाऱ्या सर्व गाड्यांचे आरक्षण पूर्ण झाले आहे. त्यामुळे, प्रवासी उत्सव विशेष गाड्यांमध्ये आरक्षण मिळवण्याचा प्रयत्न करत आहेत. काही गाड्यांची प्रतीक्षा यादी आधीच १०० वर पोहोचली आहे. इतर काही गाड्यांमध्ये आरक्षण मिळणे अवघड आहे.

सण, सुट्ट्या आणि वाढत्या गर्दीमुळे रेल्वेमध्ये कन्फर्म तिकीट मिळणे अवघड झाले आहे. अमरावती आणि बडनेरा ते मुंबई आणि पुण्याकडे जाणाऱ्या बहुतेक गाड्यांमध्ये प्रवाशांची प्रचंड गर्दी असते आणि स्लीपर व एसी दोन्ही वर्गांमधील प्रतीक्षा यादी वाढली आहे. अमरावती-पुणे एक्सप्रेस (गाडी क्रमांक ११०२६) ही अमरावती ते पुण्याला जाणारी सर्वात महत्त्वाची आणि थेट गाडी आहे. या गाडीचे आरक्षण कित्येक दिवस आधीच पूर्ण होते. पुणे-नागपूर गरीब रथ एक्सप्रेस (गाडी क्रमांक १२११४/१२११३) फक्त बडनेरा मार्गावर धावते. यामध्ये आरक्षण मिळवणे अवघड झाले आहे. फक्त अजनी-पुणे एसी एक्सप्रेस (गाडी क्रमांक २२१२४) मध्ये प्रतीक्षा यादी आहे. महाराष्ट्र एक्सप्रेस (गाडी क्रमांक ११४०/११०४०) ही अमरावती-बडनेरा मार्गावरून गोंदियाहून सुतुनमार्गे पुण्यकडे जाणारी एकमेव गाडी आहे, जी पूर्ण भरलेली असते. आझाद हिंद एक्सप्रेस (ट्रेन क्र. १२१३०) ट्रेनमध्येच प्रवाशांचा प्रचंड दबाव आहे. अमरावती, बडनेरा ते मुंबई (सीएसएमटी, एलटीटी) जाणाऱ्या प्रमुख नियमित गाड्यांचे आरक्षण पूर्ण झाले आहे. अमरावती-मुंबई सीएसएमटी सुपरफास्ट एक्सप्रेस (ट्रेन क्र. १२११२) ही अमरावती ते मुंबई जाणारी एक लोकप्रिय ट्रेन आहे, त्यामुळे तिचे तिकीट मिळणे अवघड आहे. विदर्भ एक्सप्रेस (ट्रेन क्र. १२१०६) ही नागपूर-सटन-बडनेरा मार्गाने मुंबईला जाणारी एक अत्यंत महत्त्वाची ट्रेन आहे. किंवा ट्रेन आरक्षणासाठी वाट पाहण्याचा खच. सेवाग्राम एक्सप्रेस (ट्रेन क्र. १२१४०) मधील आरक्षण पूर्णपणे भरले आहे आणि प्रतीक्षा यादी बरीच मोठी आहे.

## संक्षिप्त

### कल्पक ढोके राज्यस्तरीय 'तलवारबाजी' प्रावीण्य

**नांदगाव खंडेश्वर** - क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जालना यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय शालेय 'तलवारबाजी' स्पर्धेत. कल्पक धम्मपाल ढोके '१४ वर्षे, मुले' या वयोगटात तलवारबाजीच्या 'सेबर' या प्रकारात नुकत्याच



जालना येथे झालेल्या राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धेतील सेबर याप्रकारात ( सांघिक) तृतीय आला असून या यशाबद्दल तसेच प्रशिक्षक अजिंक्य वानखडे यांच्या मार्गदर्शना बद्धल नांदगाव हायस्कूलचे मुख्याध्यापक अश्विन पोच्छी,उप-मुख्याध्यापिका अरुणा मार्डिकर,पर्यवेक्षिका प्रज्ञा काळे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचाली करिता शुभेच्छा दिल्यात.

### सिमेंट रस्त्याच्या मधोमध विद्युत खांब; अपघातांचा धोका वाढला!

**अचलपूर** - अचलपूर शहरातील व्यंकटेश शाळेजवळून सुलतानपुराकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण करण्यात आले आहे. मात्र, या रस्त्याच्या अगदी मधोमध विद्युत खांब कायम असल्याने वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी हे खांब वाहनचालकांच्या लक्षात न आल्याने लहान-मोठे अपघात घडत असून, नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.अशा परिस्थितीत विद्युत खांबांचे स्थलांतर अद्याप का करण्यात आले नाही? रस्त्याचे काँक्रीटीकरण करताना संबंधित ठेकेदाराने आणि नगर परिषद प्रशासनाने याकडे दुर्लक्ष का केले? महावितरण विभागाने याबाबत पुढाकार का घेतला नाही? आणि भविष्यात एखादा मोठा अपघात घडल्यास त्याची जबाबदारी नेमकी कोण घेणार? असे संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केले जात आहेत.संबंधित विभागांनी तातडीने दखल घेऊन रस्त्याच्या मधोमध असलेले विद्युत खांब सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करावेत, तसेच तोपर्यंत आवश्यक सुरक्षा उपाययोजना कराव्यात, अशी मागणी वाहनचालक व नागरिकांकडून होत आहे.



### 'सनातन पंचांग २०२७' हिंदी ॲपचा लाभ घ्यावा

**अमरावती** - श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाचे महासचिव प.पू. गोविंद देवगिरीजी महाराज यांच्या शुभहस्ते पुणे येथे 'सनातन पंचांग २०२७' या हिंदा ॲपचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी महाराजांनी ॲपचे कौतुक करून शुभाशीर्वाद दिले.'सनातन पंचांग' ॲप मराठी, हिंदी, इंग्रजीसह सात भाषांमध्ये अँड्रॉइड आणि आयओएस प्रणालीवर विनामूल्य उपलब्ध आहे. या ॲपमध्ये शुभमुहूर्त, सण-उत्सव, धार्मिक तिथी, धर्मशिक्षण, आरोग्यविषयक टिप्स, दिनविशेष तसेच संकष्टी चतुर्थी व एकादशीच्या पूर्वसूचना यांसारख्या सुविधा देण्यात आल्या आहेत. अमरावतीतील भाविकांनीही 'सनातन पंचांग २०२७' हिंदी ॲप डाउनलोड करून त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन हिंदू जनजागृती समितीचे अमरावती जिल्हा समन्वयक सचिन वैद्य यांनी केले आहे.



### हरी शांती कॉलनीतील समस्यांचा उपमहापौरांकडून आढावा!

**अमरावती** - हरी शांती कॉलनी परिसरातील नागरिकांनी विविध समस्या आणि विकासकामांसंदर्भात दिलेल्या निवेदनाची दखल घेत महानगरपालिकेचे उपमहापौर सचिन भेंडे यांनी परिसराची पाहणी करून विविध समस्यांचा व प्रलंबित विकासकामांचा आढावा घेतला. यावेळी परिसरातील नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेण्यात आल्या. नागरिकांना आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित समस्यांवर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, अशी ग्वाही उपमहापौर सचिन भेंडे यांनी यावेळी दिली. नागरिकांच्या समस्या प्राधान्याने सोडवून परिसराच्या विकासासाठी आवश्यक ती पावले उचलली जातील, असेही त्यांनी आश्वस्त केले. उपमहापौरांनी नागरिकांच्या निवेदनाची दखल घेतल्याने परिसरातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

# जी.एच रायसोनी विद्यापीठात 'माईंड मॅटस'या तार्किक विचारांवर अतिथी व्याख्यान

**अमरावती/का.प्र.**

जी एच रायसोनी विद्यापीठात रायसोनी सदा ज्ञान व्याख्यान मालिकेअंतर्गत 'माईंड मॅटर्स : द पॉवर ऑफ लॉजिकल थिंकिंग' या विषयावर एक महत्त्वपूर्ण अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले. या प्रसंगी तिरपुडे इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट एज्युकेशन, नागपूर येथील सहाय्यक प्राध्यापिका व एक्सटर्नल एंगेजमेंट हेड डॉ. गीता नायडू प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होत्या.



आपल्या संवादात्मक संबोधनात डॉ. नायडू यांनी शैक्षणिक ज्ञान आणि प्रत्यक्ष जीवनातील समस्यांचे निराकरण यांच्यात दुवा जोडण्याची गरज अधोरेखित केली. त्यांनी सहभागींना संज्ञानात्मक पूर्वग्रहांवर मात करण्याच्या तंत्रांची, संरचित विश्लेषणात्मक चौकटी वापरण्याची तसेच ५-व्हाईज पद्धतीसारख्या रूट-कॉज ॲनालिसिस साधनांच्या वापराची माहिती दिली.डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी एसएलव्ही-३ मोहिमेतील तांत्रिक अपयशाचे केलेले विश्लेषण, वर्गीस कुरियन यांनी अमूलमध्ये केलेले व्यवस्थित नवाचार आणि मुंबईच्या डब्बावाल्यांची कार्यक्षमता या उदाहरणांद्वारे त्यांनी स्पष्ट केले की संरचित नियोजन आणि वस्तुनिष्ठता प्रभावी निर्णय घेण्यास कशी मदत करते. तसेच दैनंदिन तार्किक सराव, सॉक्रेटिक प्रश्न आणि साप्ताहिक निर्णय ऑडिट यासारख्या व्यावहारिक सवयीही त्यांनी सांगितल्या.

कार्यक्रमाची सुरुवात श्रेया फुलझेले यांच्या स्वागतपर भाषणाने व वक्त्याच्या परिचयाने झाली. त्यानंतर विद्यापीठाचे गीत सादर करण्यात आले. या सत्रात मोठ्या संख्येने विद्यार्थी आणि शिक्षक उपस्थित होते.

आपल्या अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. विनायक एस. देशपांडे यांनी आयोजन समिती, विशेषतः समन्वयक डॉ. प्रकाश नारायण तसेच टीम सदस्य सचिन देशपांडे, अश्विनी राठी आणि कुणाल बोरकर यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले. कार्यक्रमाची सांगता भाग्यश्री चितलांगे यांच्या आभार झाली.

# शेकडो गोसेवकांच्या सेवेने उजळला गाई गोंदन सोहळा

## गाडगेबाबा गोरक्षण संस्था स्थळी रंगली हरिपाठ व भजन संध्धा

**दर्यापूर** - माहुली ( धांडे) परिसरातील गोरक्षण संस्थेने दिवाळी सणातील पारंपारिक गाई- गोंदन दिवसाला दान - दात्यांना केलेल्या मदतीच्या आवाहनाला आर्थिक तथा श्रम सेवा प्रतिसाद मिळाल्याने या स्थळी असणाऱ्या एकूण तिनशे वीस गाय-वासरांना एकतीस एजार रूपयांचा येथेच्छ अलप प्रदान करून गाई- गोंदन सोहळा झाला.



गाय वासरांना प्रदान करण्यात आलेल्या या विशेष अलप भोजन उपक्रमात अकोला येथील स्वप्नीलजी गिल्डा,डॉ अभिनंदन गुप्ता, डॉ रश्मी टाले, सौ ममता काळे, डॉ संजय मकवाना , डॉ पी डी भानावत, प्रा पी एम राऊत,डॉ विजय ठाकरे, प्रा दिलीप जडे, प्रा शशिकांत ठाकरे, प्रा आर एस जाधव, प्रा सुधीर ढोमणे, प्रा शाहू चोरे, प्रा निंगवाल, आशिष पागरूत तथा अमरावती वरून विद्यापीठाचे प्रकुलगुरू डॉ महेंद्र ढोरे, आशिषजी नागरे, समाजसेवक धीरूभाई सांगाणी, प्रसाद पांडे,प्रा राम विघे, महेंद्र कराळे, डॉ नरेंद्र माने, अजयराव देशमुख, पत्रकार एस जी मोरे तसेच दर्यापूर मधून भारतीय सैन्य जवान अमोल दादारावजी भारसाकळे, बाळासाहेब वसू, डॉ विठ्ठलराव साबळे, राजेशजी चांडक, विजयराव पांडे, वैभव तिवारी, गुणवंत येवले , राजेंद्र गायगोले इत्यादी दानदात्यांचे आर्थिक योगदान देऊन गोरक्षण संस्थेद्वारे स्वतःला उपकृत करून घेतले. गोरक्षण संस्थेचे अध्यक्ष अनिल रामकृष्ण भारसाकळे, उपाध्यक्ष विजयपाटील धुमाळे तथा विश्वस्त सुनील गुणवंत भारसाकळे यांच्या उपस्थितीत डॉ विठ्ठलराव साबळे तथा श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे आजीव सभासद शेषरावजी काळे, मातोश्री चंद्रकालाताई रामकृष्ण भारसाकळे यांनी गोपूजन करून प्रारंभ झालेल्या या कार्यक्रमात दर्यापूर तालुक्यातील बेलोरा येथील हरीपाठ महिला भजन मंडळ व नरदोडा येथील सदगुरु बालकदास भजन मंडळाने आपल्या अप्रतिम सादरीकरणाने गोरक्षण परीसरात भक्ती रंग भरून उपस्थित शेकडो गोप्रेमींना मंत्रमुद्ध केले . या संपूर्ण सोहळ्यास तथा प्रसाद भोजन कार्यक्रमात चंद्रकांत ठाकरे, साहेबराव तराळ, राजू पाटील टाले, मंगेश पाटील भारसाकळे, प्रफुल्ल भारसाकळे, अमोल रानगट, मंगेश ठाकरे, राम हुतके, शेख अब्रार, निलेश मोहोड, सारंग काकड, उमेश कातखेडे, श्रीकृष्ण पोटे, अंकुश घरडे, विनोद घरडे, बाबूराव भारसाकळे, आशिष ठाकरे, रोहन फेरन, तेजस साखरे, योगेश भारसाकळे यांचेसह बेलोरा येथील युवकवर्ग यांनी सेवादानाच्या कार्याने योगदान दिले. याप्रसंगी बहुसंख्येने कार्यक्रमात उपस्थित सर्व गोप्रेमी, गोसेवक व दानदात्यांचे गोरक्षण संस्थेचे व्यवस्थापक अनिल उर्फ बाळासाहेब नामदेवराव भारसाकळे यांनी आभार व्यक्त केले .

# शेतकऱ्यांना १२ तास वीजपुरवठ्याची घोषणा कागदावरच!

## इतर फीडरना दिवसा वीज,शेतकऱ्यांच्या नशिबी रात्रीचा अंधार; सहा तास तरी दिवसा वीज देण्याची मागणी

**अंजनगाव बारी/वार्ताहर**

शेतकऱ्यांना १२ तास वीजपुरवठा देण्याच्या घोषणेनंतरही प्रत्यक्षात कृषी वीजपुरवठ्याच्या वेळापत्रकामुळे शेतकऱ्यांच्या अडचणी कायम असल्याचे चित्र निरसाना परिसरात दिसून येत आहे. महावितरणने २० ऑक्टोबर २०२६ पासून लागू केलेल्या नवीन वेळापत्रकानुसार सातरगाव AG व पार्डी AG फीडरला सकाळी व दिवसा वीजपुरवठा दिला जात आहे. मात्र, ११ केव्ही निरसाना AG फीडरवरील वीजपुरवठा रात्री १२ ते सकाळी १० वाजेपर्यंत ठेवण्यात आल्याने निरसाना परिसरातील शेतकऱ्यांना रात्रीच्या अंधारात पिकांना पाणी द्यावे लागत आहे.



रात्रीच्या वेळी साप, विषारी कीटक तसेच रानडुकरांसारख्या वन्यप्राण्यांचा धोका असल्याने शेतकऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. हिवाळा व पावसाळ्यात रात्री शेतात काम करणे अधिक त्रासदायक ठरत आहे. इतर कृषी फीडरना दिवसा वीजपुरवठा मिळत असताना निरसाना फीडरच्या शेतकऱ्यांनाच रात्रीच्या वेळापत्रकाचा सामना का करावा लागत आहे, असा सवाल उपस्थित होत आहे.

**१२ तासांऐवजी सहा तासांची मागणी**

'परिसरातील इतर भागांतील शेतकऱ्यांना १२ तास दिवसा वीजपुरवठा मिळत असताना आपल्या भागातील शेतकऱ्यांना मात्र किमान सहा तास दिवसा वीज मिळावी, अशी मागणी करावी लागत आहे. त्यातही वारंवार सात-आठ वेळा वीज खंडित होते. शासनाने शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेऊन १२ तास नियमित दिवसा वीजपुरवठा द्यावा. शेतकऱ्यांना आपल्या हक्काच्या विजेसाठीही संघर्ष करावा लागणे दुर्दैवी आहे.'

**-रत्नाकर शेलोकार, शेतकरी,**

दरम्यान, यासंदर्भात महावितरणच्या कनिष्ठ अभियंत्यांकडे विचारणा केली असता, कृषी वीजवाहिनीवरील अतिरिक्त भारामुळे ताण निर्माण होत असल्याचे सांगण्यात आले. तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार वेळापत्रकात बदल करण्याचे सूतोवाच करण्यात आले होते. या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी शेतकऱ्यांनी महावितरण कार्यालय गाठून अधिकाऱ्यांशी चर्चा केली.त्यानंतर अधिकाऱ्यांनी दुसऱ्या दिवसापासून सकाळची वीज सुरू करण्याचे आणि लवकरच पूर्ण वेळ दिवसा वीजपुरवठा देण्याचे आश्वासन दिल्याची माहिती शेतकरी प्रशांत दारोदार यांनी दिली.

**'सातही दिवस दिवसा वीज मिळावी!'**

'महावितरण कार्यालयात सामाजिक कार्यकर्ते बंडू डकरे यांच्यासोबत जाऊन अधिकाऱ्यांशी चर्चा केली. आमदार रवी राणा यांचाही फोन आला. अधिकाऱ्यांनी सकाळची वीज देण्याचे व लवकरच पूर्ण वेळ दिवसा वीजपुरवठा सुरू करण्याचे आश्वासन दिले. यासाठी रवीभाऊ राणा व बंडू डकरे यांचे आभार. मात्र, आठवड्यातील सातही दिवस दिवसा वीजपुरवठा मिळावा, ही आमची ठाम मागणी आहे.'

**- प्रशांत दारोदार, शेतकरी,**

**'शेतकऱ्यांनी एकजूट दाखवून वरिष्ठांकडे पाठपुरावा करावा!'**

'गावातील अभियंत्यांना भेटून प्रश्न सुटेल असे वाटत नाही. गावपातळीवरील समितीच्या माध्यमातून शेतकऱ्यांनी एकत्र येऊन बडनेरा व अमरावती येथे वरिष्ठ अधीक्षक अभियंत्यांची भेट घ्यावी. केवळ मागणी करून प्रश्न सुटणार नाही, तर संघटितपणे पाठपुरावा करणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांनी आता एकजूट दाखवावी.'

**-मनोज इंगोले, शेतकरी,**

**महाराष्ट्र शासन**
**धर्मादाय सह आयुक्त कार्यालय**
**अमरावती विभाग, अमरावती**

**पत्ता:** म्हाडा भवन, दुसरा मजला, तात्या टोपे नगर, मालटेकडी जवळ अमरावती ४४४६०२
**ईमेल:-** supdtest.am-mh@govin. **दूरध्वनी क्रमांक:-** ०७२१-२५५३३०८,२६६००३३(लेखा)

जा.क्र./धसआ/अधि/ ८२५२/२०२६ दिनांक-०६/११/२०२६

**जाहिर नोटीस**
**अर्ज क्र. ०३८/ पेन ३६ (१) (बी)/२०२६**
**भारतीय उत्कर्ष मंडळ अमरावती रजि. क्र. फ-१०३५/अमरावती**

वरील अर्जदाराने वरील नमुद न्यासाची नोंदणी सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय **अमरावती** येथे केलेली आहे.

**मौजे अंजनगाव सुर्जी, ता. अंजनगाव सुर्जी जि. अमरावती येथील जुना शेत सर्व्हे नं. २२, २३, २४, मधील प्लॉट क्रं. १३ नवीन नझुल शीट नं. ५ ए नं. २००/१३ एकुण, क्षेत्रफळ ३०१.९४ चौ.मी. (३२५० चौ. फूट) ज्याची चतुर्सिमा-**
**पुर्वेस- श्री. डमाले यांचा प्लॉट**
**पाश्चिमेस रोड**
**उत्तरे- श्री. मनोहर महाजन यांचा प्लॉट**
**दक्षिणेस- रास्ता.**
**ही जागा गैरअर्जदार डॉ.हेडगेवार जन्मशताब्दी सेवा समिती, अकोला यांना बक्षिसपत्राद्वारे हस्तांतरण करण्याबाबत.**

त्या अर्थी या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, सरदहू मालमत्तेवरील हस्तांतरणास कोणताही काही आक्षेप असल्यास, त्यांनी हि नोटीस प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, मा. धर्मादाय सह आयुक्त, अमरावती यांचे कार्यालयात जातीने किंवा मान्यता दिलेल्या प्रतिनिधी मार्फत किंवा योग्य रितीने सुचना दिलेल्या वकीलामार्फत खालील सही करणार यांचे समोर दिलेल्या पत्त्यावर दाखल करावे त्यानंतर आलेल्या कॅफियतचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक ०६/११/२०२६ रोजी रोझी माझे सही व शिक्यानीशी व धर्मादाय सह आयुक्तच्या शिक्यानिशी ही नोटीस दिली.

शिक्का

**अधिक्षक (न्याय)**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय अमरावती**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय



# शासकीय योजनांतून आदिवासींचा विकास साधणार

## पालकमंत्र्यांच्या हस्ते जनजातीय गौरव दिवस सेवा सप्ताहाचा शुभारंभ

**-निमकुंड गावाच्या विकासाठी ४ कोटी निधींची घोषणा**



**अमरावती/प्रतिनिधीः-** निमकुंडसह मेळघाटातील सर्व आदिवासी कुटुंबापर्यंत क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१व्या जयंती निमित्त राबविण्यात येत असलेल्या सेवा सप्ताहात वेंद्र व राज्य शासनाच्या सर्व योजनांचा लाभ पोचविण्यात येणार आहे.निमकुंड गावासाठी ३.४४ कोटी खर्चातून पिण्याच्या पाण्याच्या योजनेला मंजुरी देण्यात येईल व ५० लाखांच्या निधीतून या गावात विविध विकास कामे राबविण्यात येतील असे प्रतिपादन महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज (दि.१२) येथे केले. या गावातील अशोक चिताराम आठवले यांच्या घरी पालकमंत्र्यांनी दिवाळीचा फराळ केला व शेतकऱ्यांसोबतच शासन आदिवासींच्या पाठीशीही खंबीरपणे उभे असल्याचा संदेश त्यांनी दिला. अचलपूर तालुक्यातील दुर्गम व आदिवासी निमकुंड गावात पालकमंत्री बावनकुळे यांनी आदिवासी बांधवांसोबत दिवाळी साजरी करून गृहोपयोगी साहित्याचे वाटप केले आणि जिल्ह्यात 'जनजातीय गौरव दिवस सेवा सप्ताहा'चा शुभारंभ त्यांच्या हस्ते झाला.यावेळी आमदार प्रवीण पोटे,केवलराम काळे, प्रवीण तायडे,अचलपूरच्या नगराध्यक्ष रुपाली माथने,निमकुंडच्या सरपंच रत्ना नागले, उपसरपंच अनिल अकोले,जिल्हाधिकारी आशिष येरेकर,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी,सहाय्यक जिल्हाधिकारी तथा धारणी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी सिद्धार्थ शुक्ला, पोलीस अधीक्षक निकेतन कदम आदी यावेळी उपस्थित होते.

पालकमंत्री बावनकुळे म्हणाले, क्रांतिसूर्य बिरसामुंडा यांनी त्याग,☞(पान २ वर)

# बिरला रेल्वे कॉलनीत ५६ ग्रॅम एमडी ड्रग्ज जप्त

## दोघे ताब्यात, ११.३० लाखांचा मुद्देमाल हस्तगत

**-'ऑपरेशन प्रहार-नार्को स्ट्राईक'अंतर्गत एलसीबीची कारवाई**



**अकोला/प्रतिनिधीः-** शहरातील अमली पदार्थांच्या अवैध व्यवसायाविरुद्ध स्थानिक गुन्हे शाखेने धडक कारवाई करीत बिरला रेल्वे कॉलनी परिसरातून ५६ ग्रॅम एमडी (मेफेड्रोन) अमली पदार्थ जप्त केला. या कारवाईत दोन संशयितांना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांच्याकडून मोबाईलसह एकूण ११ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली ११ नोव्हेंबर रोजी 'ऑपरेशन प्रहार-नार्को स्ट्राईक'अंतर्गत ही कारवाई करण्यात आली.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला रामदास पेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बिरला रेल्वे कॉलनी परिसरात एक इसम एमडी अमली पदार्थ विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगून असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. माहितीची खातरजमा करून अमली पदार्थविरोधी पथकाने परिसरात सापळा रचला. यावेळी शेख कासम शेख आजम (वय २५, रा. हमजा प्लॉट, रजा चौकाजवळ, अकोला) आणि गुलाम तोफिक कामरान गुलाम रफिक (रा. नवाबपुरा, अकोला) या दोघांना ताब्यात घेण्यात आले.

पंचांसमक्ष घेतलेल्या झडतीत पांढऱ्या रंगाची पावडर असलेली प्लास्टिक पिशवी आढळली. प्राथमिक तपासणीत हा पदार्थ एमडी अमली पदार्थ असल्याचे निष्पन्न झाले. त्याचे वजन ५६ ग्रॅम असून बाजारमूल्य अंदाजे ११ लाख २० हजार रुपये आहे. याशिवाय १० हजार रुपये किमतीचा अँड्रॉइड मोबाईलही जप्त करण्यात आला. याप्रकरणी रामदास पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ६०९/२६ अन्वये एनडीपीएस कायद्याच्या कलम ८(क) व २२(क) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, जिल्ह्यात अमली पदार्थांच्या अवैध विक्री, साठवणूक आणि वाहतुकीला आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी स्थानिक गुन्हे शाखेत स्वतंत्र अमली पदार्थविरोधी कक्ष (अँटी नार्कोटिक सेल)☞(पान २ वर)



अमरावती : येथे आयोजित कार्यक्रमात जनमाध्यम दिवाळी अंक २०२६ पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना सस्नेह भेट देण्यात आला. यावेळी पालकमंत्री बावनकुळे यांनी दिवाळी अंकाचे अवलोकन करून त्यातील साहित्य व माहितीपूर्ण मजकुराची पाहणी केली. याप्रसंगी जनमाध्यमचे वृत्त संपादक अभिराम देशपांडे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# नोटा मोजून देण्याच्या बहाण्याने वृद्धेचे १० हजार लंपास

## तिवसा येथील स्टेट बँकेसमोरच घटना

**तिवसा/प्रतिनिधीः-** बँकेतून पैसे काढल्यानंतर नोटा मोजून देण्याच्या बहाण्याने एका ६५ वर्षीय वृद्ध महिलेचे एका अज्ञात इसमाने १० हजार ५०० रुपये लंपास केल्याची घटना गुरुवार १२ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजताच्या सुमारास तिवसा येथील भारतीय स्टेट बँकसमोर घडली. बँकेच्या आवारातच घडलेल्या या प्रकारामुळे ज्येष्ठ नागरिकांच्या आर्थिक सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

प्राप्त माहितीनुसार, कमलाबाई मधुकर बद्रे (वय ६५, रा. शिक्षक कॉलनी, तिवसा) या एकट्याच राहतात. त्या घरकाम करून उदरनिर्वाह करतात. त्यांना चार मुली असून सर्व मुलींची लग्न झाली आहेत. गुरुवारी सकाळी सुमारे ११ वाजता कमलाबाई या घरून पायदळ भारतीय स्टेट बँकेत पैसे काढण्यासाठी गेल्या होत्या. त्यांनी बँकेत २५ हजार रुपयांचा धनादेश दिल्यानंतर त्यांना संपूर्ण रक्कम मिळाली. त्यानंतर त्या हातातील नोटा मोजत असताना जवळच असलेला अंदाजे ३५ वर्षांचा एक अनोळखी इसम त्यांच्याजवळ आला.

'तुम्ही पैसे कसे मोजत आहात.? मला द्या, मी मोजून देतो,' असे ☞(पान २ वर)

# अखेर २४ दिवसांनी फरार भोजने दाम्पत्याला अटक

## नवजात बालिकेच्या विक्रीच्या प्रयत्नाचा आरोप

**१६ नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडी**



**अमरावती/प्रतिनिधीः-** अल्पवयीन मुलीच्या नवजात बालिकेची विक्री करण्याचा प्रयत्न केल्याच्या आरोपाखाली दाखल असलेल्या प्रकरणात गेल्या २४ दिवसांपासून फरार असलेल्या डॉ. वैशाली भोजने आणि प्रफुल्ल भोजने या दाम्पत्याला अखेर फ्रेजरपुरा पोलिसांनी अटक केली. अकोली रोडवरील साईनगर परिसरातून गुरुवारी दोघांना ताब्यात घेण्यात आले. गुरुवारी न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना १६ नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली. या अटकेमुळे नवजात बालिकेच्या कथित विक्री प्रकरणातील अनेक महत्त्वाच्या बाबी उघड होण्याची शक्यता आहे.

फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात १८ ऑक्टोबर २०२६ रोजी एका अल्पवयीन पीडितेने तक्रार दिली होती. तक्रारीनुसार, तिचे एका अल्पवयीन मुलासोबत प्रेमसंबंध होते. त्यातून ती गर्भवती राहिली. त्यानंतर ती डॉ. वैशाली भोजने यांच्या रुग्णालयात गेली असता तपासणीत ती पाच महिन्यांची गर्भवती असल्याचे समोर आले. यावेळी डॉक्टरांनी गर्भपात करण्यास नकार देत त्यांच्या संपर्कात एक संस्था असून ती नवजात बालकांना दत्तक देण्याचे काम करते, असे सांगितल्याचा आरोप आहे. या प्रक्रियेमुळे पोलीस तक्रार होणार नाही आणि☞(पान २ वर)

# वरखेड येथील युवकाचा हृदयविकाराच्या झटकाने मृत्यू



**तिवसा/प्रतिनिधीः-** तालुक्यातील वरखेड आपल्या मुळ गावी दिवाळीसाठी आलेल्या २५ वर्षीय युवकांचा हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने मृत्यू झाल्याची घटना बुधवारी (दि.११) रात्री १० वाजता उघडकीस आली. कार्तिक संजय कडू असे मृत युवकाचे नाव असून तो गुजरात येथील वडोदरा येथे आयटी कंपनीमध्ये कार्यरत होता.अवघ्या २५ वर्षीय कार्तिक हा कुटुंबासमवेत दिवाळी साजरी करण्यासाठी आला होता, मात्र त्याची ही दिवाळी कुटुंबासोबत अखेरची ठरल्याने कुटुंबावर मोठा दुःखाचा डोंगर कोसळला असून वरखेड गावात शोककळा पसरली आहे.

मृतक कार्तिक हा दोन वर्षापासून वडोदरा याठिकाणी जॉब करत होता. दिवाळी निमित्त तो तीन दिवसापूर्वी घरी आला.रात्री त्याला छातीमध्ये वेदना झाल्याने त्याला तातडीने उपचारासाठी तिवसा रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. मृतक कार्तिक हा घरातील कर्ता असून त्यांच्या पच्छात आई, वडिल, व एक बहीण आहे. कार्तिक याच्या मृत्यूने वरखेड गावात हळहळ व्यक्त होत आहे.

# स्वतःच्याच पैशांसाठी ठेवीदारांची फरफट

## निर्मल उज्वल प्रकरणी चांदूर रेल्वेत सर्वपक्षीय एल्गार!

**शेकडो ग्राहकांचे नऊ कोटींहून अधिक रुपये अडकले**



**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** निर्मल उज्वल क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी, नागपूरच्या आर्थिक प्रकरणामुळे राज्यभरातील सुमारे एक लाख ग्राहकांचे तब्बल १ हजार ४०० कोटी रुपये अडकल्याचा दावा करण्यात येत असून, या प्रकरणाचे पडसाद आता चांदूर रेल्वेतही तीव्रपणे उमटू लागले आहेत. गेल्या सात ते आठ महिन्यांपासून बचत खाते, मुदत ठेवी (एफडी) आणि दैनंदिन कलेक्शनची रक्कम मिळत नसल्याने ठेवीदारांमध्ये प्रचंड संताप निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर आम आदमी पार्टीसह विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटना आणि पीडित ठेवीदारांनी संयुक्तपणे निवेदन सादर करून शासनाला १५ दिवसांचा अल्टिमेटम दिला आहे.

चांदूर रेल्वे परिसरातील प्राथमिक माहितीनुसार, शेकडो ठेवीदारांचे नऊ कोटी रुपयांपेक्षा अधिक पैसे अडकले असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. मात्र, या आकडेवारीची अधिकृत पडताळणी होणे आवश्यक आहे. अनेक ग्राहकांनी वृद्धापकाळाची तरतूद, मुलांचे शिक्षण, मुला-मुलींचे विवाह तसेच भविष्यातील गरजांसाठी आयुष्यभराची कमाई या संस्थेत जमा केली होती. मात्र, आता स्वतःच्या पैशांसाठीच ग्राहकांना शाखेचे उंबरठे झिजवावे लागत आहेत.

विशेष म्हणजे, गेल्या सात ते आठ महिन्यांपासून ग्राहकांना पैसे देण्याऐवजी वारंवार नवीन तारखा दिल्या जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. एक तारीख संपली की दुसरी आणि दुसरी संपली की तिसरी तारीख, अशा प्रकारे ग्राहकांची बोळवण केली जात आहे. दिवाळीसारख्या महत्त्वाच्या सणातही ठेवीदारांना त्यांच्या हक्काच्या पैशांमधील एक रुपयासुद्धा ☞(पान २ वर)

# आठवडी बाजारात ट्रॅक्टर उभा करण्याच्या वादातून इसमाचा मृत्यू

## डोक्यावर गंभीर मार, जुन्या वादातून हत्येचा संशय

**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर तालुक्यातील करतखेडा येथे काल (दि. ११) आठवडी बाजारात ट्रॅक्टर उभा करण्याच्या जागेवरून वाद झाला. यात ६० वर्षीय इसमाच्या डोक्याला गंभीर मार लागल्याने त्यांचा मृत्यू झाला असून ही घटना बुधवारी सायंकाळी पाच वाजताच्या सुमारास घडली.

गजानन खेडकर (वय ६०)असे मृत्यू झालेल्या इसमाचे नाव असून करतखेडा येथिल आठवडी बाजारात ट्रॅक्टर उभा करण्याच्या कारणावरुन गजानन खेडकर व अवधूत खोडके यांच्यात वाद झाला. याच वादातून गजानन खेडकर यांच्या डोक्याला गंभीर मार लागला. त्यातच त्यांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहीती येवदा पोलिसांनी दिली. ही घटना जुन्या वादातून झाल्याची शंका व्यक्त करण्यात येत आहे.या घटनेत अवधूत खोडकेचे नाव समोर आले असून घटनेची माहीती येवदा पोलिसांना मिळताच पोलिसांनी घटनास्थळ गाठले परिस्थितीचे गंभीर्य पाहता घटनास्थळी फिंगरप्रिंस्टिक टीमला पाचारण करण्यात आले.वादाचे कारण आणि घटना कोणत्या परिस्थितीत घडली याबाबतचा तपास येवदा पोलिसांकडून सुरु आहे. सदर घटनेचा पुढील तपास ठाणेदार प्रफुल्ल गाडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस करीत असून या घटनेमुळे करतखेडा गावासह परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

# नांदगाव शहरात प्लास्टिक बंदी कागदावरच -सर्रास वापर, नप चे दुर्लक्ष



**नांदगाव खंडेश्वर/प्रतिनिधीः-** पर्यावरण आणि नागरिकाच्या आरोग्याचे संरक्षण व्हावे या उद्देशाने एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकच्या वस्तू आणि कॅरीबॅग यावर राज्य शासनाने बंदी घातली असली तरी नांदगाव खंडेश्वर शहरात प्लॅस्टिकचा सर्रास वापर होत असल्याने शासनाच्या या निर्णयाची उघडपणे पायमल्ली होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. शहरात न.प.च्या हद्दीत अनेक चहा कॅन्टीन वर हॉटेल आठवडी बाजारात दुकानांमधून एकदाच वापरात येत असलेल्या प्लॅस्टिक थैली व हॉटेल मधून प्लॅस्टिक आवरण असलेल्या चहा कपाचा मोठ्या प्रमाणात वापर होत असल्याचे दिसून येत असले तरी संबंधित विभाग याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचा नागरिकांचा आरोप आहे. शहरात अनेक ठिकाणी हॉटेल व कॅन्टींग मधून ग्राहकांना प्लॅस्टिकच्या पेपर कपामधूनच चहा दिल्या जातो. हे कागदी कप पूर्णपणे कागदाचे नसून याला आतून अतिशय पातळ प्लास्टिकचा थर असतो कपामध्ये गरम चहा टाकल्यावर या प्लॅस्टिक थरातील एकदम बारीक कण चहामध्ये मिसळून शरीरात जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. याचे सतत वापरामुळे गंभीर आजाराचा धोका वाढू शकतो असा ☞(पान २ वर)

# तडीपार आदेशाचे उल्लंघन

## बडनेरा पोलिसांची दोघांविरुद्ध कारवाई





**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातून तडीपार करण्यात आलेले असतानाही आदेशाचे उल्लंघन करून अमरावती वावरणाऱ्या दोन इसमांविरुद्ध बडनेरा पोलिसांनी कारवाई वेगळी आहे. पोलिसांनी दोघांनाही शोधून त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्र पोलीस कायद्यानुसार स्वतंत्र गुन्हे दाखल केले आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जावेद बेग जमील बेग (वय ३४, रा. ताजनगर, दाभा पावती, बडनेरा) याला पोलीस उपायुक्त परिमंडळ क्रमांक १ यांनी २ मार्च २०२६ रोजीच्या आदेशान्वये १८ महिन्यांसाठी अमरावती शहर व ग्रामीण भागातून तडीपार केले होते. तसेच अप्पू उर्फ अफरोज खान मन्नान खान (वय ३२, रा. गवळीपुरा, बडनेरा) याला २९ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या आदेशान्वये दोन वर्षांसाठी हद्दपार करण्यात आले होते. मात्र,☞(पान २ वर)

# शेतातील विहिरीत पडून वृद्ध महिलेचा मृत्यू

## सालोरा तसरे गावातील घटना



**तिवसा/प्रतिनिधीः-** तालुक्यातील सालोरा तसरे गावात शेतातील विहिरीत पाय घसरल्याने पाण्यात बुडून एका ७० वर्षीय वृद्ध महिलेचा मृत्यू झाला आहे. ही घटना मंगळवारी सायंकाळी सालोरा तसरे येथील शेतशिवारात घडली.गीता हरिदास चव्हाण (वय ७०) असे मृत महिलेचे नाव आहे.

माहिती नुसार, गीता चव्हाण आपल्या पिकाचे पाहणी करिता शेतात गेल्या होत्या. त्याच दरम्यान त्यांचा तोल गेला आणि त्या शेतात असलेल्या विहिरीत जाऊन पडल्या, ज्यामुळे पाण्यात बुडून त्यांचा जागीच मृत्यू झाला.घटना घडताच शेतशिवारात एकच खळबळ उडाली. आजूबाजूच्या शेतकऱ्यांनी आणि गावकऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. विहिरीतून महिलेचा मृतदेह बाहेर काढण्यात आला. गीता चव्हाण यांच्या अशा अचानक जाण्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. गावातही शोककळा पसरली आहे. शेतात काम करताना झालेल्या या अपघाताने सर्वांनाच धक्का बसला आहे. पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# सातबंगल्यातील घरफोडीचा गुन्हे शाखेकडून उलगडा!

## रेकॉर्डवरील सराईतासह तडीपार आरोपी जेरबंद

**-२.२१ लाखांचा मुद्देमाल जप्त**



**अमरावती/प्रतिनिधीः-** नांदगाव पेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सातबंगला परिसरात झालेल्या घरफोडीच्या गुन्ह्याचा अमरावती शहर गुन्हे शाखेने उलगडा केला आहे. या प्रकरणात रेकॉर्डवरील सराईत घरफोडी करणारा आरोपी आणि अमरावती शहरातून तडीपार असलेल्या त्याच्या साथीदाराला पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यांच्याकडून सोन्याचे दागिने, मोबाईल आणि रोख रकमेसह एकूण २ लाख २१ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

नांदगाव पेठ पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल होता. या गुन्ह्याचा समांतर तपास गुन्हे शाखेकडून सुरू होता. सातबंगला परिसरातील विविध ठिकाणच्या सीसीटीव्ही फुटेजचे विश्लेषण तसेच गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी तपासाची दिशा निश्चित केली. या घरफोडीत रेकॉर्डवरील आरोपी शेख जावेद उर्फ बबलू आणि तडीपार आरोपी सैयद तौसीफ यांचा सहभाग असल्याचे ☞(पान २ वर)

# जागतिक मधुमेह दिनानिमित्त भव्य निसर्ग भ्रमण रॅली उद्या

**रक्तदान, रक्तशर्करा तपासणीवर मार्गदर्शन**



**अमरावती/प्रतिनिधीः-** १४ नोव्हेंबर हा दिवस दरवर्षी बाल मधुमेहींचा जीवन रक्षक, जीवनदाता सर फ्रेडरिक बँटिंग यांचा जन्म दिवस. त्यांनी चार्ल्स बेस्ट यांच्यासह १९२२ मध्ये इन्सुलिनचा शोध लावला. त्या दिवसाचे औचित्य साधून त्यांना आदरांजली अर्पण करण्यासाठी जागतिक मधुमेह दिन म्हणून साजरा केला जातो. या निमित्ताने डायबेटिक असोसिएशन, जिल्हा सामान्य रुग्णालय व डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने निसर्ग परिसर भ्रमण रॅली, रक्तदान व रक्तशर्करा तपासणी व प्रश्नोत्तरी व मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.१४ नोव्हेंबर रोजी सकाळी ८.३० वाजता शिवटेकडी वर भव्य निसर्ग भ्रमण रॅली काढण्यात येणार असल्याचे माहिती आज गुरुवार १२ नोव्हेंबर रोजी पत्रकार परिषदेमध्ये डॉक्टर प्रमोद निर्वाणे यांनी दिली.

त्यांनी सांगितले की,भारतात मधुमेहाचे प्रमाणात वाढ होत आहे. या करीता अनियंत्रित आहार, तणावग्रस्त जीवन शैली, आहाराबाबत पाश्चात्यांचे अंधानुकरण,☞(पान २ वर)